
# लोकराज्य

ऑक्टोबर २०१६ / पाने ६८ / किंमत ₹१०/-

## आता बदल दिसतोय महाराष्ट्र घडतोय

आपले सरकार कामगिरी दमदार

# विश्वविक्रमी महावृक्षलागवड



Limca

Book of Records

National Record

**The Forest Department** as well as the **Social Forestry Division of Maharashtra** joined forces to plant 2,81,38,634 saplings across the State in 12 hours on July 1, 2016 by involving the general public, students, NGOs and other organizations, government and private.

**Other records were:**

Trees planted in 12 hours; most tree species-153; data base of every sapling planted; simultaneous plantation across 65,674 sites with 6,14,482 people.

Vijaya Ghose

Editor, Limca Book of Records

Issued on: **September 12, 2016**

"LIMCA BOOK OF RECORDS" IS THE COPYRIGHT OF THE COCA-COLA COMPANY. "LIMCA" IS THE REGISTERED TRADEMARK OF THE COCA-COLA COMPANY
THIS CERTIFICATE DOES NOT NECESSARILY DENOTE AN ENTRY INTO LIMCA BOOK OF RECORDS



१ जुलै रोजी राज्य शासनाने महावृक्षलागवडीची मोहीम यशस्वी केली. या मोहिमेंतर्गत २ कोटी ८१ लाख वृक्षलागवड केली गेली. अवघ्या १२ तासांत एवढ्या मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीचा हा विश्वविक्रम घडल्याने त्याची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डने घेतली.



## कामगिरी दमदार

जनतेला पारदर्शक आणि कार्यक्षम सरकार देण्याचा संकल्प करण्यात आला होता. शासनास दोन वर्षे पूर्ण होताना या संकल्पपूर्तीच्या दिशेने दमदार पाऊल पुढे पडले आहे. कोणत्याही सरकारची कामगिरी ठरवण्यासाठी दोन वर्ष हा कालावधी अपुरा असला तरी पुढच्या वाटचालीची पायाभरणी व जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी या कालावधीत यश मिळाले.

६

## समृद्धी आणि सुविधा

दळणवळण आणि पायाभूत सुविधा हे विकासाची गती निर्देशित करते. म्हणूनच रस्ते विकासाला प्राधान्य देण्यात आले. रस्त्यांची कामे करताना नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. विविध महामार्ग तयार करण्याचे काम सुरू आहे.



१४

## सर्वांसाठी घरे

दोन वर्षाच्या कालावधीत सर्वसामान्यांच्या घरकुलाचे स्वप्न साकार व्हावे, या दृष्टीने शासनाने ठोस निर्णय घेतले. नवीन गृहनिर्माण धोरण यासाठी उपयुक्त ठरेल. सर्वांना २०२२ पर्यंत घरे उपलब्ध करण्याचा शासनाचा निर्धार आहे.



२०

## दर्जेदार सेवा



गेल्या दोन वर्षात आरोग्याच्या क्षेत्रात घेण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांमुळे राज्यातील जनतेला दर्जेदार आरोग्यसेवा मिळत आहेत.

४४


**कामगिरी दमदार** ६
**मराठा प्रश्नावर सरकार सकारात्मक** १०
**समृद्धी आणि सुविधा** १४
**समाजहिताचे अर्थभान** १६
**चौफेर संधी** १८
**सर्वांसाठी घरे** २०
**स्मार्ट गावे, सक्षम महिला** २२
**पर्व परिवर्तनाचे** २४
**स्वस्त धान्य, सुरक्षित औषधे** २६
**जलसंपत्ती वाढली** २८
**सुरक्षित आणि सुसह्य** ३०
**गुंतवणूक सुपरफास्ट** ३२
**शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी** ३४
**संवर्धन आणि संरक्षण** ३६
**नवे प्रतीक विकासाचे** ३८
**उजळल्या दाही दिशा** ४०
**स्वच्छ आणि निर्मळ** ४२
**दर्जेदार सेवा** ४४
**सामाजिक समरसता** ४६
**सर्वांसाठी पाणी** ४८
**पर्यटन आणि रोजगार** ५०
**सुलभ कर्जमुक्ती** ५२
**आपले पशुधन, आपले हित** ५४
**कुशल महाराष्ट्र** ५६
**उपेक्षितांना दिलासा / सक्षम आणि सुदृढ** ५८
**कामगारांच्या हितासाठी /**
**आधुनिक आणि लोकाभिमुख** ५९
**ग्रामोन्नती / हरित महाराष्ट्र** ६०
**सुरक्षिततेला प्राधान्य /**
**कौशल्यातून उज्ज्वल भविष्याकडे** ६१
**हक्काचा निवारा / स्मार्ट शहरे,**
**सुरक्षित नागरिक** ६२
**सर्वांचे कल्याण / कर्ज परतफेडीसाठी सूट** ६३
**पशुधनाचे संवर्धन / कृषिपंपांना**
**मुबलक वीज** ६४
**ग्राहकांचे हित, शेतकऱ्यांचा फायदा /**
**बंदरांचा विकास** ६५
**आता मुंबई अधिक सुरक्षित** ६६




## समाजहिताचे अर्थभान

अनेक अडचणींचा सामना करत असताना राज्याचा विकासदर ८ टक्क्यांवर नेऊन ठेवण्यात राज्य सरकारला यश आले आहे.

१६

## चौफेर संधी

विद्यार्थ्यांचे मनोबल ढळू नये, यासाठी १०-१२वीची फेरपरीक्षा लगेच घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. आगामी काळात कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रमांना प्राधान्य देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.



१८

## स्मार्ट गावे, सक्षम महिला

सर्व ग्रामपंचायती स्मार्ट बनवण्याचा निर्धार शासनाने केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलणार आहे.

२२

## गुंतवणूक सुपरफास्ट

मुंबईत पार पडलेल्या 'मेक इन इंडिया' सप्ताहामुळे महाराष्ट्र हा देशात गुंतवणुकीस सर्वाधिक पसंतीचे ठिकाण असल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे.

३२

आपले सरकार कामगिरी दमदार

वर्ष ६८ वे | अंक ४ | ऑक्टोबर २०१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

**संपादन**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — राजाराम देवकर

**प्रशासन**

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी

**मांडणी**

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

**पत्ता**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

फॉलो करा...www.twitter.com/MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com/dgipr

**वितरण आणि वर्गणीदार**

वर्गणीदार व तक्रार निवारण – ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in




**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेत असतात. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या वर्षभरातील त्यांचे काही ट्विट्स...**

महावृक्षलागवड मोहीमेची लिम्का बुक ऑफ रेकॉर्डने दखल घेतल्यानंतर...

Maharashtra creates a record! LimcaBook of records recognises initiative of planting more than2.8cr saplings in12 hrs

पतंजली फूड ॲण्ड हर्बल पार्कच्या उद्घाटनानंतर...

Patanjali Food Herbal Park in 200acre area will be world's biggest with an investment of 500crwill generate employment of more than 50000

सामाजिक दायित्व आणि लोकसहभागासाठी 'सहभाग' हे पोर्टल उपलब्ध करताना..

Launched "S-H-BH-G' a portal for Social Responsibility people's participationconvergence https://sahabhag.maharashtra.gov.in

**'ओरॅकल'सोबत झालेल्या सामंजस्य करारानंतर...**



**Historic moments for Maharashtra at @oracleopenworld Thank you Safra Catz team @Oracle for partnering! #oow16 link.**

**We are going through a massive digital transformation. We are connecting all the villages digitally by Dec 2018**

दुष्काळमुक्त महाराष्ट्राविषयी निर्धार व्यक्त करताना...

We are determined working hard for betterment of farmers through #JalYuktShivar & every possible way.

We are committed for #DroughtFreeMaharashtra & together we will makeMaharashtra the bestState in the world.

प्रधानमंत्री फसल बिमा योजनेविषयी...

Grateful to Hon @narendramodi ji for the most awaited gift of new crop insurance for farmers. #PradhanMantriFasalBimaYojana

स्वच्छ महाराष्ट्र अभियानासाठी सोशल मीडियावर प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देताना...

Launched @SwachhMaha on social media platforms of @twitter & @facebook for more communicationpeople's participation

# नवे पर्व प्रगतीचे

महाराष्ट्र हे देशात अनेक क्षेत्रातील प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले आहे. देशी आणि परदेशी गुंतवणुकीत सर्वाधिक पसंतीचे राज्य महाराष्ट्र असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. 'मेक इन इंडिया' उपक्रमाद्वारे राज्यात ८ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून; त्यामुळे ३० लक्ष रोजगार निर्मिती होईल.

जुलै २०१६ मध्ये राज्यात दोन कोटी महावृक्षलागवडीचा कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात आला. त्याची नोंद लिम्का बूक ऑफ रेकॉर्डने घेतली. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनीही आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमातून या उपक्रमाचे जाहीररीत्या कौतुक केले. जलयुक्त शिवार हा मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून तो राज्यात प्रभावीरीत्या राबवला जात आहे. या कामांमुळे ११ लाखांहून अधिक टीसीएम पाणीसाठ्याची निर्मिती झाली आहे. त्यामुळे बऱ्याच मोठ्या क्षेत्रातील पिकांना संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. जलयुक्त शिवार योजनेच्या यशामुळे अनेक भागात चांगले जलसाठे निर्माण झाले. त्याचा उपयोग टंचाईमुक्तीसाठी निश्चित होईल. नागरी आणि ग्रामीण स्वच्छ अभियानामध्ये महाराष्ट्र उत्कृष्ट कार्य करीत आहे. याची नोंद राष्ट्रीय पातळीवरही घेण्यात आली. स्मार्ट सिटी योजनेमध्ये महाराष्ट्रातील अनेक शहरांचा समावेश केंद्र सरकारने केला आहे. या योजनेसाठी निधीही उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे या शहरांचा चेहरामोहरा पुढील काळात बदललेला दिसेल.

ग्रामीण भागात पायाभूत सुविधा आणि इतर विकासाची कामे मोठ्या प्रमाणावर केली जात आहेत. स्मार्ट ग्राम योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांची सुरक्षा यावर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. आदिवासी आणि इतरही क्षेत्रातील माता आणि बालकांमधील कुपोषण मिटवण्यासाठी प्रभावीरीत्या प्रयत्न केले जात आहेत. 'नागपूर-मुंबई समृद्धी जलदगती महामार्ग' पुढील दोन ते तीन वर्षात पूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. या महामार्गामुळे विकास आणि प्रगतीच्या नव्या पर्वाला प्रारंभ होईल.

समाजातील दुर्बल, उपेक्षित आणि अल्पसंख्याक घटकांच्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीमध्ये राज्याने आघाडी घेतली आहे. त्यामुळे या घटकांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळत आहे. राज्यातील सुरक्षा व्यवस्थेची प्रभावी जबाबदारी गृहविभाग पार पाडत आहे. हा विभाग अत्याधुनिक आणि अधिक सक्षम केला जात आहे. सर्व जिल्ह्यात सायबर लॅबची स्थापना करण्यात आली असून मोबाइल फॉरेन्सिक वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. क्राईम ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्किंग सिस्टिम ही अत्याधुनिक यंत्रणा कार्यान्वित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

ई-गव्हर्नन्सच्या क्षेत्रातही राज्याने लक्षणीय कामगिरी केली असून, 'आपले सरकार' वेबपोर्टलच्या माध्यमातून; नागरिकांना त्याचा चांगला अनुभव येत आहे. अशा रीतीने गेल्या दोन वर्षात सरकारची कामगिरी अतिशय प्रभावी ठरली असून, त्याचा सर्वंकष आढावा आम्ही या अंकात घेतला आहे. हा अंक आपणास आवडेल अशी खात्री आहे.

या महिन्यात येणाऱ्या दीपावलीच्या आगमनाप्रीत्यर्थ आमचे वाचक, वर्गणीदार, विक्रेते व लेखक यांना मन:पूर्वक शुभेच्छा.

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**

# कामगिरी दमदार



**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

**जनतेला पारदर्शक आणि कार्यक्षम सरकार देण्याच्या संकल्पासह राज्याची सूत्रे स्वीकारून दोन वर्षे पूर्ण होताना, संकल्पपूर्तीच्या दिशेने आश्वासक पाऊल टाकल्याचे समाधान मनात आहे. दुसऱ्या वर्षाच्या वाटचालीस सुरुवात करताना पहिल्या वर्षाच्या कामगिरीच्या मूल्यमापनाची शिदोरी सोबत आहे. सरकारच्या पुढील वाटचालीची पायाभरणी व जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी मागील एक वर्षाचा काळ उपयुक्त ठरला आहे. त्यानुसार वर्षभरात अनेक निर्णय आम्ही घेतले आणि त्या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी व परिणामांसाठी दुसरे वर्षही महत्त्वपूर्ण ठरले.**



## स्मार्ट सुंदर शहरे

**जागतिक दर्जाच्या पायाभूत सोयीसुविधा व अन्य निकषांच्या पूर्ततेसह राज्यातल्या शहरांची जागतिक दर्जाकडे वाटचाल होण्यासाठी, प्रधानमंत्र्यांच्या महत्त्वाकांक्षी स्मार्ट सिटी प्रकल्पात निवड होण्यासाठी; राज्याने नियोजनपूर्वक पावले उचलली आहेत. पुणे, सोलापूर, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, ठाणे व कल्याण-डोंबिवली या ७ शहरांची प्रकल्पांतर्गत निवड करण्यात आली आहे. स्मार्ट सिटी योजनेच्या शुभारंभाचा मान राज्याला मिळाला. पहिल्या मेरीटाइम इंडिया परिषदेचा मान राज्याला मिळाला. या परिषदेच्या तीन दिवसांत ८३ हजार कोटी रुपयांचे औद्योगिक सामंजस्य करार करण्यात आले. राज्यातील बंदरे जोडण्याचा उपक्रम शासनाने हाती घेतला असून वर्धा व जालना येथे ड्रायपोर्ट उभारण्यात येत आहे.**

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्याची सूत्रे स्वीकारल्याने शाश्वत पाणीपुरवठ्याची सोय करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान प्राधान्याने सुरू करण्यात आले होते. दरवर्षी ५ हजार गावे दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेन टाकलेले पहिले पाऊल दुसऱ्या वर्षात चांगलेच स्थिरावले असून अभियानाने आता लोक चळवळीचे रूप धारण केले आहे.

पहिल्या दोन वर्षात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सुमारे ११,५०० गावांमध्ये जलसंधारणाची २,१४,५३६ कामे पूर्ण झाली असून १४,९२५ कामे प्रगतिपथावर आहेत. जलयुक्त शिवारच्या कामांमुळे ११,६१,६२६.४१ टीसीएम पाणीसाठ्याची निर्मिती झाली. त्याद्वारे ११,८४,३४७.४१ लाख हेक्टर क्षेत्रांतील एका पिकास आणि ६ लाख हेक्टरवरील दोन पिकांना संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली. 'दुष्काळ निर्मूलनाचा आदर्श पॅटर्न' म्हणून संपूर्ण देशात हे अभियान ओळखले जात आहे, हे सांगताना मला जितका अभिमान वाटतो आहे; त्याहीपेक्षा जास्त आनंद या गोष्टीचा होत आहे की, आमच्या प्रामाणिक प्रयत्नांना यंदा निसर्गाची चांगली साथ मिळाली. राज्याची वाटचाल सुजलाम्-सुफलामतेच्या दिशेने सुरू आहे. राज्यात पुरेशा पाण्याच्या उपलब्धतेमुळे बळीराजा सुखावला असून पिकांची स्थिती उत्तम आहे.

### मेक इन महाराष्ट्र

जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून पिण्यासाठी तसेच शेतीसाठी शाश्वत पाणी पुरवठ्याची सोय करतानाच उद्योगधंदे वाढीसाठी, प्रधानमंत्र्यांच्या 'मेक इन इंडिया' या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत 'मेक इन महाराष्ट्र' योजना आम्ही सुरू केली. 'मेक इन इंडिया' या देशव्यापी अभियानाच्या शुभारंभाचा मान मुंबईला मिळणे, हा आमच्या दुसऱ्या वर्षाच्या वाटचालीतील अभिमानास्पद टप्पा आहे.

देशात औद्योगिक आणि गुंतवणूक वाढीसाठीच्या प्रयत्नांचा एक भाग असलेल्या, प्रधानमंत्र्यांच्या या महत्त्वाकांक्षी सप्ताहाच्या आयोजनाची जबाबदारी राज्यावर सोपवल्याने; उद्योग व गुंतवणुकीच्या दृष्टीने मुंबई व महाराष्ट्राच्या असलेल्या अग्रस्थानावर शिक्कामोर्तब झाले आहे. राज्याने या संधीचा पुरेपूर लाभ घेत ८ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ३० लाखांहून अधिक रोजगार निर्मितीच्या संधी राज्यात या सप्ताहाच्या माध्यमातून निर्माण करण्यात यश मिळवले. आतापर्यंत ३२ हजार ३७७ कोटी रुपयांचे सामंजस्य करार प्रत्यक्षात आले असून प्रकल्प उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे. १ लाख २३ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार प्रत्यक्षात येण्यासाठीची प्रक्रिया सुरू असून लवकरच गुंतवणूक राज्यात होईल. मध्यम, लघु व सूक्ष्म उद्योगांमध्ये २५१२ एवढे सामंजस्य करार झाले असून त्यातून २८ हजार ८६९ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. यातील ४७४ सामंजस्य करारांचे काम प्रत्यक्षात सुरू झाले असून ६२४७.३८ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. अमेरिका दौऱ्यात ब्लॅकस्टोन, सिस्को, कोकाकोला या आघाडीच्या उद्योग समूहांसोबत तसेच रशिया दौऱ्यात खनिकर्म, रेल्वे प्रकल्प आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील औद्योगिक गुंतवणुकीला चालना देण्यासह तांत्रिक विद्यापीठांच्या उभारणीसाठी स्वेर्डलोव्हेस्क प्रांताशी राज्य शासनाने केलेले करार, अमेरिकेतील सॅनफ्रॅन्सिको येथे ओरॅकल ओपन वर्ल्ड-२०१६ आंतरराष्ट्रीय परिषदेत स्मार्ट सिटी अभियानातील तंत्रज्ञानविषयक साह्यासाठी ओरॅकल कंपनीशी अलीकडेच करण्यात आलेल्या सामंजस्य करार यातून; मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असून, राज्यात येत्या काळात संपन्नतेचे नवे पर्व सुरू होईल, यात शंका नाही.

'इज ऑफ डुईंग बिझनेस' अर्थात उद्योगस्नेही धोरणामुळे उद्योजकांना घ्याव्या लागणाऱ्या विविध परवान्यांची संख्या ७६ वरून २५ करण्यात आली आहे. जमीन संपादनातील अडथळे दूर करणे, कामगार हिताकडे विशेष लक्ष यांसारख्या विविध उपाययोजनांमुळे राज्याची महाउद्योग राष्ट्र ही ओळख अधोरेखित होत आहे.

### संपूर्ण कायापालट

विविध लोककल्याणकारी योजनांमध्ये जनतेसोबतच उद्योगसमूहांचेही, सीएसआरच्या (कंपनी सामाजिक दायित्वाच्या) माध्यमातून योगदान मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. उद्योग तसेच वित्तीय क्षेत्रानेही याला उत्तम प्रतिसाद दिला असून

जलयुक्त शिवार, स्वच्छ महाराष्ट्र, कौशल्य विकास अशा अनेक शासकीय योजना/कार्यक्रमांमध्ये भरीव योगदानासाठी ते पुढे आले आहेत. कॉर्पोरेट कंपन्यांच्या साहाय्याने खेड्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या नावीन्यपूर्ण अशा व्हिलेज सोशल ट्रान्स्फॉर्मेशन मिशनचा प्रारंभ करण्यात येत आहे. येत्या २ ऑक्टोबरपासून किमान १०० गावांमध्ये हे अभियान सुरू करण्यात येईल. पहिल्या टप्प्यात राज्यातील १ हजार गावांचा कायापालट कॉर्पोरेट्सच्या सहभागाने करण्यात येणार आहे. औद्योगिक संस्थांसोबतच धार्मिक संस्था व कला, क्रीडा क्षेत्रातील अनेक संस्थांनी व मान्यवरांनीदेखील या उपक्रमांमध्ये भरीव आर्थिक योगदान दिले आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक आकर्षित होत असताना पायाभूत सोयी-सुविधाही अत्याधुनिक असणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन मुंबई येथे वांद्रे-कुर्ला संकुलात जागतिक दर्जाचे आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, मुंबई सागरी मार्ग, शेंद्रा-बिडकिन दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर, नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्स्प्रेस वे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई, पुणे तसेच नागपूर येथील मेट्रो रेल्वे प्रकल्प, सेतूधारक प्रकल्पांतर्गत राज्यातील १२ मार्गांवर पूल, राज्यातील ९ प्रमुख रेल्वे प्रकल्प, अशा अनेक पायाभूत सोयी-सुविधांच्या प्रकल्पांना केंद्र शासनाच्या मदतीने गती देण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडले जाणार आहेत. या संपूर्ण मार्गांची अंमलबजावणी झाल्यानंतर सुमारे ७० लाख प्रवाशांना याचा फायदा होईल. मुंबई मेट्रो मार्ग -३ कुलाबा-वांद्रे-सिप्झ (लांबी ३३.५ कि.मी.) हा पूर्णतः भुयारी असणार असून या प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले आहे.

दहिसर ते चारकोप व अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) या दोन्ही मार्गांचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले असून या मार्गाचे काम सुरू झाले आहे. मोनो रेलच्या टप्पा २- संत गाडगे महाराज चौक ते वडाळा या मार्गाची चाचणी पूर्ण झाली असून लवकरच हा मार्ग प्रवासासाठी खुला होणार आहे.

## गतिमान आणि पारदर्शक

**रस्ते, रेल्वे, बंदरे इ. पायाभूत सोयी निर्माण करत असतानाच, प्रशासन अधिक पारदर्शक व गतिमान होण्याच्या दृष्टीने 'आपले सरकार' या वेबपोर्टलच्या माध्यमातून एकूण २०६ सेवा ऑनलाइन करण्यात आल्या आहेत. येत्या २ ऑक्टोबरपर्यंत सेवा हमी कायद्यातील सर्व सेवा ऑनलाइन होतील. येत्या डिसेंबर अखेरीस राज्यातील सर्व ग्रामपंचायती डिजिटल नेटवर्कने जोडण्यात येणार असून सर्वसामान्य माणसांना मोबाइलच्या एका क्लिकवर विविध सेवा उपलब्ध होणार आहेत. एकोणीसाव्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषदेच्या आयोजनाचा मान राज्याच्या उपराजधानीला मिळाला होता. कागदपत्रांचे स्वप्रमाणन (सेल्फ सर्टिफिकेशन) व स्वयंघोषणापत्र (सेल्फ ॲफिडेविट) बंद करण्याचा शासनाचा निर्णय, जनतेसाठी विशेषत: विद्यार्थ्यांसाठी खूप दिलासादायक ठरला आहे.**



### स्वच्छ महाराष्ट्र अभियान

राज्यातील शहरे आणि गावे स्वच्छ, सुंदर होण्यासाठी 'स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या' माध्यमातून आघाडी घेण्यात आली असून राज्यातील ५ शहरे, १६ तालुके व ७ हजार ८०० ग्रामपंचायती हागणदारीमुक्त घोषित करण्यात आल्या असून, सिंधुदुर्ग जिल्हा हा पश्चिम भारतातील पहिला हागणदारीमुक्त जिल्हा घोषित करण्यात आला आहे. क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या स्वच्छ सर्वेक्षणाच्या क्रमवारीनुसार घोषित करण्यात आलेल्या १० जिल्ह्यांपैकी ५ जिल्हे राज्यातले आहेत, हे विशेषत्वाने नमूद करण्यासारखे आहे.

### सामाजिक न्यायाला प्राधान्य

प्रगत राज्य म्हणून राज्याची वाटचाल होत असतानाच समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचा शासनाचा निर्धार आहे. त्यासाठी अनेक निर्णय गेल्या दोन वर्षांच्या काळात आम्ही घेतले. अनुसूचित क्षेत्रांतील ग्रामपंचायतींना अदिवासी उपयोजनेंतर्गत ५ टक्के निधीचे थेट अनुदान देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. त्यामुळे या भागाच्या विकासाला आणि आदिवासींच्या सक्षमीकरणाला गती प्राप्त झाली आहे. अंगणवाडी क्षेत्रातील गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता यांच्या उत्तम आरोग्यासाठी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना तसेच शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पौष्टिक, संतुलित, ताजा व रुचकर आहार वेळेवर उपलब्ध करून देण्यासाठी देशातील पहिले मध्यवर्ती स्वयंपाकगृह अशा योजना प्रभावीपणे राबवणारे महाराष्ट्र हे

**विकासासोबतच राज्यात शांतता व सुरक्षा राखण्याच्या दृष्टीने पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. पोलीस भरती, पोलिसांना अत्याधुनिक उपकरणे, शस्त्रास्त्रे, वाहने, पोलीस ठाणे, घरे उपलब्ध करून देणे, गुन्हा सिद्धतेचे प्रमाण वाढवण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम, न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची उभारणी, पोलीस मित्र ॲप अशा अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक यांसारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येत आहेत. सायबर गुन्हे रोखण्यासाठी एकाच दिवशी राज्यात ४२ सायबर लॅब सुरू करण्यात आले असून १ हजार पोलिसांना विशेष प्रशिक्षण देण्यात येत आहे. अनेक पोलीस सेवा ऑनलाइन करण्यात आल्या असून कालबाह्य परवाना पद्धती बदलण्यात आली आहे. पोलीस ठाण्यात न येता संकेतस्थळावर तक्रार नोंदवण्याची सोय प्रायोगिक तत्त्वावर पुणे येथे सुरू करण्यात आली आहे. पोलिसांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी उपाययोजना करत असतानाच पोलीस दलातील बदल्यांच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले. पोलीस गृहनिर्माण महामंडळातील प्रशासकीय मान्यतेचे अधिकार संचालक मंडळास देण्यात आले. या संपूर्ण प्रयत्नांमुळे राज्यातील गुन्ह्यांच्या प्रमाणात घट झाली आहे. जनतेच्या सुरक्षेसोबतच पोलिसांच्या सुरक्षेसाठी शासन कटिबद्ध आहे.**




वैशिष्ट्यपूर्ण राज्य ठरले आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी ५० वसतिगृहे, नोकरी करणाऱ्या महिलांसाठी मुंबई, पुणे व नागपूर या ठिकाणी वसतिगृहांची उभारणी, इंदू मिल तसेच लंडन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भव्य स्मारकाची उभारणी, डॉ.बाबासाहेब समता प्रतिष्ठानची स्थापना यासारख्या अनेक निर्णयांमुळे, सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यास मदत होत आहे. मराठा समाजाच्या मागण्यांविषयी सरकार सकारात्मक आहे. त्यांच्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना न्याय मिळावा, अशी शासनाची भूमिका आहे. त्यासाठी न्यायालयीन बाजू मांडण्यात शासन कमी पडणार नाही, याची मी ग्वाही देतो.

## महिला सुरक्षा

महिलांची सुरक्षा व सक्षमीकरणावरही शासनाने विशेष भर दिला असून, प्रत्येक जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ स्थापन करण्यात आल्या आहेत. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत ७ लाख लोकांना प्रशिक्षित करण्यात येत आहे. चाळीस हजार महिला सध्या प्रशिक्षण घेत आहेत. ४२ क्षेत्रांमध्ये विविध १५०० अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहे असून बेरोजगारांसाठी मोठ्या प्रमाणावर स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

'सर्वांसाठी घर' या संकल्पाच्या पूर्ततेसाठी गृहनिर्माण धोरणाची आखणी करण्यात येत आहे. अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तींना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या घरकूल योजनांचे एकत्रीकरण व सुसूत्रीकरण करण्यात आले आहे.

## हरित पर्यावरण

राज्याचा सर्वांगीण विकास करत असतानाच पर्यावणाचा विचारही प्रामुख्याने करण्यात येत आहे. १ जुलै २०१६ रोजी संपूर्ण राज्यभरात एकाच दिवशी २ कोटी ८४ लाख वृक्षांची लागवड करण्यात आली असून या कामगिरीची दखल लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये घेण्यात आली आहे. राज्याचे हिरवे आच्छादन वाढवून ३३ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी, येत्या ३-४ वर्षात ४० ते ५० कोटी वृक्ष लागवडीचे सरकारचे नियोजन आहे. वाघांसाठीचा जगातील पहिला कॉरिडॉर राज्यात निर्माण करण्यात येत आहे, ज्यायोगे वाघांचे तसेच परिसरातील जैवसाखळीचे संवर्धन करण्यात येईल. पर्यटन क्षेत्रातही राज्याचा दबदबा कायम असून २०१७ हे वर्ष 'व्हिजिट महाराष्ट्र' वर्ष म्हणून साजरे करण्याच्या दृष्टीने अनेक निर्णय घेण्यात येत आहेत.

## सर्वसमावेशकता

दोन वर्षांच्या कालावधीत टाकलेली आश्वासक पावले राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या वाटचालीत मोलाची ठरणार आहेत असा आम्हाला विश्वास आहे. अलीकडच्या काळात जाती-धर्मावरून राजकारण करण्याचा व समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न काही घटकांकडून केला गेला.

ॲट्रॉसिटी कायद्याचा (दलित अत्याचार प्रतिबंधक कायदा) दुरुपयोग होणार नाही याबाबत दक्षता घेण्याचे आदेश यंत्रणेला देण्यात आले आहेत. या विषयावर सर्वच समाजघटकांनी एकत्र येऊन मार्ग काढायला हवा, अशी आमची भूमिका आहे. आम्ही प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहोत. ठोस उपाययोजना करण्याची आमची मानसिकता आहे, हे मी प्रामुख्याने सांगू इच्छितो. राज्याच्या हिताला आमचे प्राधान्य असून, आमची यापुढची वाटचालही त्याच दिशेने सुरू राहील; याबाबत मी राज्यातील जनतेला आश्वस्त करू इच्छितो.

**शब्दांकन : मीनल जोगळेकर**

# मराठा प्रश्नावर सरकार सकारात्मक

**लाखोंच्या संख्येने मराठा समाज रस्त्यावर उतरलेल्या मराठा क्रांती मोर्चाचे परिणाम हा महाराष्ट्रातला कळीचा मुद्दा बनला आहे. प्रचंड शक्तीप्रदर्शन करतानाच अत्यंत शिस्तबद्ध अशा या मूकमोर्चांनी समाजजीवन ढवळून निघाले आहे. महिन्याहून अधिक काळ या मोर्चांचे आयोजन ठिकठिकाणी होत असताना आणि त्यानिमित्ताने मराठा समाजातील खदखद, असंतोष व्यक्त होताना सरकारकडून पहिल्यांदाच या विषयावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित, सह्याद्री वाहिनीवरील 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका मांडली. 'सकाळ' माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार यांना दिलेल्या विशेष मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी मराठा आरक्षण, कोपर्डी प्रकरणावरचा आक्रोश, अॅट्रॉसिटी कायद्यात सुधारणांची मागणी यासह; या मोर्चांच्या निमित्ताने समोर आलेल्या राजकीय आव्हानांवर मतप्रदर्शन केले.**

**पवार -** महाराष्ट्राच्या समाजजीवनात मोठ्या भावाचे स्थान असलेला मराठा समाज लाखोंच्या संख्येने रस्त्यावर उतरतो आहे. मराठा क्रांती मोर्चांच्या माध्यमातून कधीच अशा प्रकारे रस्त्यावर न आलेला हा समाज मूकपणे लक्ष वेधतो आहे. मराठ्यांमधील या मोर्चे निघाल्याचे उदाहरण क्वचितच असेल. मराठा समाज मुळातच लढवय्या आहे. शतकानुशतके तो संघर्ष करतच आला आहे. पण, लोकशाहीत आपलं म्हणणं मूक मोर्चाद्वारे मांडण्याचा निर्णय समाजाने घेतला यासाठी आयोजकांचं अभिनंदन करायला हवं.




माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित सह्याद्री वाहिनीवरील 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात मराठा आरक्षण व इतर प्रश्नांच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेताना सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार.

असंतोषाची कारणमीमांसा वेगवेगळ्या पद्धतीने सुरू आहे. राज्याचे मुख्यमंत्री या नात्यानं या मोर्चामागे कोणती सामाजिक, राजकीय, आर्थिक कारणे आहेत, असं आपल्याला वाटतं.

**मुख्यमंत्री -** मोर्चा निघण्यामागची कारणे पाहिली तर कोपर्डीतील अत्याचाराच्या घटनेची पार्श्वभूमी दिसते. ती घटना अत्यंत निंदनीय आहे यात शंकाच नाही. ते मोर्चांमागील एक कारणही आहे मात्र, त्यापलीकडेही मराठा समाजात वर्षानुवर्षे साचत आलेला आक्रोश या मोर्चातून समोर येतो आहे त्याची दखल घ्यायला हवी. या मोर्चांचं सर्वात महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे अत्यंत शिस्तबद्ध, संघटित आणि मूक मोर्चे निघताहेत. स्वतंत्र भारताच्या इतिहासात अशा प्रकारे इतक्या प्रचंड संख्येनं, इतक्या शांततेने कोणत्याही आंदोलनांपेक्षा अशा मूक मोर्चाचा दबाव अधिक येतो. एखाद्या सैन्यात असावी अशा शिस्तीने हे मोर्चे निघताहेत. महिला, मुलं, तरुण यात सहभागी होत आहेत. या मोर्चाचे आणखी काही अँगलही आहेत. मोर्चे सरकारच्या विरोधात आहेत का? तर माझ्या मते कोणतीही मागणी लोकशाहीत सरकारकडेच केली जाते. सरकारकडून अपेक्षा आहेच. मात्र त्याशिवायही समाजातले विस्थापित प्रस्थापितांच्या विरोधात आंदोलन करताहेत असंही याचं स्वरूप आहे.

**पवार -** म्हणजे मराठा समाजातले विस्थापित प्रस्थापितांच्या विरोधात आक्रोश करीत आहेत असं तुम्हाला म्हणायचं आहे काय?

**मुख्यमंत्री -** मला असं वाटतं की,

प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधातील विस्थापितांचा हा आक्रोश आहे. त्यात सगळ्या समाजाचे लोक आहेत, मराठा समाजाचेही आहेत. याच मराठा समाजातील नेते सातत्यानं मुख्यमंत्री, मंत्री किंवा अन्य महत्त्वाच्या पदांवर राहिले आहेत. त्याच वेळी या समाजातील मुलं मागेही आहेत. पदांवर असलेल्यांकडे पाहून मराठा समाजाचे आकलन करता येत नाही. आजही या समाजात गरीबी आहे. इच्छा असून शिक्षण घेता येत नाही अशी स्थिती आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या मागासलेपणाचा सामना समाजाला करावा लागतो. एकीकडे गावामध्ये थोरल्या भावाची भूमिका निभावायची आणि दुसरीकडे आपली दुःखं सांगता येत नाहीत, अशी स्थिती आहे. प्रस्थापित नेत्यांना म्हणूनच मोर्चांमध्ये जागा दिली जात नाही, त्यांना मागे उभे राहा असं सांगितलं जातं. त्यांची भाषणं होत नाहीत. याचा अर्थ समाजात आजवर ज्यांना आवाज नव्हता अशी सारी मंडळी यात संघटित होत आहेत.

**पवार -** मोर्चाला प्रतिमोर्चाची भाषा सुरू झाली. ती बोलणारे बहुतेक आपल्या पक्षाशी किंवा सहयोगी पक्षांशी जोडलेले आहेत. त्याचबरोबर प्रकाश आंबेडकर यांच्यासारखे नेते ही भाषा बोलणारे संघानं किंवा भाजपने पेरलेले लोक आहेत असं सांगतात...

**मुख्यमंत्री -** प्रकाश आंबेडकर किंवा रामदास आठवले हे प्रगल्भ नेते आहेत. अनेकदा राजकीय विधानं आपण करतो, पण आज ती वेळ नाही. आंबेडकर संघाबद्दल जे बोलले ते बाजूला ठेवू. पण ते प्रतिमोर्चे काढू नयेत, असं म्हणतात हेही ध्यानात घेतलं पाहिजे. आठवलेंच्या विधानातील राजकीय भाग सोडा, पण दलित, मराठा एकत्र आणून प्रश्न सोडवण्याची भूमिकाही ते मांडताहेत. ती योग्य आहे. अशा प्रश्नात राजकीय कंगोरे असतातच. मराठा मोर्चात ९५ टक्के स्वयंस्फूर्तपणे आले. ४-५ टक्के अन्यही आहेत. त्यातील काही राजकीय पुढारीपण मिळतं का हे पाहण्यासाठी आले असतील. माझ्या सरकारने सहकारात कडक नियम केले. ज्यांनी सहकार बुडवला त्यांच्यावर कारवाई झाली. त्यांनीच सांगायला सुरुवात केली की, आमचा सहकार बुडवायचा प्रयत्न आहे. सहकार मराठा समाजाच्या हातात आहे आणि सरकारच्या कारवायांमुळे तुमच्या नोकऱ्या जातील, असंही काही म्हणू लागले. काही शिक्षण सम्राट आहेत. त्यातील काहींचे हितसंबंध दुखावले आहेत. तेही विरोधात कारवाया करत आहेत, पण त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. मोर्चातील ९५ टक्के लोक एकाच विचारानं एकत्र आले आहेत.

**पवार -** सहकारातील सत्तास्थानं सातत्यानं काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मराठा समाजातील नेते भूषवत आले आहेत. सहकारातील तुमच्या कारवाईनं अस्वस्थ झालेल नेते असतीलही, पण त्याचबरोबर आपलाच आर्थिक पाहणी अहवाल सांगतो, सहकारातून चार वर्षांपूर्वी होणाऱ्या उत्पादनाचं मूल्य मागच्या वर्षी निम्म्यावर आलं आहे. राज्यात साडेपाच कोटी लोक सहकाराशी जोडलेले आहेत.

## जलयुक्त शिवारातून 'जलक्रांती'



**पवार -** मागची काही वर्षे दुष्काळात गेली. जलयुक्त शिवारची कामेही याच काळात झाली. मात्र, ग्रामीण भागात शेतीच परवडणारी उरली नाही आणि याच व्यवसायावर मराठा समाज मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. साहजिकच शेतीचे संकट, न वाढणारे शेतमालाचे भाव हे मराठ्यांवरीलही संकट बनले. आपण स्मार्ट सिटीसारख्या योजना शहरात राबवता तशा ग्रमीण भागातही नागरी सुविधा आणि शेतीत पुरेसे उत्पन्न मिळेल अशी व्यवस्था आणू शकणाऱ्या स्मार्ट व्हिलेजसारख्या कल्पना राबवण्याची गरज आहे, या सगळ्याकडे कसं पाहता?

**मुख्यमंत्री -** हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आपली ८२ टक्के शेती पावसावर अवलंबून आहे. ७० हजार कोटी रुपये खर्चून केवळ ०.१ टक्का सिंचनक्षेत्र वाढलं हा विषय मागची पाच वर्षे गाजतो आहे. म्हणून आम्ही जलयुक्त शिवारसारखी योजना आणली. ती क्रांती घडवते आहे. यातून पाच वर्षात २० हजार गावं दुष्काळमुक्त होतील. सोबतच अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करीत आहोत. शेती परवडत नाही, याचं कारण शेतीची उत्पादकता वाढत नाही. त्यातील गुंतवणूक वाढायला हवी. शेतीला ८ लाख कोटी कर्ज देतो, पण खरी गुंतवणूक हजार कोटीही होत नाही. आम्ही शेतीत गुंतवणूक वाढवतो आहोत. यावर्षी २५ हजार कोटींचे शेतीचे बजेट तयार केले. दुष्काळात १८ हजार कोटी थेट शेतकऱ्याला दिले आहेत. बाजार समितीच्या जोखडातून शेतकऱ्याला मुक्त केले. शेतीत गुंतवणूक वाढवण्यावर भर आहे. शेतीत मूल्यवर्धन होत नाही तोवर शेतीचे प्रश्न सुटत नाहीत. यासाठी प्रक्रिया उद्योगांवर भर देतो आहोत. शेतीचे क्षेत्र आम्ही यातून बदलून दाखवू.

## मराठा आरक्षण : निकाल आमच्याच बाजूने लागेल...

**पवार -** या मोर्चातून ठोसपणे समोर आलेली एक मागणी आहे, मराठा समाजाला आरक्षण देण्याची. कोणताच पक्ष आरक्षण देऊ नका असे म्हणत नाही. आपल्या पक्षानेही निवडणुकीत मराठ्यांना आणि धनगरांना आम्हीच आरक्षण देऊ असं सांगितलं होतं. मराठा समाजातील तरुणांमध्ये शिक्षण, नोकरीतल्या संधी मिळत नाहीत ही खदखद आहे. आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकार काय करते आहे?

**मुख्यमंत्री -** मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे हे माझं ठाम मत आहे. ही राजकीय मागणी नाही, ती सामाजिक मागणी आहे. मागच्या सरकारनं आरक्षण कधी दिलं? प्रामाणिक असते तर १५ वर्षे सत्तेत होते तेव्हा दिलं असतं. लोकसभेच्या निवडणुकीत ४८ पैकी ४२ जागा हरल्यानंतर अचानक त्या सरकारला जाग आली. आणि अध्यादेश काढून आरक्षण दिलं. कायदा नाही केला. खास अधिवेशन बोलावता आलं असतं. तेही नाही केलं. वर सांगतात आमचं सरकार आलं आणि आरक्षण अडकलं. मी तारखेसहित सांगतो. जेव्हा या प्रकरणाची न्यायालयात सुनावणी झाली तेव्हा त्यांचेच सरकार होते. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर केवळ स्थगितीचा न्यायालयीन निर्णय आला. लगेच टीका सुरू झाली, या सरकारने बाजू मांडली नाही. पण तेव्हा तर तुमचंच सरकार होतं. आम्ही सत्तेत आल्यानंतर आधीच्या सरकारने नेमलेले चांगले वकील कायम ठेवले. सत्तेवर आल्यानंतर लगेच कुठल्या निवडणुका नव्हत्या. पण तरीही आम्ही तातडीनं आरक्षणाचा कायदा केला. आरक्षणाच्या मुद्द्यावर अप्रामाणिक असतो तर आम्ही हे का केलं असतं. आमच्या कायद्यालाही स्थगिती मिळाली. आता न्यायालयाने स्थगिती देण्याची कारणं दिली आहेत. सामाजिक मागासलेपणाचे पुरावेच दिले गेले नव्हते म्हणून आम्ही विनोद तावडेंच्या नेतृत्वाखाली समिती नेमली. सर्व पक्षांचे सदस्य घेतले, निष्णात वकिलांची मदत घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासूनची १२०० कागदपत्रे आम्ही शोधली. त्यातून मराठ्यांचे मागासलेपण दाखवून देणारे ७० पुरावे गोळा केले. ते न्यायालयासमोर आम्ही मांडतो आहोत. या प्रश्नावर आम्ही गंभीर आहोत. निकाल आमच्या बाजूने लागेल, असे वाटते. आता काही जण सर्वोच्च न्यायालयात गेले. तिथेही आम्ही त्यांना सहकार्यच करतो आहोत. आमची भूमिका स्पष्ट आहे. न्यायालयाने काही त्रुटी दाखवल्या तर पुन्हा त्या दूर करून, नवा कायदा करू. पण मराठा समाजाला आरक्षण मिळायलाच हवे.

त्याचा परिणाम सहकाराशी जोडलेल्या सामान्य माणसांवरही झाला आहे.

**मुख्यमंत्री -** चार वर्षात आपल्याकडे सातत्यानं दुष्काळ आहे. शेतीचा विकासदर सातत्यानं उणे आहे. सहकारी संस्थांसाठी लागणाऱ्या शेतीमालाचे उत्पादन कमी झालं आहे. सहकारात कारवाई करतानाच साखर कारखान्यांना पॅकेज आम्हीच दिलं. याचा लाभ मिळणारा तो सामान्य शेतकरीच आहे. त्यात मोठ्या संख्येने मराठा आहेत. ज्यांनी सत्तास्थाने स्वहितासाठी चालवली, त्यांनाच सहकारातून दूर केले, पण तिथे आलेले त्याच मराठा समाजाचे आहेत. असे असूनही काही जण आपल्या लाभासाठी अस्वस्थता तयार करण्याचा प्रयत्न करत आहेत.

**पवार -** या मोर्चांमागे राजकारणात दुखावलेले घटक आहेत का? यात आपल्या पक्षाचे लोक असतील, विरोधी पक्षातले असतील. हे सर्वजण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहेत का?

**मुख्यमंत्री -** मोर्चा उत्स्फूर्त आहे, पण 'बहती गंगा में हात धो लो' असा प्रयत्न काही लोक जरूर करतील. माझ्या पक्षातील कोणी असे करेल असे वाटत नाही. पण, इतर राजकीय पक्षातले लोक करतीलच. आम्ही कडक भूमिका घेतो, यातून दुखावलेले लोक आहेतच. पण हे सारे प्रश्न काही मी मुख्यमंत्री झाल्याने तयार झाले नाहीत. मला येऊन दोनच वर्षे झाली. हे प्रश्न अनेक वर्षांपासून आहेत. वर्षानुवर्षे राज्य करणारे हे प्रश्न सोडवू शकले नाहीत. आम्ही प्रश्न सोडवायचा प्रयत्न करतो आहोत. हे कृतीतून दाखवतो आहोत, काहींना असं वाटतं की, ते मला हटवू शकतील किंवा माझ्यावर प्रहार करू शकतील, पण त्यानेही समाजाचे प्रश्न सुटणार नाहीत. मी गेलो आणि दुसरा कोणी आला तरी लगेच स्थिती बदलणार नाही. खरे तर १५ वर्षे सत्तेवर राहिले त्यांनी काही केलं नाही म्हणून तर आम्हाला लोकांनी सत्तेवर आणले आहे.

**पवार -** विरोधक असतील किंवा जिल्हानिहाय मोर्चे संघटित करणारे मराठा समाजातील कार्यकर्ते असतील, या सगळ्यांशी चर्चेची सरकारची तयारी आहे काय?

**मुख्यमंत्री -** नक्कीच तयारी आहे. माझी जिल्हानिहाय बोलायची तयारी आहे. मंत्र्यांचा गट तयार करून विरोधी पक्षाच्या नेत्यांना घेऊन त्यांना अधिकार देऊन प्रत्येक जिल्ह्यात प्रमुख संघटकांशी चर्चा करायची तयारी आहे. ठोस उपाययोजना व्हावी हीच आमची मानसिकता आहे. सगळी चर्चा केल्यानंतर आम्ही निर्णय घेतला नाही तर दोष द्या, पण आम्हाला निर्णय घेण्याची संधी तरी द्या! सरकारमध्ये काम करणाऱ्यांनाच सारे समजते, असा आमचा अजिबात ग्रह नाही. बृहत समाजाला सरकारपेक्षा अधिक कळतं, त्याच्याकडून समजून घेऊन मार्ग काढू.

**पवार -** औरंगाबादचा महिला मोर्चा निघाल्यानंतरही महिना उलटला. या काळात मराठा समाजात खदखदणारा असंतोष समजून घेण्यात राजकीय नेतृत्वाला अपयश आलं काय?

**मुख्यमंत्री :** मला वाटतं हो. आक्रोश दिसत होता; पण तो इतक्या मोठ्या प्रमाणावर आहे हे लक्षात येत नव्हतं. काही लोक म्हणतात तुमचं राज्य आलं म्हणून हे सुरू झालं. आमचं राज्य आल्यानं या समस्या तयार झालेल्या नाहीत. आज आम्ही राज्यकर्ते आहेत. इतकी वर्षं वेगळे राज्यकर्ते

ही होते; परंतु कुणाला हा आक्रोश समजून घेता आलेला नाही. इतकी वर्षं या मुद्द्यांना प्रतिसाद द्यायला हवा होता, तो दिला गेला नाही. त्यातून हे प्रश्न तयार झाले आहेत. तरुणांना शिकण्याची इच्छा आहे. संधी मिळत नाही हा त्यांचा सल आहे... ॲट्रॉसिटीचा विषय यात आहे. पण, तो एकच प्रमुख विषय नाही. तो मुद्दा आहे. त्या कायद्याचा काही प्रमाणात दुरुपयोग होतो. गावागावात त्यावरून भांडणं लागली आहेत. यामागे अनेक कारणं आहेत; ती सर्व समजून, त्यावर उपाय सुचवत नाही तोवर हे विषय संपणारे नाहीत.

**पवार -** मराठा क्रांती मोर्चाचं एक वैशिष्ट्य आहे, हे मोर्चे उघड काहीच बोलत नाहीत. कदाचित त्यामुळे बराच काळ त्यांचं म्हणणं समजून घेण्यात गेला. आता यातल्या काही मागण्या समोर आल्या आहेत. यातली एक प्रमुख मागणी आहे ॲट्रासिटी किंवा दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्यात सुधारणा करण्याची. या कायद्याच्या गैरवापरातून सामान्य मराठा कुटुंबातील मुलं भरडली जातात, असं मोर्चात सहभागी होणारे दाखवून देतात. मुख्यमंत्री आणि भाजपाचे नेते या नात्यानं या कायद्यात सुधारणा करण्याच्या मागणीकडे कसे पाहता?

**मुख्यमंत्री -** मुळात मीही अनेकांशी चर्चा करतो आहे. मराठा समाजातील अनेक घटकांशी बोलतो आहे. साधारणतः कायदा रद्द करावा, अशी मागणी नाही; तर त्यात बदल करावा अशा प्रकारची आहे. काही प्रमाणात या कायद्याचा गैरवापर केला. सर्वांनीच तो केला, असं नाही; पण काहींच्या गैरवापराचे पडसाद मोर्चात उमटत आहेत. विशेषतः गटातटांच्या राजकारणातही या कायद्याचा वापर झालेला आपण पाहिला आहे. यातला महत्त्वाचा भाग काय, तर दलित समाजातल्या नेत्यांनाही विचारलं, तर तेही म्हणतील, याचा दुरुपयोग होतो आहे. कायदा दुरुपयोगासाठी नाही. असे प्रश्न समाजातल्या वेगवेगळ्या घटकांनी एकत्र बसून सोडवायला हवेत, ही प्रगल्भता आपण दाखवायला हवी. दलित, सवर्ण, मराठा, ओबीसी असतील, या सर्वांनी एकत्र येऊन कायद्याचा दुरुपयोग कसा टाळता येईल, यावर विचार केला पाहिजे. हे करताना जातीय सलोखा टिकला पाहिजे. मराठा समाजानं मोर्चा काढला की, दलित समाजानं मार्चा काढू म्हणायचं हे माझ्या मते योग्य नाही. मराठा समाजाचे मोर्चे कोणा जातीच्या विरोधात नाहीत. दलितांच्या विरोधात हे मार्चे नाहीत. त्यात ॲट्रॉसिटीचा एक विषय आहे; पण त्याखेरीज अनेक मुद्दे आहेत. त्याला प्रतिमोर्चानं उत्तर द्यावं, या प्रकारची भूमिका घेऊ नेये. दलित समाजाला विनंती आहे की, मोर्चाला प्रतिमोर्चा काढू नये. हे प्रश्न लोकशाहीत चर्चेनं सोडवता येतात. दलितांना संरक्षण मिळायलाचं हवं. त्याचबरोबर दुरुपयोग टाळण्यासाठी काय करायला हवं, याविषयी दलित नेतेही मदत करू शकतात. सर्व समाजाच्या नेत्यांशी चर्चा करण्याचा मी प्रयत्न करतो आहे. सारे एकत्र आले, तर हा प्रश्न सुटणारा आहे. यापूर्वी महाराष्ट्रात अनेक सामाजिक प्रश्न आपण चर्चेने सोडवले आहेत.

**पवार -** गृह खात्याचा ताण कमी करायची गरज वाटते का?

**मुख्यमंत्री -** कोपर्डीची घटना भयानकच आहे. त्यात आरोपींना फाशी व्हायला हवी यात दुमत होऊ शकत नाही. त्यासाठी आम्ही ॲडव्होकेट उज्ज्वल निकम यांना नियुक्त केलं आहे. यातील अपराध्यांना फाशी होईल, असा विश्वास वाटतो. राहिला मुद्दा कायदा सुव्यवस्थेचा. घडलेल्या घटना गंभीर आहेत. पण मी आकडेवारीनं दाखवू शकतो, मागच्या राजवटीत घडलेल्या घटनांच्या तुलनेत आता त्या कमी झाल्या आहेत. किती आरोपींना शिक्षा होते हाही मुद्दा असतो. राज्यात हा दर ९ टक्क्यांवर आला होतो. आता शिक्षा होण्याचे प्रमाण ५२ टक्के झाले आहे. ही व्यवस्था एका दिवसात बदलत नाही. शेवटी आव्हानापासून पळता येत नाही. समजा, माझ्याऐवजी कोणी दुसरे गृहमंत्री झाले, तर लगेच गुन्हेगारांना अपराध करू नये, असे वाटू लागणार नाही. गुन्हेगारी ही प्रवृत्ती आहे; त्यावर किती हल्ला करतो हे महत्त्वाचं. तो मोठ्या प्रमाणात करतो आहोत. आव्हानं आहेतचं. मी पूर्णतः समाधानी नाही. पोलिसांवरील हल्ले चुकीचेच आहेत. ही सारी प्रकरणं जलदगती न्यायालयात नेत आहोत. पोलिस आणि प्रशासन गुन्हेगारीला नक्की आळा घालू शकेल.

मराठा समाजाच्या मागण्याविषयी सरकार सकारात्मक आहे. चर्चेला तयार आहे. त्यामुळे मोर्चा काढल्यानंतर त्यातून मागण्या सोडवण्याचा, आक्रोशाची दखल घेण्याचा अधिकार लोकशाहीनं सरकारला दिला आहे. चर्चाच करणार नाही, सरकारकडे चर्चेला जाईल तो बेईमान, अशा प्रकारची भूमिका मांडण्याच प्रकार चुकीचा आहे.

आम्ही प्रश्न सोडवायचा प्रयत्न करतो आहोत. काहींना वाटतं की, मला हटवू शकतील किंवा माझ्यावर प्रहार करून शकतील; पण त्यानंही समाजाचे प्रश्न सुटणार नाहीत. मी गेलो आणि दुसरा कोणी आला तरी लगेच स्थिती बदलणार नाही. ठोस उपाययोजना व्हावी हीच आमची मानसिकता आहे. सगळी चर्चा केल्यानंतर आम्ही निर्णय घेतला नाही, तर दोष द्या; पण आम्हाला निर्णय घेण्याची संधी तरी द्या!

सरकारमध्ये काम करणाऱ्यांनाच सारं समजतं, असा आमचा अजिबात ग्रह नाही. बृहत समाजाला सरकारपेक्षा अधिक कळतं, त्याच्याकडून समजून घेऊन मार्ग काढू.

**(साभार: दैनिक सकाळ)**



**पवार - आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील सवलतपात्र उत्पन्नाची सध्याची एक लाखाची मर्यादा वाढवणार का?**

**मुख्यमंत्री - ही मागणी अत्यंत योग्य आहे. मराठा समाजात आर्थिक मागासलेपण मोठ्या प्रमाणात आहे. मूळचा शेतकरी असलेला घटक, शेती अडचणीत आल्यानंतर संकटात सापडला आहे. शिक्षणाचा खर्चही वाढतो आहे. इबीसीची उत्पन्नमर्यादा वाढली पाहिजे, यासाठी योग्य निर्णय घेऊ.**

# समृद्धी आणि सुविधा



**चंद्रकांत (दादा) पाटील**
महसूल, मदत व पुनर्वसन,
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

**दळणवळण आणि पायाभूत सुविधा विकासाची गती निर्देशित करतात. म्हणूनच रस्ते विकासाला प्राधान्य दिले. रस्त्यांची कामे करताना नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला. विविध महामार्ग तयार करण्याचे काम सुरू आहे. राज्यभर रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी आम्ही प्राधान्य देत आहोत.**

महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी अग्रेसर राज्य असल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून, राज्यात पायाभूत सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्राधान्य दिले आहे. याचा परिपाक म्हणून गेल्या दोन वर्षात राज्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या लांबीत ९८४.५० कि. मी. वाढ झाली. तर १०,८५१ कि. मी. च्या वाढीव राष्ट्रीय महामार्गास मान्यता मिळाली. केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत २५४ कामांना आणि रेल्वे क्रॉसिंगमुळे वाहतुकीत येणारे अडथळे दूर करण्यासाठी २१ रेल्वे उड्डाणपुलांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. ऑक्टोबर २०१५ मध्ये राज्यभरात एकाचवेळी १००० रस्त्यांची कामे सुरू करण्यात आली आहेत. त्यापैकी ४० टक्के कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतिपथावर आहे.

लेव्हल क्रॉसिंगवर एक लाखांपेक्षा जास्त वाहतूक वर्दळ असलेल्या ठिकाणी १६८ रेल्वे उड्डाणपूल बांधण्यासाठी केंद्र शासनाचे अर्थसाहाय्य प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

### पुलांचे परीक्षण

सावित्री नदीवरील पूल कोसळण्याच्या घटनेनंतर राज्यातील २२०० मोठ्या पुलांचे परीक्षण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. ५० लाखांपेक्षा जास्त किंमतीच्या इमारती, रस्ते व पुलांच्या कामांची देयके तयार करण्यासाठी संगणकीकृत ई-मोजमाप व ई-देयके प्रणालीचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे.

### हरित इमारत संकल्पना

पर्यावरणाचे संतूलन राखणे व संवर्धन करण्यासाठी शासनाच्या सर्व इमारतींचे नकाशे व आराखडे हरित इमारत संकल्पनेचा वापर करून तयार करण्यात यावेत. तसेच इमारतींची दुरुस्ती हाती घेतानाही ही संकल्पना लक्षात घेऊन उपाययोजना कराव्यात, यावर भर देण्यात येईल.

### टोलमुक्तीचा दिलासा

पहिल्या टप्प्यामध्ये ३१ मे, १५ पासून राज्यातील ९१ पैकी १२ टोलनाके पूर्णत: बंद करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ७९ पैकी ५३ टोलनाक्यांवर कार, जीप, एस.टी. व स्कूल बसेसना टोल मुक्ती देण्यात आली आहे.

नाशिक - त्र्यंबकेश्वर येथे पार पडलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्यानिमित्ताने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रिंगरोड, गोदावरी नदीवरील पुल, रेल्वे उड्डाणपूल, विश्रामगृहासह नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे रुग्णालयाची ४३ कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

### बळीराजा चेतना अभियान

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी बळीराजा चेतना अभियान राबवण्यात येत आहे. याअंतर्गत विविध उपाययोजना करण्यासाठी यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यांची निवड केली आहे.

आर्थिक संकटात असलेल्या कुटुंबाला साहाय्य करण्यासाठी व आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून प्रत्येक गावाच्या समितीस १ लाख रुपये रोख रक्कम उपलब्ध करून देण्यात येत आहे. शेतकऱ्यांना धीर देऊन त्यांच्या मनामध्ये जगण्याची प्रेरणा निर्माण करून, त्यांना आत्महत्येपासून परावृत करण्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती शेतकऱ्यांचे मनोबल उंचावणे व शेतकऱ्यांच्या मनामध्ये जगण्याची प्रेरणा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. यवतमाळ व उस्मानाबाद जिल्हाधिकारी कार्यालयात अवर्षणामुळे बाधित शेतकऱ्यांचे कामकाज करण्यासाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

खरीप हंगामासाठी विदर्भातील गावांकरिता २०१७ कोटी रुपये, रब्बी हंगामासाठी अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातील गावांकरिता १२६९.७३ कोटी रुपये, टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी ४१६.९३ कोटी रुपये, चारा छावण्याकरिता ५६५ कोटी रुपयांची मागणी केंद्र शासनाकडे केली आहे.

**शासनाने २०१५ खरीप हंगामाकरिता ३४३८.९५ कोटी रुपयांचा निधी वितरित केला असून ३२६३.२१ कोटी इतका निधी थेट ५६ लाख ६० हजार ७३३ शेतकऱ्यांना वाटप केला आहे.**

### नोंदणी शुल्क माफ

कुटुंबातील पती, पत्नी, मुलगा, मुलगी, नातू, नात व मरण पावलेल्या मुलाची पत्नी यांना निवासी/कृषी मालमत्ता बक्षीस दिलेली असल्यास मुद्रांक शुल्काची रक्कम २०० रुपये करण्यात आली आहे. या कारणासाठी १ एप्रिल २०१६ पासून नोंदणी शुल्काची रक्कमही २०० रुपये इतकी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना २.५ लाख रुपयापर्यंतच्या शेती आणि पीक कर्जाशी संबंधित निष्पादित केलेल्या अधिस्वीकृती, रोखपत्र, करारनामा, हक्कविलेख निक्षेप, हडप, तारण किंवा तारणगहाण, हमीपत्र, गहाणखत किंवा त्यांच्याशी संलग्न कोणत्याही संलेखावर १ एप्रिल १६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत नोंदणी शुल्क माफ करण्यात आले आहे. मोफा अधिनियम १९६३ मधील तरतुदीनुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या मानीव अभिहस्तांतरणपत्राच्या दस्तांच्या नोंदणीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे कमी करण्यात आली आहे.




### औद्योगिक वापर प्रक्रिया

उद्योजकास आवश्यक अधिकृत माहिती एकत्रितरीत्या उपलब्ध होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरावर अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली औद्योगिक अकृषिक वापर सहाय्यभूत समिती गठित करण्यात आली आहे. औद्योगिक वापरासाठीच्या व अकृषिक प्रयोजनार्थ शेतजमीन खरेदी-विक्री प्रक्रियेसाठी शेतजमीन खरेदीविषयक पूर्व परवानगी घेण्याची तरतूद वगळण्यात आल्याने औद्योगिक व आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. नागरी भागातील जमिनींना तुकडे बंदीविषयक निर्बंधापासून सूट देण्यात आली आहे.

### अर्धन्यायिक महसूल प्रकरणे

अर्धन्यायिक प्रकरणांचा सत्वर निपटारा व्हावा, दाखल झालेल्या/होणाऱ्या अपील/पुनर्विलोकन अर्जाची सद्य:स्थिती जनतेस सहज उपलब्ध व्हावी. यासाठी महसूल विभागाने e-DISNIC ही ऑनलाइन प्रणाली राज्यभरात लागू केली आहे.

### १५ सेवा ऑनलाइन

लोकसेवा हक्क अधिनियमानुसार महसूल विभागामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुरविण्यात येणाऱ्या ४८ सेवांबाबत अधिसूचना निर्गमित केल्या असून या पैकी १५ सेवा नागरिकांसाठी ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### महाराजस्व अभियान

१ ऑगस्ट २०१५ ते ३१ जुलै २०१६ या कालावधीत महाराजस्व अभियान राबवण्यात आले. या मोहिमेत ४० लाख ५३ हजार ६८८ विविध दाखल्यांचे वाटप, ५,५७,१८२ विस्तारित स्वरूपातील समाधान योजना, ४,८३४ अर्धन्यायिक प्रकरणांची निर्गती, ७८,०१७ प्रकरणे ई-फेरफार अदालत घेऊन निकाली, ३५,५९६ गावांमध्ये ई-फेरफार सुविधांची उपलब्धता, २४,६२५ गाव दप्तरी नोंदींची अद्यावतीकरण, १२,६३२.८८ कि.मी. लांबीचे ८,६३३ रस्त्यांचे मोकळीकरण, ६२०४.९४ हेक्टर क्षेत्रांवरील अतिक्रमणे निष्कासिक, ४३,९२० भोगवटदार दोन जमिनीच्या प्रमाणित डाटा बँकेची निर्मिती.

### केबल सर्वेक्षण

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांत क्षेत्रीयस्तरावर स्थानिक केबल परिचालक व बहुविध यंत्रणा परिचालक यांचे विनाक्रम सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणानंतर केबल जोडण्यांच्या संख्येत ३,६७,७७४ इतकी वाढ झाली तर करमणूक शुल्काच्या वसुलीत ११,९८९.२१ लाख रुपये इतकी वाढ झाली आहे.

### गौण खनिज दरात सुधारणा

गौण खनिजांच्या दरात सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणांद्वारे प्रादेशिक आराखड्यामधील निवासी/वाणिज्यिक/औद्योगिक/अकृषिक क्षेत्रामधील कृषिक जमीन, अकृषिक धारकांना खरेदी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या परवानगीची आवश्यकता राहणार नसल्याची तरतूद करण्यात आली आहे. महसूल विभागाने गेल्या दोन वर्षात मुंबई व नागपूर मेट्रोबरोबरच केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना जमिनी उपलब्ध करून दिल्या आहेत.

**शब्दांकन : विलास बोडके**




**सुधीर मुनगंटीवार**

वित्त आणि नियोजन, वन मंत्री


# समाजहिताचे अर्थभान

सामाजिक जाणिवांचा विस्तार करताना अर्थविकासाची गती वाढवणे, विषमतामुक्त समाजाची निर्मिती करणे आणि अडचणीत असलेल्या समाज घटकाला मदत करताना, त्याच्यापर्यंत पोहोचणाऱ्या वाटा रुंद करणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन आम्ही चालायला सुरुवात केली आहे.

याची सुरुवात मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान जनधन योजनेपासून झाली मग पंतप्रधान सुरक्षा योजना, पंतप्रधान जीवनज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना असो किंवा मुद्रा बँकेसारखी योजना असो या सर्व योजनांकडे पाहिल्यानंतर कौशल्याधारित, प्रशिक्षित मनुष्यबळाची निर्मिती करताना 'मेक इन इंडिया'साठी त्यांनी दिलेली साद आणि त्याला मिळालेला प्रतिसाद आमच्या उद्दिष्टाप्रतीच्या वाटचालीची साक्ष देतो.

'फंडिंग टू अनफंडेड पेन्शन टू अनपेन्शन्ड' या संकल्पना प्रधानमंत्र्यांनी पुढे आणल्या. यातून सामाजिक समतेची अनोखी क्रांती झाली. प्रधानमंत्र्यांचा 'मेक इन इंडिया'चा नारा जीएसटीच्या एकमताच्या मान्यतेने; देशाला मेक इंडिया वनकडे घेऊन गेला. विषमतामुक्त समाजाच्या निर्मितीची ती एक महत्त्वाची पायरी आहे. राज्यात पंतप्रधान जनधन योजनेंतर्गत १ कोटी ४५ लाखांहून अधिक खाती उघडली गेली. त्यात २३५३.१३ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या. उघडण्यात आलेल्या खात्यांपैकी एक कोटी एक लाख ६९ हजारांपेक्षा अधिक खाती आधार योजनेशी जोडण्यात आली. तर योजनेंतर्गत एक कोटी २० लाख ६२ हजार खातेदारांना रूपी कार्ड वितरित करण्यात आले. असेच मुद्रा बँकेचे. मुद्रा बँकेच्या माध्यमातून या युवकांचे हात बळकट करण्याचा प्रयत्न झाला. कुशल महाराष्ट्राच्या निर्मितीचा हा आधारस्तंभ आहे. शिशु, किशोर आणि तरुण गट असे मिळून सन २०१६-१७ मध्ये ८ लाख ९९ हजार ३७६ बेरोजगार युवकांना त्यांच्या मुद्रा बँक खात्यातून ३५६६.८२ कोटी रुपयांचे कर्ज राज्यात वितरित झाले आहे.

> विकासापासून वंचित माणसाला आर्थिक, सामाजिक सुरक्षितता देणारी धोरणे राबवणे, त्याच्या कौशल्यात भर टाकून रोजगाराच्या व्यापक संधी निर्माण करणे आणि राज्याचा पर्यावरणस्नेही शाश्वत विकास करणे यासाठी अधिक वेगाने आणि दृढ संकल्पाने पुढे जाण्याची गरज आहे.

## सामाजिक परिवर्तनाची नांदी

सामाजिक सुरक्षिततेला अर्थकवच देणाऱ्या तीन विमा योजनांमुळे आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाला गती मिळाली आहे. योजनेचा हप्ता प्रतिवर्षी प्रतिव्यक्ती १२ रुपये असलेल्या पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेतून राज्यात १ कोटी १२ लाख ७६ हजार ५५९ व्यक्तींनी विमा उतरवला. प्रतिव्यक्ती ३३ रुपयांचा वार्षिक हप्ता असलेल्या पंतप्रधान जीवनज्योती विमा योजनेमध्ये राज्यात ७३ लाख २५ हजाराहून अधिक व्यक्तींनी याचा लाभ घेतला. अटल पेन्शन योजनेचा २६ लाख ५० हजार ४०२ नागरिकांनी लाभ घेतला.

## सामाजिक हिताचे निर्णय

■ मृत्यू पावलेल्या एकट्या (अविवाहित किंवा कुटुंब अस्तित्वात नसलेला एकटा) शासकीय कर्मचाऱ्यावर संपूर्ण अवलंबून असलेल्या त्याच्या आईवडलांना कुटुंब निवृत्तीवेतन. कुटुंबाची व्याख्या सुधारली. ■ शासकीय कर्मचाऱ्यांना देय असलेल्या रजा प्रवास सवलतीतील (स्वग्राम/ महाराष्ट्र दर्शन) तरतुदीत सुधारणा. कुटुंबाची व्याख्या बदलली. ■ ८० वर्षे व त्यावरील निवृत्तीवेतन/ कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांच्या निवृत्ती वेतनात १ एप्रिल २०१४ पासून १० टक्के वाढ ■ सैनिकी सेवेतून सेवानिवत्त होऊन १ नोव्हेंबर २००५ पूर्वी राज्य शासनाच्या सेवेत नागरीपदावर पुनर्नियुक्ती झालेल्या माजी सैनिकाचा सेवेत असताना/सेवानिवत्तीनंतर मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबास सैनिकी व नागरी अशा दोन्ही सेवेतील कुटुंब निवत्तीवेतन देण्याचा निर्णय ■ विधवा महिलेने पुनर्विवाह केल्यानंतर तिची पूर्वीच्या पतीची पेन्शन कायम सुरू ठेवणे ■ शासनाच्या सेवेत भरतीच्या मान्यतप्राप्त माध्यमाने रुजू झालेल्या आणि दोन वर्षांपेक्षा कमी सेवा झालेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास पूर्णवेतनी प्रसूती रजा मंजूर करताना सेवा कालावधीची अट शिथिल ■ सरोगसी पद्धतीने जन्मलेल्या अपत्याचे संगोपन करण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांस

१८० दिवसांची विशेष रजा ■ चतुर्थ श्रेणी वर्गातील पदोन्नतीच्या टक्केवारीत २५ टक्क्यांहून ५० टक्के इतकी वाढ ■ शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेचा कर्मचाऱ्यांना लाभ ■ शासकीय निवृत्ती वेतनधारकांना हयातीच्या डिजिटल दाखल्याची सुविधा.

**अनेक अडचणींचा सामना करत असताना राज्याचा विकासदर ८ टक्क्यांवर नेऊन ठेवण्यात यश आले आहे.**

### व्याघ्र संवर्धन

राज्यात ६ व्याघ्र प्रकल्प आहेत, तर विदर्भाला देशाची व्याघ्र राजधानी म्हटले जात आहे. राज्यात २००६ साली १०३ वाघ होते. ते २०१४ मध्ये वाढून १९० इतके झाले. मेळघाट, पेंच, ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्पाला २०१४-१५ मध्ये अत्युत्कृष्ट शेरा मिळाला आहे. ताडोबा अंधारी, नवेगाव-नागझिरा किंवा मेळघाट व्याघ्र प्रकल्प येथे विशेष व्याघ्र संरक्षण दलाची निर्मिती केली आहे.



### वृक्ष लागवडीचा लोकोत्सव

**वन विभागाने १ जुलै २०१६ रोजी दोन कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प केला होता. एकाच दिवशी राज्यात २ कोटी ८२ लाख झाडे लागली. याची नोंद लिम्का बूक ऑफ रेकॉर्डने घेतली आहे. या दिवशी राज्यभरात वृक्ष लागवडीचा लोकोत्सव साजरा झाला. लोकसहभागातून वृक्षक्रांती झाली. आता पुढच्या म्हणजे १ जुलै २०१७ ला एकाच दिवशी ३ कोटी झाडे लावायची आहेत, तर तीन वर्षात ५० कोटी.**

### मदतीत वाढ

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात व्यक्तीचा मृत्यू पावला तर देण्यात येणारे अर्थसाहाय्य ५ लाख रुपयांवरून वाढवून ते ८ लाख इतके केले आहे. वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पिकांच्या हानीबाबतही निर्णय घेतला आहे. यातही दुप्पट वाढ केली आहे. ही सेवा हमी कायद्यांतर्गत ऑनलाइन सेवा म्हणून अंतर्भूत केली आहे. जेणेकरून नुकसान झालेल्या व्यक्ती किंवा कुटुंबाला लवकर मदत मिळू शकेल. राखीव किंवा संरक्षित वनक्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाचा फार मोठा कार्यक्रम राबवत आहोत.

राज्यात निसर्ग पर्यटन मंडळाची आणि महाराष्ट्र राज्य प्राणिसंग्रहालयाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. निसर्ग पर्यटन किंवा वन पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न वेग घेत आहे. गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालयाची निर्मिती करत आहोत.

### जनवन योजना

व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावातील लोकांचे वनांवरचे अवलंबित्व कमी व्हावे म्हणून १६६ गावात श्यामाप्रसाद मुखर्जी जनवन योजना सुरू केली आहे. जलयुक्त शिवार प्रमाणे जलयुक्त वन ही संकल्पना वन विभागाने यशस्वीपणे राबवली. २०१४-१५ मध्ये ७५ कोटी रुपये खर्च करून ४३७६ कामे केली तर २०१५-१६ मध्ये २०२ कोटी रुपये खर्च करून १२७६५ कामे करण्यात आली. वन विभागाने जलयुक्त शिवार योजनेत उत्कृष्ट काम केल्याबद्दल १६ जून २०१५ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत वन विभागाच्या अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात आला.

### वनसमृद्धीसाठी

■ चंद्रपूर जिल्ह्यात चिचपल्ली येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र ■ बुरूड व्यवसाय करणाऱ्यांना रॉयल्टी माफ ■ ब्ल्यू मॉरमॉन हे फुलपाखरू राज्याचे नवे मानचिन्ह. राज्य फुलपाखरू घोषित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ■ ठाणे खाडी फ्लॅमिंगो अभयारण्य, विस्तारित कर्नाळा अभयारण्य, तोरणमाळ संवर्धन राखीव अंजनेरी संवर्धन राखीव क्षेत्रास मान्यता ■ वन्यजीव विकास निधी स्थापणार ■ प्रत्येक जिल्ह्यात हायटेक रोपवाटिका, उत्तमराव पाटील वन उद्यानाची निर्मिती ■ चंद्रपूर बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे बोटॅनिकल गार्डन ■ नागरी भागात हरित शहर योजनेची अंमलबजावणी ■ नमामि चंद्रभागा कार्यक्रमांतर्गत पंढरपूर येथे तुळशी उद्यान ■ राज्यात हरित सेनेची स्थापना करणार. किमान १० लाख स्वंयसेवकांचा यात समावेश करण्याचा निर्णय ■ जलयुक्त शिवार बांबू मिशनशी जोडणार. ■ वनयुक्त शिवार कार्यक्रम हाती घेताना पक्ष्यांसाठी वृक्ष ही संकल्पना राबवणार ■ मराठवाड्यातील वन संवर्धनासाठी इको बटालियनची संरक्षण मंत्रालयाकडे मागणी. या सगळ्या वाटचालीकडे पाहिल्यानंतर २ वर्षे ही बरीच सुखद अनुभव देणारी अशी आहेत. हे लोकमान्य सरकार आहे आणि लोकांच्या मनातील विकासाची पूर्तता करण्याचा आमचा निर्धार आहे.

**शब्दांकन: डॉ. सुरेखा म. मुळे**

आपले सरकार कामगिरी दमदार



**विनोद तावडे**
शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ मंत्री

# चौफेर संधी

एखाद्या शहराचा विकास आराखडा दर १० वर्षांनी बदलतो, त्याच धर्तीवर शिक्षणाचा आराखडा अभ्यासक्रमानुसार आणि विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार दर ५ वर्षांनी बदलणे आवश्यक आहे, असे शिक्षण मंत्री या नात्याने मला वाटते. आजच्या पालकांनी आपली मानसिकता बदलणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांचा केवळ बुद्ध्यंक वाढवणे आवश्यक नाही, तर विद्यार्थ्यांमधला भावनिक बुद्ध्यंक वाढवणेही आवश्यक आहे.

## शालेय शिक्षण

शिक्षणाच्या अधिकारानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांवरील दप्तराचे ओझे कमी करण्याचा प्रयत्नही करण्यात आला आहे. शाळा प्रवेशासाठी (पहिलीच्या वर्गासाठी) बालकांचे किमान वय ६ वर्षे निश्चित करण्याबरोबरच विनाअनुदानित खाजगी शाळांमध्ये वंचित व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्गात २५ टक्के जागांवर प्रवेश देण्यासाठी प्रथम प्रवेशस्तर निकष लागू करण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांना शिकवणारे शिक्षक हे अनुभवी आणि प्रयोगशील असावे यासाठी शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. तर मदरशांमधील आधुनिक शिक्षणासाठी विशेष शिक्षकांची नेमणूकही करण्यात येत आहे. गेली काही वर्षे प्रलंबित असलेला विनाअनुदानित शाळांना राज्य शासनाकडून अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला असून आता कायम विनाअनुदानित खाजगी शाळांना २० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. तर यंदाच्या खरीप आणि रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १४ हजार ७०८ दुष्काळग्रस्त गावांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात आले होते.

## सवलती आणि संधी

माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका वेळेवर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या कलमापन चाचणीमुळे विद्यार्थ्यांना आपला कल नेमका कोणत्या शाखेकडे आहे हे समजून घेण्यास मदत होत आहे. दहावी आणि बारावीतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची लगेचच फेरपरीक्षा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे या विद्यार्थ्यांना पुढील दिशा ठरवण्यास मदत होत आहे. फेरपरीक्षेतही अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अंगभूत कौशल्याच्या आधारे लाभदायक ठरतील अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक असलेल्या जिल्ह्यांवर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. वीटभट्टी कामगार, ऊसतोडणी कामगार आणि दगड खाणींमध्ये काम करणारे मजूर यांच्या मुलांना शाळेत आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत.

## खेळाडूंसाठी...

राज्यातील क्रीडा सुविधांपैकी निवडक क्रीडा सुविधा विकसित करून त्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या करण्यात येणार आहेत. ऑलिम्पिक २०२० ऑलिम्पिक पदक पूर्ततेचे ध्येय गाठण्यासाठी कृती आराखडा करण्यात येत आहे. आदिवासी मुलांमधील क्रीडाविषयक उपजत गुणांना प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने आदिवासी विकास विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांना राज्यस्तरीय स्पर्धांचा दर्जा देण्यात आला आहे. नोकरीसाठी खेळांडूकरिता ५ टक्के असलेल्या आरक्षणाकरिता प्रमाणपत्र पडताळणी ऑनलाइन करण्यात आली आहे.

## उच्च व तंत्र शिक्षण

राज्यातील खासगी व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश आणि शुल्क यावर नियमन आणण्यासाठी अध्यादेश काढण्यात आला आहे. नागपूर येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटची स्थापना करण्यात आली आहे. पुणे आणि नागपूर येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी

> **शिक्षण घेताना कुठल्याही विद्यार्थ्याचे मनोबल ढळू नये, यासाठी दहावी आणि बारावीची फेरपरीक्षा लगेच एका महिन्याच्या आत घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. आगामी काळात विद्यार्थ्यांच्या कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रमांना प्राधान्य देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.**

**दिव्यांग विद्यार्थ्यांना पहिली ते बारावीपर्यंत अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत शैक्षणिकदृष्ट्या पूरक सोयीसुविधा, सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या बरोबरीने नियमित शाळांमध्ये शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

## महाराष्ट्राचा क्रीडानकाशा

**राज्यातील खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी करीत असताना या खेळाडूंना अधिकाधिक प्रोत्साहन देण्यासाठी कोणत्या योजना राबवता येतील, याचा अभ्यास करण्यात येत आहे. आगामी काळात महाराष्ट्राचा क्रीडा नकाशा तयार करण्यासाठी प्रयत्न केले जातील.**



(आयआयआयटी)ची स्थापना करण्यास मान्यता मिळवण्यात आली आहे. मेरिट आणि उत्पन्न यावर आधारित फ्रीशीप योजना तयार करून त्याचे संगणकीकरण करण्याचे काम पूर्ण करण्यात येत असून ही योजना पुढील शैक्षणिक वर्षापासून अमलात येणार आहे. नागपूर आणि औरंगाबाद येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठ सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. खाजगी विद्यापीठ कायद्यांतर्गत दोन नवीन विद्यापीठांची स्थापना करण्यात आली आहे. निवड आधारित क्रेडिट प्रणाली लागू तसेच विद्यापीठ अनुदाना आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार चॉईस बेस क्रेडिट सिस्टीम लागू करण्याबाबत विद्यापीठांना सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाची (रुसा) अंमलबजावणी करण्यात येत आहे.

### मराठी भाषा

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबतचा प्रस्ताव साहित्य अकादमी, नवी दिल्ली यांनी त्यांच्या शिफारससह संस्कृती मंत्रालयाकडे पाठवण्यात आला आहे. भाषा सल्लागार समिती पुनर्गठित करण्यात आली असून नवीन समितीकडून धोरणाचा मसुदा अंतिम करण्याचे काम सुरू आहे. समितीकडून सुधारित अंतिम मसूदा प्राप्त झाल्यानंतर मराठी भाषेचे पुढील २५ वर्षांचे धोरण निश्चित करण्यात येणार आहे.

### सांस्कृतिक कार्य

महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी गडकिल्ले संवर्धन समिती स्थापन करण्यात आली आहे. शिवकालीन, ऐतिहासिक गडकोट हीच छत्रपती शिवरायांची खरी व अर्थपूर्ण स्मारके आहेत. अनेक किल्ल्यांना संरक्षित स्मारक म्हणून मान्यता देऊन त्या किल्ल्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यात येणार आहे. रत्नागिरीमधील घेरापालगड (ता.खेड), महिपतगड (ता. संगमेश्वर) व बाणकोट (ता. मंडणगड) या किल्ल्यांना संरक्षित स्मारक म्हणून मान्यता देण्यात आली आहे. रंगभूमीची सेवा करणाऱ्या वयोवृद्ध कलावंतांना शासनामार्फत मिळणारे मानधन ऑनलाइन करण्याची योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### अल्पसंख्याकांचा विकास

मदरशांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपरिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी डॉ. झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजना राबवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. अमराठी शाळांमधून उर्दू हा ऐच्छिक विषय तर उर्दू शाळांमध्ये मराठी शिकवण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण तसेच इयत्ता बारावीनंतरच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता रु.५०००/- व रू. २५,०००/- इतक्या मर्यादेत शिष्यवृत्ती देण्याचा निर्णयही घेतला आहे. उर्दू भाषेतील लेखक/कवी यांच्या पुस्तकांचे परीक्षण करणाऱ्या परीक्षकांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे, तर उर्दू भाषेतील लेखक/कवी यांच्या पुस्तकांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांच्या रकमेत वाढही करण्यात आली आहे. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्ज योजनेचे संगणकीकरण करून ऑन लाईन लोन मॅनेजमेंट सिस्टीम विकसित करण्यात आली आहे. जळगाव, भिवंडी आणि नाशिक आणि मालेगाव येथे उर्दू घर उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्तांच्या संरक्षणासाठी गाव नमुना व ७/१२ उताऱ्यावर संबंधित वक्फ संस्थेच्या नावाची नोंद घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वक्फ मालमत्तांच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या एम.एम. शेख यांनी सादर केलेल्या अहवालावर कृती अहवाल तयार करण्यात आला. केंद्रपुरस्कृत बहुक्षेत्र विकास कार्यक्रम (एमएसडीपी) योजना राज्यातील ९ जिल्ह्यात राबवण्यास सुरुवात केली आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके**



**प्रकाश महेता**
गृहनिर्माण मंत्री

# सर्वांसाठी घरे

महाराष्ट्रात औद्योगिकीकरण आणि त्याचबरोबर नागरीकरण झपाट्याने होते आहे. सामान्य माणसाला स्वत:च्या हक्काचे घर घेणे अत्यंत जिकिरीचे बनले आहे. शासनाने सर्वसामान्य माणूस हा केंद्रबिंदू ठेवून त्याच्या हक्काचे घर मिळावे यासाठी अनेक निर्णय घेतले आहेत. घर विकत घेणे हे समाजातील सर्वच वर्गासाठी सुसह्य व्हावे यासाठी नवे गृहनिर्माण धोरण राबवण्याचा निर्णय घेतला आहे. सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून गृहनिर्माण धोरणाची आखणी केली आहे. या धोरणाच्या माध्यमातून सामान्य माणसासाठी घेतलेल्या भूमिकेवर सरकार ठाम राहील. हक्काचा निवारा ही मानवाची मूलभूत गरज आहे, हे जाणून त्याची पूर्ती करण्यासाठी सर्वसामान्यांना पोषक ठरतील, असे निर्णय घेतले आहेत.

मुंबईतील बंद व आजारी कापड गिरण्यातील कामगारांना दिलासा मिळावा, यासाठी शासनाने त्यांना स्वत:च्या हक्काचे घर दिले आहे. तसेच उर्वरित कामगांराना घर देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

नवीन गृहनिर्माण धोरणाच्या माध्यमातून मुंबईकरांच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. मुंबईतील जुन्या चाळी, मोडकळीला आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग या धोरणामुळे मोकळा होणार आहे. मुंबईचा कायापालट घडवू पाहणारे हे अत्यंत महत्त्वाचे गृहनिर्माण धोरण आहे.

म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास जुन्या धोरणाने अडकला होता. त्यामुळे मुंबईत घरांचे प्रश्न बिकट झाले होते. यासाठीच नवे गृहनिर्माण धोरण आखण्याची लोकप्रतिनिधींची अनेक वर्षांपासून मागणी होती. आता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या २०२२ पर्यंत सर्वांना घरे या योजनेशी सुसंगत राज्य शासनाचे गृहनिर्माण धोरण आखण्यात आले आहे.

नव्या गृहनिर्माण धोरणामुळे २२ हजार जुन्या इमारतींतील नागरिकांना दिलासा मिळेल. उपनगर जिल्ह्याला समूह विकासाची (क्लस्टर डेव्हलपमेंट) परवानगी देण्यात आली आहे. संक्रमण शिबिरातील लोकांचे पूर्णपणे पुनर्वसनही होणार आहे.

गृहनिर्माण धोरण हा मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरेल. मुंबईतील ३७ टक्के उपलब्ध जागेवर १ कोटीहून अधिक जनतेला याचा लाभ होईल. आशियातील सर्वात मोठा प्रकल्प अशी ख्याती असलेल्या धारावीच्या विकासाबाबत लवकरच शासन ठोस निर्णय घेणार आहे. मुंबई उपनगरातील वसाहतींच्या पुनर्विकासासाठी क्लस्टर डेव्हलपमेंट योजना लागू करण्यात येणार आहे. विमानतळाचा विकास करताना परिसरातील ५० हजार लोकांचे पुनर्वसन केले जाईल.

## म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास

मुंबई शहरामध्ये म्हाडाच्या वसाहती या १९५०-६० च्या दरम्यान बांधण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत या इमारती जीर्ण झाल्या असून त्यांचा पुनर्विकास होणे गरजेचे आहे. या इमारतीतील मूळ रहिवाशांना मोठ्या आकाराची सदनिका देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या वसाहतींचा पुनर्विकास होण्याच्या दृष्टीने सुधारित धोरणानुसार म्हाडा वसाहतींना ४.०० एफएसआय देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

२००० चौ.मी.पर्यंतच्या भूखंडावरील पुनर्विकासासाठी ३.०० एफएसआय अधिमुल्य आधारित वितरित करण्यात येईल व उर्वरित १.०० एफएसआय म्हाडास गृहतत्त्वावर वितरीत करण्यात येईल. अधिक गृहसाठा निर्माण व्हावा म्हणून कोणत्याही कारणामुळे एफएसआय ३.०० पेक्षा अधिक प्राप्त होत असेल तर ३.०० वरील एफएसआयसाठी गृहसाठा म्हाडास देण्याचे विकासकांना बंधनकारक राहील. २००० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या भूखंडावर ४.०० एफएसआय हा म्हाडास गृहसाठा भागीदारीच्या तत्त्वावर वितरित करण्यात येईल.

क्लस्टर विकासामुळे जीर्ण झालेल्या जुन्या इमारतींचा पुनर्विकास होऊन जुन्या मूळ रहिवाशांना अधिकच्या क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येतील. यामुळे अतिरिक्त गृहसाठ्याची निर्मिती होईल. तसेच अधिमूल्यामुळे शासनास

> **दोन वर्षांच्या कालावधीत सर्वसामान्यांच्या घरकुलाचे स्वप्न साकार व्हावे या दृष्टीने शासनाने ठोस निर्णय घेतले. नवीन गृहनिर्माण धोरण यासाठी उपयुक्त ठरेल. सर्वांना २०२२ पर्यंत घरे उपलब्ध करण्यासाठी नव्या गृहनिर्माण धोरणाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाईल.**

**म्हाडामार्फत शासनाने भारत मिल, वेस्टर्न मिल, सेंच्युरी मिल, प्रकाश कॉटन मिल, रुबी मिल, स्वान-ज्युबिली मिल या ६ गिरण्यांतील २६३४ गिरणी कामगारांना हक्काचे घर उपलब्ध करून दिले आहे.**

विविध गृहनिर्माण योजनांसाठी (परवडणारी घरे) निधी उपलब्ध होईल. या निधीद्वारे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये शासनाच्या गृहनिर्माण योजना राबवणे शक्य होईल. अतिरिक्त १.०० एफएसआयमुळे म्हाडाला अल्प / अत्यल्प उत्पन्नगटातील परवडणाऱ्या दरातील सदनिका उपलब्ध होतील.

## शिबिरातील रहिवाशांबाबत धोरण

म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील जे पात्र मूळ भाडेकरु/ रहिवासी सद्य:स्थितीत राहत असलेल्या संक्रमण शिबिराच्याच ठिकाणी पुनर्वसित होऊ इच्छित असतील अशा भाडेकरूनी त्यांच्या मूळ ठिकाणचे/ भाडेकरू म्हणून असणारे हक्क म्हाडाकडे हस्तांतरित केल्यास त्यांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

म्हाडाच्या विविध ठिकाणी असलेल्या संक्रमण शिबिरात काही अपात्र रहिवाशी वर्षानुवर्षे राहत आहेत. त्यांच्याबाबत निर्णय घेताना प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर 'सर्वांसाठी घरे' हा शासनाचा मुख्य हेतू लक्षात घेण्यात आला आहे.

म्हाडाच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे सदनिकेची विक्री किंमत व या पूर्वीच्या कालावधीचे म्हाडाने निर्धारित केलेले भाडे घेण्यात येईल. अशा प्रकारे रहिवाशांना त्याच ठिकाणी कायमस्वरूपी पुनर्वसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना नागरी

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या सर्वांसाठी घरे - २०२२ या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपट्ट्यांचा आहे तेथेच पुनर्विकास केला जाईल. कर्जसंलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यात येणार आहे.

खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती केली जाईल. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकूल बांधण्यास अनुदान देण्यात येणार आहे.

## दुर्बल घटकासाठी केंद्राचे अनुदान

झोपडपट्टीवासीयांच्या प्रत्येक घरकुलांसाठी केंद्रशासन १ लाखाचे अनुदान देणार आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटाकरिता कर्जाच्या व्याजाची सबसिडीमार्फत परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीसाठी व्याजामध्ये रु.६.५ टक्के व्याजाची सबसिडी व कर्जाचा कालावधी १५ वर्ष ठेवण्यात आला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या खाजगी व सार्वजानिक क्षेत्राच्या सहभागातून परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीसाठी प्रत्येक घरकुलासाठी प्रत्येकी १.५ लाखाचे अनुदान देण्यात येणार आहे.

या योजनेंतर्गत घरबांधणीसाठी जमिनीची मागणी आल्यास त्याबाबत जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांना अधिकार देण्यात आला आहे. राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या प्रस्तावांपैकी आतापर्यंत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने १,०७,८७४ घरकुलांच्या ३२ प्रकल्पांस तत्वत: मान्यता दिलेली आहे.

राज्य शासनाने कामगारांचे व त्यांच्या वारसांचे पुनर्वसन करण्याकरिता, त्यांना हक्काचे घर देण्याचे धोरण निश्चित केले आहे. प्रत्येक कामगाराला हक्काचे घर मिळवून देऊन त्यांचा आत्मसन्मान जपणे व त्यांच्या योगदानाचा सन्मान करणे, हा शासनाचा हेतू यामागे आहे.

**शब्दांकन : सुनीता कुपेरकर**

## शहरातील घरे

**केंद्र शासनातर्फे १७ जून २०१५ रोजी सर्वांसाठी घरे (नागरी) योजना– प्रधानमंत्री आवास योजना मंजूर करण्यात आली. राज्य शासनातर्फे या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यासाठी राज्यातील ५१ शहरांची निवड करण्यात आली आहे. ही अंमलबजावणी या शहरांच्या नियोजित क्षेत्रांमध्ये करण्यात येईल.**



आपले सरकार कामगिरी दमदार



पंकजा मुंडे
ग्रामविकास,
महिला व बालविकास मंत्री

# स्मार्ट गावे, सक्षम महिला

ग्रामविकास विभागाने मागील दोन वर्षात अनेक विकासाभिमुख निर्णय घेतले. सर्व ग्रामपंचायती स्मार्ट बनवण्याचा निर्धार केला आहे. त्या दृष्टीने स्मार्ट ग्राम योजना हाती घेण्यात येत आहे. ग्रामपंचायतींचे विकास आराखडे तयार करून गावांच्या विकासाचे निश्चित प्रारूप आखण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजना, पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना, मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना, उमेद अभियान, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागाखरेदी अर्थसाहाय्य योजना, आमचे गाव-आमचा विकास, आपले सरकार सेवा केंद्र अशा विविध योजनांमधून गावांना तंत्रज्ञान, रस्ते, घरकूल, शौचालये आदी पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच कौशल्य विकासातून रोजगार निर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना दिली जात आहे.

## ग्रामीण जीवनोन्नती

ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत मागील दोन वर्षात बँकांमार्फत १ लाख १३ हजार बचतगटांना साधारण १ हजार ५८६ कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले आहे. यातून बचतगटांच्या महिलांना रोजगार उपलब्ध होण्याबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. बेरोजगार तरुणांना प्रशिक्षण आणि त्यानंतर खात्रीचा रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतून सध्या १ हजार ७७४ तरुणांचे प्रशिक्षण सुरू असून चालू वर्षात ५८ हजार तरुणांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

## मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना

ग्रामीण रस्त्यांना जोडण्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यात 'मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेतून ७३० किमीचा नवीन मार्ग व ३० हजार किमी रस्त्यांचा दर्जा सुधारण्याचे. आतापर्यंत ३३३ रस्त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. यातील बहुतांश रस्त्यांचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. तसेच २०१६-१७ साठी निश्चित केलेल्या उद्दिष्टापैकी ५ हजार २०० किमी रस्त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण

२०१६-१७ पासून 'प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण' ही केंद्र पुरस्कृत योजना राबवली जाणार आहे. यासाठी स्वातंत्र्यदिनी झालेल्या ग्रामसभेतील ठरावानंतर पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. या योजनेंतर्गत प्रतिघरकूल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात १ लाख २० हजार रुपये तर नक्षलग्रस्त भागाकरिता १ लाख ३० हजार रुपये अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे. याशिवाय मनरेगा योजनेतून अकुशल मजुरीच्या स्वरूपात १८ हजार रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य मिळणार आहे. तसेच स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय बांधकामासाठी स्वतंत्रपणे १२ हजार रुपये इतका निधी मिळणार आहे. २०१६-१७ मध्ये या योजनेंतर्गत १ लाख ७२ हजार २६४ घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

घरकूल योजनेसाठी पात्र असलेल्या पण त्याच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी अनुदान देणारी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागाखरेदी अर्थसाहाय्य योजना शासनाने सुरू केली आहे. या योजनेतून जागा खरेदीसाठी प्रति लाभार्थी ५० हजार रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य देण्यात येते. या योजनेसाठी २०१६-१७ या वित्तीय वर्षात ५ हजार लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून २५ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

## स्मार्ट ग्राम योजना

गावांचा सुनियोजित विकास करण्याच्या


**"आम्ही सर्व ग्रामपंचायती स्मार्ट बनवण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलेल. मुलींचा जन्मदर वाढवणे, महाराष्ट्र कुपोषणमुक्त करणे यासह महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांवर प्राधान्याने लक्ष केंद्रित केले आहे."**

उद्देशाने पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेत काही सुधारणा करून स्मार्ट ग्राम योजना सुरू करण्यात येत आहे. महिला बचतगटांना बिनव्याजी कर्ज देण्याचा निर्णय घेतला असून यासाठी लवकरच सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना सुरू करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या सांसद आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवर राज्यात आमदार आदर्शग्राम योजना सुरू करण्यात आली आहे. येत्या पाच वर्षात १ हजार गावे आदर्श बनवण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

**ग्रामस्थांना विविध प्रकारचे दाखले, बस-रेल्वे आरक्षण इत्यादी सुविधा ग्रामपंचायतीत ऑनलाइन पद्धतीने मिळणार आहेत. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात 'आपले सरकार' सेवा केंद्र सुरू करण्यात येईल.**

## आमचे गाव, आमचा विकास

**आमचे गाव, आमचा विकास या योजनेंतर्गत गावांचा सुनियोजित विकास केला जाईल. यासाठी राज्यातील प्रत्येक गावाचा पंचवार्षिक व वार्षिक विकास आराखडा लोकसहभागातून तयार करण्यात येत आहे. यासाठी राज्यातील जवळपास सर्व ग्रामपंचायतींमध्ये प्रशिक्षण देण्यात आले आहे. ऑगस्ट अखेरपर्यंत ग्रामसभा घेऊन २३ हजार ७१२ ग्रामपंचायतींनी प्रारूप आराखडे मंजूर केले आहेत. ७ हजार ४४७ इतक्या ग्रामपंचायतींच्या ग्रामसभांनी विकास आराखड्यास अंतिम मान्यता दिली आहे.**



### महिला सक्षमीकरण

महिला आणि बालविकास विभागामार्फत मुलींचा जन्मदर वाढवणे, महाराष्ट्र कुपोषणमुक्त करणे यासह महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. मुलींचा जन्मदर वाढवणे व स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी १ एप्रिल २०१६ पासून माझी कन्या भाग्यश्री योजना सुरु करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानाची महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी सुरू आहे.

बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसाहाय्य करणे व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यात मनोधैर्य योजना सुरू आहे. या योजनेतून पीडितांना ५० हजार ते ३ लाख रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य देण्यात येते. या योजनेतून मार्च २०१६ अखेर १ हजार ९९९ प्रकरणांत अर्थसाहाय्य देण्यात आले आहे.

### कुपोषणमुक्ती

कुपोषणमुक्तीसाठी विशेष कार्यक्रम राबवला जातो. यासाठी राज्यात एकूण ५५३ प्रकल्प कार्यान्वित आहेत. राज्यात ८८ हजार २७२ अंगणवाड्या कार्यरत असून या माध्यमातून कुपोषणमुक्तीसाठी 0 ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना तसेच गरोदर माता व स्तनदा मातांना पूरक पोषण आहाराचा पुरवठा केला जातो. साधारण ८६ लाख ३१ हजार ९१0 बालकांना पूरक पोषण आहाराचा पुरवठा केला जातो. दरवर्षी राज्यातील ५ हजार अंगणवाड्या आदर्श अंगणवाड्या म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविकांच्या मानधनात अनुक्रमे ९५0 रु., ५00 रु. व ५५0 रु. इतकी वाढ करण्यात आली आहे. याशिवाय त्यांचे वेतन रोखीने न देता ते त्यांच्या बँक खात्यावर थेट जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येणार आहे. सीएसआर निधीतून महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध कॉर्पोरेट कंपन्यांचे योगदान घेण्यात येत आहे. त्याद्वारे परसबागांची लागवड, बालकांच्या पूर्व शालेय शिक्षणात सुधारणा करणे, वंचित तसेच दुष्काळग्रस्त क्षेत्रातील बालगृहांची सुधारणा करणे याकरिता सामंजस्य करार करण्यात आले आहेत. महिलांना व्यावसायिक वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्यासाठी आय केअर संस्थेबरोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे. या संस्थेमार्फत आतापर्यंत साधारण २00 महिलांना व्यावसायिक वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्यात आले असून सध्या १२२ महिलांचे प्रशिक्षण सुरू आहे.

मोठ्या शासकीय कार्यालयांमध्ये महिला कर्मचाऱ्यांना तसेच अभ्यागत महिलांच्या बाळांना स्तनपान करणे सुलभ व्हावे यासाठी हिरकणी कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात मंत्रालयात या कक्षाची सुरुवात केली आहे. मुलींच्या वसतिगृहांसाठीच्या निधीमध्ये दुपटीने वाढ करून सर्व वसतिगृहांना येत्या ३ वर्षात संरक्षण भिंती बांधण्याचा निर्णय घेतला आहे.राज्यातील बालगृहांचे कामकाज अधिक पारदर्शक आणि दर्जेदार बनवण्यासाठी त्यांची अ, ब आणि क अशी वर्गवारी करण्यात आली आहे.

**शब्दांकन : इर्शाद बागवान**



आपले सरकार कामगिरी दमदार



**विष्णू सवरा**
आदिवासी विकास मंत्री

> गेल्या २ वर्षात विकासाची गंगा आदिवासी भागात पोहोचवण्यासाठी आणि आदिवासी जनतेस समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी शासन अथक प्रयत्न करत आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आले आहेत. त्यांना समृद्धीच्या नव्या दिशा गवसल्या आहेत.

# पर्व परिवर्तनाचे

भौतिक, पायाभूत सुविधा, शैक्षणिक प्रगती, आरोग्याच्या समस्या यासारख्या आदिवासी समाजाचे जीवनमान उंचाविण्यासाठी आवश्यक असलेल्या योजनांचे एकत्रीकरण करून आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गेल्या २ वर्षांपासून विशेष प्रयत्न केले जात आहे. देशात व राज्यात आदिवासी समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी नियोजनबद्ध पावले गेल्या २ वर्षात उचलण्यात आली आहेत. याचे मला समाधान आहे. यामध्ये पेसा कायद्याची अंमलबजावणी, इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश, अद्ययावत मध्यवर्ती स्वयंपाकगृह, भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना, आदिवासी विकास व संशोधन संस्थेच्या कार्यप्रणालीत आमूलाग्र बदल, आदिवासी पाड्यांचा स्मार्ट पद्धतीने विकास यासारख्या योजना राबवण्यात येत आहेत.

## पेसा कायद्याची अंमलबजावणी

याअंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय, आरोग्य केंद्र, अंगणवाड्या, डिजिटल शाळा, दफनभूमी, गोडाऊन, गावांचे अंतर्गत रस्ते, सार्वजनिक स्वच्छता राखणे, सांडपाणी व्यवस्थेकरिता गटारे बांधणे, सौरदिवे, आणि शुद्ध पाण्याचा पुरवठा करणे यासारखी अनेक कामे करण्यात आली आहेत. २०१५-१६ मध्ये मंजूर झालेल्या २३ हजार ७५१ कामांपैकी ६ हजार २५० कामे पूर्ण केली आहेत. अनुसूचित क्षेत्रातील २ हजार ८७३ ग्रामपंचायती, ५ हजार ९७९ गावे आणि पाडे यांची निवड करण्यात आली असून त्याचा लाभ ४४ लाख १६ हजार २४ आदिवासी बांधवांना झाला आहे.

## इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश

आदिवासी विद्यार्थ्यांना इतर सर्वसाधारण विद्यार्थ्याप्रमाणे शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण घेता यावे यासाठी आदिवासी विकास विभागाकडून नामांकित शाळेत प्रवेश देण्यात येत आहेत. यापूर्वी दरवर्षी अडीच हजार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत होता. त्या विद्यार्थ्यांच्या संख्येत १० पटीने वाढ करून आता दरवर्षी २५ हजार विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये प्रवेश देण्यात येत आहे. २०१५-२०१६ च्या शैक्षणिक वर्षात १२२ नामांकित शाळांची निवड करून त्यात जवळपास २१ हजार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.

## देशातील पहिले 'अन्नपूर्णा' स्वयंपाकगृह

शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीचे पुरेसे, आरोग्यदायी व सकस भोजन मिळत नसल्याबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या; त्यावर उपाययोजना म्हणून आदिवासी विकास विभाग, टाटा ट्रस्ट आणि अक्षयपात्र फाऊंडेशन यांच्यात सामंजस्य करार करून नाशिक जिल्ह्यातील मुंढेगाव येथे 'अन्नपुर्णा' मध्यवर्ती स्वयंपाकगृह सुरू करण्यात आले. या माध्यमातून शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पौष्टिक, संतुलित, ताजा व रुचकर आहार वेळेवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. नाशिक व इगतपुरी तालुक्यातील ४० किलोमीटर अंतरावरील ११ आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना जेवण पुरवण्यात येत आहे.

## अमृत आहार योजना

अनुसूचित क्षेत्रातील कुपोषण कमी करण्यासाठी आणि गरोदर स्त्रिया, स्तनदा मातांच्या आहारातील उष्मांक आणि प्रथिनांचे प्रमाण वाढवण्यासाठी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत गरोदर स्त्रियांना शेवटच्या तिमाहीमध्ये व स्तनदा मातेस बाळांतपणानंतर पहिल्या तिमाहीमध्ये एकवेळेचा चौरस आहार देण्यात येत होता. एक वेळच्या पूर्ण आहारामध्ये चपाती/भाकरी, भात, कडधान्य-डाळ, सोयादूध

**आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये प्रवेश देण्यात येत आहे. २०१५-२०१६ या वर्षात १२२ नामांकित शाळांची निवड करून त्यात २१ हजार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.**

साखरेसह, शेंगदाणा लाडू, अंडी/केळी/ नाचणी हलवा, फळे, हिरव्या पालेभाज्या, खाद्यतेल, गूळ, साखर, आयोडीनयुक्त मीठ, मसाला याचा समावेश आहे. या योजनेचा विस्तार करण्यात आला आहे. या विस्तारित योजनेत गरोदर मातेच्या आहाराचा कालावधी वाढवून नाव नोंदणी झाल्यापासून बाळांतपणापर्यंत आणि स्तनदा मातेस बाळांतपणानंतर सहा महिने एक वेळेचा चौरस आहार देण्यात येत आहे.

तसेच अनूसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील सात महिने ते सहा वर्ष वयोगटातील सर्व बालकांना अंडी/केळी/ स्थानिक फळे असा अतिरिक्त आहार पुरविण्यासाठी भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा२ सुरू करण्यात आला आहे. त्यामध्ये स्तनदा मातेचे आरोग्य तसेच नवजात बालकाचे वजन व उंची योग्य राहून कुपोषणास प्रतिबंध होण्यास मदत होत आहे. पहिल्या टप्प्यात ६४ हजार ४३६ गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना समावेश आहे आणि वाढीव कालावधी मध्ये १ लाख ४ हजार ८८७ गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना लाभ मिळत आहे.



## वारली आदिवासी हाट

**पालघर जिल्ह्यातील मनोर येथे वारली आदिवासी हाट उभारण्यात येत आहे. यामुळे पालघर जिल्ह्यातील लोकांना, कलाकारांना व तरुणांना रोजगाराच्या मोठ्या संधी प्राप्त होतील. राज्यातील तसेच देशातील आदिवासी पारंपरिक कलांचे जतन व संवर्धन होईल. त्यांनी बनवलेल्या कलाकृतींची विक्री या ठिकाणी होईल.**

### आदि 'प्रमाण' प्रणाली

अनुसूचित जमातीतील आदिवासी बांधवाच्या जाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. जात पडताळणीसंबंधीच्या अडचणी या प्रणालीद्वारे सोडवण्यास मदत होत आहे.

माहिती तंत्रज्ञानाचा अत्याधुनिक पद्धतीचा वापर करून अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी प्रकिया सोपी, वेगवान, पारदर्शी व्हावी, यासाठी संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या प्रक्रियेतील मानवी हस्तक्षेप कमी झाल्यामुळे वेळेची बचत होऊन कार्यक्षमता व पारदर्शकता वाढली आहे. या आदि 'प्रमाण' प्रणालीचा वापर दिनांक १ मे २०१६ पासून सुरू करण्यात आला असून सदर प्रणाली www.etribevailidity.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### वनहक्कास मान्यता

वनहक्क कायद्यांतर्गत दाव्यांना योग्य न्याय देण्यासाठी तालुकास्तरावर जाऊन सुनावणी आणि त्यावर योग्य कार्यवाही, करून दावेदारांना सनद(पट्टा) देऊन त्या दावेदारांची नोंद ७/१२त घेण्यात येत आहे. वैयक्तिक हक्कांबरोबरच दावेदारांचे जीवनमान उंचावण्यासाठी सामूहिक हक्कसुद्धा देण्यात आले आहेत. प्रत्येक गाव/ वाडा/ पाडा यांनी एक सामूहिक दावा केल्यास त्या जागेवर वृक्ष लागवड, गौण वनोपज, मत्स्यव्यवसाय इत्यादी उत्पन्नवाढीसाठी एक चांगला पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

### पाड्यांचा स्मार्ट पद्धतीने विकास

पायाभूत सुविधा नसलेल्या एक हजार आदिवासी पाड्यांचा क्लायमेंट स्मार्ट पद्धतीने विकास करण्यात येत आहे. आदिवासी गावांचा वातावरणाला अनुकूल, परंतु परिपूर्ण विकास करण्यासाठी 'बोरलॉग इन्स्टिट्युट ऑफ साऊथ एशिया' या संस्थेने पुणे, पालघर आणि गडचिरोलीतील एक हजार गावांची निवड केली आहे. यामध्ये आदिवासी गावांमध्ये सौरऊर्जेचा उपयोग, ज्या भागांमध्ये दुग्ध व्यवसायाला संधी आहे तिथे आवश्यकतेनुसार गायी, बकऱ्या, म्हशी देणे, त्या भागातील माती परिक्षण करून पिकांचे नियोजन करणे, सेंद्रीय बी-बियाण्यांचा, खताचा पुरवठा करणे, कोणती पिके घ्यावीत, त्याची पद्धती काय असावी, त्याचे प्रशिक्षण देणे, प्रत्येक गावातील निवडक दहा शेतकऱ्यांना आधुनिक पर्यावरण पोषक शेती करण्याचे प्रशिक्षण देणे असा एक हजार गावांचा विकास केला जाणार आहे.

**शब्दांकन : काशीबाई थोरात**

आपले सरकार कामगिरी दमदार

# स्वस्त धान्य, सुरक्षित औषधे



**गिरीश बापट**
अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्ये मंत्री

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण तसेच अन्न आणि औषध प्रशासन या दोन्ही विभागात ई गव्हर्नन्सचा वापर करून नागरिकांना सेवा देण्यात येत आहे. यामुळे राज्यातील लोकांना पारदर्शक व कार्यक्षम सेवा देण्याचे काम शासनाने सुरु केले आहे. भविष्यात यामध्ये मोठे बदल दिसून येतील.**

अन्न व नागरी पुरवठा मंत्री हे पद म्हणजे थेट जनतेच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असते. जनतेच्या जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे जबाबदारी पेलताना सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी अनेक कठोर निर्णय घ्यावे लागतात.

### स्वस्त दरात अन्नधान्य पुरवठा

गेल्या वर्षी निसर्गाच्या अवकृपेमुळे मराठवाडा व विदर्भातील १४ जिल्ह्यांत दुष्काळी परिस्थिती होती. येथील शेतकऱ्यांना अनेक कष्टांना सामोरे जावे लागले. त्यातच शेतकऱ्यांनी आत्महत्येसारखा मार्ग अवलंबवला. अशा घटना घडू नयेत, संकटकाळात शेतकऱ्यांना मदत व्हावी, यासाठी शासनाने या १४ जिल्ह्यातील सर्वच शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर अन्नधान्याचा लाभ देण्याचा निर्णय घेतला.

औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती विभागातील अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व नागपूर विभागातील वर्धा या १४ जिल्ह्यांतील सुमारे ६८ लाख शेतकऱ्यांना ३ रुपये प्रतिकिलो दराने तांदूळ आणि २ रुपये प्रतिकिलो दराने गहू उपलब्ध करून दिला.

### शिधापत्रिकांचे संगणकीकरण

अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत रास्त भाव धान्य दुकानातून गोरगरीब, सर्वसामान्य नागरिकांना रास्त दरात अन्नधान्याचे वाटप केले जाते. परंतु व्यवस्थेतील त्रुटीमुळे शिधावाटपात दोष निर्माण झाले होते. प्रत्यक्ष लाभार्थ्यांना धान्य मिळण्याऐवजी त्याला इतर वाटा फुटत होत्या, हे हेरून पात्र शिधापत्रिकाधारकांना शिधावस्तूंचे नियमित, विहित वेळेवर व पारदर्शी पद्धतीने वितरण करण्यासाठी शिधावाटप यंत्रणेच्या संगणकीकरणाचा प्रकल्प सुरू केला. या अंतर्गत शिधापत्रिकांची माहिती गोळा करून ती संगणकीय यंत्रणेत भरण्यात आली आहे. त्याबरोबरच सर्व जिल्ह्यातील ५४९३० रास्तभाव दुकाने व ६००४९ केरोसीन परवाने, ४८८ गोडाऊन, गॅस एजन्सीजची माहितीही संगणकीकृत करण्यात आली आहे. सध्या शिधापत्रिका धारकांचा आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक व बँक खाते क्रमांक पीडीएस डाटाबेसमध्ये समाविष्ट करण्याचे काम सुरू आहे.

आधार क्रमांक सीडिंग करण्याचे काम प्रगतिपथावर असून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत ७ कोटी लाभार्थ्यांपैकी ५.९२ कोटी लाभार्थ्यांच्या आधार क्रमांकांचे सिडींग करण्यात आलेले आहे.

या पुढचा टप्पा म्हणून शिधापत्रिका धारकांना धान्य व केरोसिनची माहिती थेट ग्राहकांना देता यावी, यासाठी ग्राहकांच्या मोबाईलवर एस.एम.एस. देण्याची सुविधा राज्य शासनाने सुरू केली आहे.

प्रत्येक रास्त भाव धान्य दुकानात पॉइंट ऑफ सेल हे बायोमेट्रिकवर आधारित उपकरण बसविण्यात येणार आहे. या उपकरणाद्वारे बायोमेट्रिक पद्धतीने ओळख पटवूनच धान्य देण्याची व्यवस्था होणार आहे. येत्या काही दिवसातच ही यंत्रणा सर्व ठिकाणी बसविण्यात येणार आहे. त्याचा वापर प्रत्यक्ष लाभार्थी निश्चित करण्यास होणार आहे व पर्यायाने बोगस रेशनकार्ड वापरून काळाबाजार करणाऱ्यांना पूर्ण अटकाव बसणार आहे.

### डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजना

एलपीजी ग्राहकांसाठी मॉडिफाईड डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजना ही देशातील ५४ जिल्ह्यात सुरू झाली आहे. सुरुवातीस २०१४ मध्ये राज्यातील वर्धा व अमरावती या जिल्ह्यांची यात निवड झाली होती. १ जानेवारी २०१५ पासून राज्यातील सर्वच जिल्ह्यात ही योजना सुरू करण्यात आली आहे. यामध्ये ९०.४७ टक्के लाभार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

### साखर खरेदीचा महाराष्ट्र पॅटर्न

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदयमधील

**दुष्काळग्रस्त मराठवाडा व विदर्भातील १४ जिल्ह्यात संकटकाळात शेतकऱ्यांना मदत व्हावी, यासाठी शासनाने या जिल्ह्यांतील सर्वच शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर अन्नधान्याचा लाभ देण्याचा निर्णय घेतला.**

लाभार्थ्यांना मिळणारी साखर ई-लिलावाद्वारे खुल्या बाजारातून खरेदी करण्याचा निर्णय शासनाने घेतला. या निर्णयामुळे खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, स्पर्धा वाढल्यामुळे बाजारभावाच्या तुलनेत कमी दरात साखर उपलब्ध झाली. यामुळे वार्षिक २५ कोटी इतकी बचत झाली आहे. राज्य शासनाच्या या प्रक्रियेची माहिती इतर राज्यांनी घेऊन त्या ठिकाणीही त्यांनी लिलावाद्वारेच साखर खरेदी सुरू केली आहे.

## नागरिकांना दिलासा

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील तक्रारी संबंधित नागरिकांच्या सोयीसाठी मंत्रालयाऐवजी विभागीय पातळीवर सुनावणी घेऊन, त्यांचा निकाल तेथेच लावण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित अपीलकर्ता, त्यांचे वकील व शासकीय अधिकारी यांचे मुंबईतील हेलपाटे तसेच त्यांचा पैसा, वेळ वाचला आहे. गेल्या दोन वर्षात विभागीय सुनावण्यांमध्ये ९२५ अपील निकाली काढण्यात आले आहेत.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत 'गिव्ह इट अप' या योजनेत राज्यातील १७ लाख ११ हजार ०५८ ग्राहकांनी घरगुती गॅसचे अनुदान सोडले आहे. देशात सर्वाधिक अनुदान सोडण्यात महाराष्ट्र आघाडीवर आहे.**




## तूरडाळ सुविधा

तूरडाळीचे भाव नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने अनेक कठोर पावले उचलली आहेत. डाळींचे दर नियंत्रण कायद्याचे प्रारूप तयार करून, विधिमंडळात मंजूर करून, तो आता मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठवण्यात आला आहे. शासनाने पुढाकार घेऊन केंद्र शासनाकडून खुल्या बाजारात विक्रीसाठी तूरडाळ खरेदी करण्याचा निर्णय घेतला. सुमारे ३५०० टन तूरडाळीची मागणी नोंदविली असून नाफेड व भारतीय अन्न महामंडळाच्या माध्यमातून त्यातील पहिल्या टप्प्यातील ७७६ टन तूरडाळ राज्य शासनाकडे पोहोचली आहे. ही तूरडाळ ९५ रुपये किलो दराने उपलब्ध करून दिली आहे. ठाणे, रायगड, लातूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, मुंबई, नाशिक, पुणे, वाशी या जिल्ह्यासह राज्यात विविध ठिकाणी स्वस्त तूरडाळ विक्री केंद्रे कार्यरत झाली आहेत. खुल्या बाजारातून डाळ विक्रीबरोबरच राज्याने देशात पहिल्यांदाच रेशन दुकानातून तूरडाळ विक्री करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी सुमारे ७ हजार टन तूरडाळ खरेदी करून रास्त भाव धान्य दुकानात विक्रीसाठी पाठवण्यात आली आहे. शासनाच्या उपाययोजनांमुळे बाजारातील तूरडाळीचे भाव सध्या कमी होत आहेत.

## ग्राहकांची जागृती

ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी वैध मापनशास्त्र यंत्रणेमार्फत दक्षता समित्यांची स्थापना केली आहे. मुख्यालयात आणि प्रादेशिक विभागात ग्राहक तक्रार निवारण कक्ष निर्माण केले. ग्राहकांच्या तक्रारींसाठी ई-मेल, फेसबूक तसेच व्हाट्सअॅपचा वापर करण्यात येत आहे. यामुळे यंदाच्या वर्षी ग्राहकांच्या फसवणुकीचे ३ हजार ८९५ खटले दाखल करण्यात आले असून गेल्या काही वर्षांत खटले दाखल करण्याचे प्रमाण ५२ टक्क्यांनी वाढले आहे.

## राज्य ग्राहक धोरण

ग्राहक चळवळीला प्रोत्साहन देऊन ती बळकट करण्यासाठी राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती पुनरुज्जीवित करण्यात आली. राज्याचे ग्राहक धोरण ठरवण्यासाठी मसुदा समिती गठित करण्यात आली आहे.

## अन्न व औषध प्रशासन

गेल्या दोन वर्षात पारदर्शक कारभारासाठी डिजिटल इंडियांतर्गत आपल्या सेवा ऑनलाइन केल्या आहेत. विविध परवाने, प्रमाणपत्रे व दाखले आता ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे मिळत आहेत.

## औषध विक्री तपासणी

औषध विक्री दुकानांच्या तपासणीमध्ये पारदर्शकता यावी, यासाठी विभागाने रॅन्डमाईज पद्धत वापरण्यास सुरुवात केली आहे. यामुळे दुकानदारांचा त्रास वाचण्यास मदत झाली आहे. या विभागाच्या चार सेवांचा समावेश सेवा हमी कायद्याद्वारे ऑनलाइन करण्यात आला आहे. यामध्ये अन्न व्यावसायिकांची नोंदणी, त्यांना परवानगी देणे, किरकोळ औषध विक्री भांडारास परवाने देणे व घाऊक औषध विक्री केंद्रास परवाने देणे आदींचा समावेश आहे. नागपूरमध्ये अन्न व औषध चाचणीसाठी प्रयोगशाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**शब्दांकन: नंदकुमार वाघमारे**



**गिरीष महाजन**
वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री

# जलसंपत्ती वाढली

> गेल्या दोन वर्षात पाणीसाठा व सिंचन क्षमता निश्चितपणे वाढली आहे. पाटबंधारे प्रकल्पाचे दायित्व मोठे असल्याने त्याचा प्राधान्यक्रम ठरवून, पुढील ३ वर्षात शेतकऱ्यांना लाभ पोहोचू शकणाऱ्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात पाणीसाठे निर्माण झाले आहेत.

गेल्या दोन वर्षात शासनाने सिंचन क्षमता वाढण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. २०१४-१५ या वर्षात ४४ हजार हेक्टर सिंचन क्षमता नव्याने निर्माण झाली. त्यासोबतच ३५० द.ल.घ.मी. क्षमतेचे पाणीसाठे विभागामार्फत निर्माण करण्यात आले. यात नव्याने २१ प्रकल्पांची घळभरणी करून १०७ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्मिती समाविष्ट आहे. २०१५-१६ मध्ये एकूण २६ प्रकल्प पूर्ण करण्यात आले.

अर्थसंकल्पित केलेली पूर्ण तरतूद प्रकल्पांना उपलब्ध करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. यावर्षी २०१६-१७ मध्ये जलसंपदा विभागाला ७८५७ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. निधीचे योग्य नियोजन करून या आर्थिक वर्षात १.६८ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता, ७६७ द.ल.घ.मी. पाणीसाठी निर्माण करण्याचे तसेच २८ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### धाडसी निर्णयाद्वारे प्रकल्प मार्गी

राज्य शासनाने ९८ प्रकल्पांना (विदर्भातील ३२ व मराठवाड्यातील ७) सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन सुप्रमाची प्रक्रिया अधिक गतिमान केली आहे. ९८ प्रकल्पांमध्ये विदर्भातील ३२ तर मराठवाड्यातील ७ सुधारित प्रशासकीय मान्यतांचा समावेश आहे.

सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या प्रक्रियेस काही कालावधी लागतो याचा विचार करून शासनाने २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात अखर्चित आर्थिक तरतुदीच्या मर्यादेत तसेच २०१५-१६ च्या वितरित केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत मंजूर प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा वाढीव खर्च करण्यास मान्यता दिली आहे.

भूसंपादनाच्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने भूसंपादन करण्याबाबत निर्णय घेतला, त्यामुळे प्रकल्पासाठी लागणारी जमीन संपादन करण्यास गती मिळाली.

विदर्भातील माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीच्या मापदंडात सुधारणा केल्यामुळे पूर्व विदर्भातील सिंचित क्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी यांत्रिकी संघटनेमार्फत कामे हाती घेण्यात आली आहेत. गुंजवणी प्रकल्पाचे काम प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे मार्च, २००९ पासून म्हणजेच प्रदीर्घ काळापासून बंद होते. शासनाने पुनर्वसनाबाबत घेतलेल्या सकारात्मक निर्णयामुळे धरणाचे काम १५ मे, २०१५ पासून पुन्हा सुरू झाले असून यावर्षी प्रथमच पाणीसाठा होण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.

कोकणासाठी महत्त्वाचे असलेल्या खारभूमी योजनांचे तसेच राज्यातील लघु प्रकल्पांचे मापदंडही सुधारित करण्यात आले असून कोकणातील आंतरराज्य प्रकल्पांवरील प्रकल्पग्रस्तांचा अनेक वर्ष प्रलंबित असलेला प्रश्न प्रकल्पग्रस्तांना नोकरीच्या बदल्यात एकरकमी ५ लाख इतके अनुदान देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला.

### प्रकल्पांना गती

प्रधानमंत्री कृषिसिंचाई योजनेंतर्गत महाराष्ट्रातील वाघूर, लोअर पांझरा, बावनथडी, निम्न दुधना, तिल्लारी, नांदूर मधमेश्वर व निम्न वर्धा या प्रकल्पांना मार्च, २०१७ पर्यंत पूर्ण करण्यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध करून दिला आहे. वन जमिनीसंदर्भातील विविध अडचणी विशेष प्रयत्न करून केंद्र शासनाकडून मान्यता मिळवण्यास यश आले आहे. विमलकसा व पिंडकेपार या प्रकल्पांना वन जमिनीच्या प्रस्तावास अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. अभयारण्यात बाधित अरकचेरी, आलेवाडी, खिंडसीपुरक कालवा आणि पाटीया या ४ प्रकल्पांना केंद्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता मिळाली. मराठवाड्याच्या महत्त्वाकांक्षी कृष्णा मराठवाडा प्रकल्पास पर्यावरण खात्याची मान्यता मिळाली असून, लेंडी आंतरराज्य प्रकल्पास पर्यावरण मान्यतेतून केंद्र शासनाद्वारे सूट मिळाली आहे. केंद्रीय जल आयोगाद्वारे जिगाव प्रकल्प तसेच सुलवाडे जामफळ उपसा सिंचन प्रकल्पास तांत्रिक मान्यता मिळाली.


### सिंचन क्षमता वाढली

अमरावती प्रदेशातील चार अनुशेष

जिल्ह्यातील प्रकल्पांना प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे. सिंचन क्षमता निर्मितीसाठी कालव्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. कालव्याच्या संकल्पनासाठी नव्याने स्वतंत्र कालवा संकल्पन मंडळ स्थापन केले आहे.

**२०१५-१६ मध्ये पाटबंधारे प्रकल्पांसाठी रु. ७,२७२ कोटी वितरित केले. गेल्या काही वर्षात अर्थसंकल्पीय तरतुदीत २० ते ३० टक्क्यांपर्यंत कपात केली जायची. मात्र या प्रकल्पांचे महत्त्व विचारात घेऊन कोणतीही कपात या सरकारने केली नाही.**

भविष्यात पाण्याच्या प्रत्येक थेंबाच्या वापराचे काटेकोर नियोजन करण्याची व समाजातील सर्व स्तरांमध्ये जलसाक्षरता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने राज्यात यशदा, पुणे या संस्थेमध्ये एक कायमस्वरूपी केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. तसेच वन अकादमी चंद्रपूर, वाल्मी (जल व भूमी व्यवस्थापन संस्था) औरंगाबाद आणि डॉ. पंजाबराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण प्रबोधिनी अमरावती या ठिकाणी उपकेंद्रे निर्माण करण्याचे नियोजन आहे.



## नवी सिंचन क्षमता

**२०१४-१५ या वर्षात ४४ हजार हेक्टर सिंचन क्षमता नव्याने निर्माण झाली. ३५० द.ल.घ.मी. क्षमतेचे पाणीसाठे निर्माण करण्यात आले. यात नव्याने २१ प्रकल्पांची घळभरणी करून १०७ द.ल.घ.मी.पाणीसाठा निर्मिती समाविष्ट आहे. २०१५-१६ मध्ये एकूण २६ प्रकल्प पूर्ण करण्यात आले.**

या केंद्रांमधून जलसाक्षरता व जलजागृतीविषयक उपक्रम व प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने घेण्यात येणार आहेत.

### सिंचन प्रकल्पाचे तीन करार!

महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यांमध्ये सिंचन प्रकल्पाबाबतचे तीन करार झाले असून यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील ३० हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे.

याबाबतचा संपूर्ण खर्च तेलंगणा राज्य करणार आहे. गोदावरी पाणी तंटा लवादानुसार असणारा पाणी हक्क, मत्स्य व्यवसाय करणे, नदीतील दळणवळण हे अधिकार महाराष्ट्राकडे राहणार आहेत. या प्रकल्पामुळे गोदावरी नदीच्या पट्ट्यातील एकही गाव, गावठाण बुडणार नाही. तसेच नदीकाठच्या गावांना पुराचा धोका राहणार नाही.

### अवयवदानासाठी पुढे या !

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अवयवदानाचे महत्त्व जाणून रुग्ण सेवेसाठी मोठ्या प्रमाणात अवयवदान होण्याकरिता अवयव दानाचे अभियान हाती घेण्याबाबत सूचित केले होते. मी वैद्यकीय शिक्षण मंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर जनतेतून अवयवदानाला चालना मिळावी, याकरिता राज्यस्तरावर कार्यक्रम हाती घेतला. वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागांतर्गत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याद्वारे विविध उपक्रमाचे आयोजन केले.

महा अवयवदान जनजागृती अभियान ३० ऑगस्ट, २०१६ ते १ सप्टेंबर, २०१६ राबवले. त्यास चांगले यश मिळाले. आतापर्यंत राज्यातून अवयवदानासाठी एक लाखाहून अधिक नागरिकांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

अवयव प्रत्यारोपणामध्येच गरजूंना फायदा व्हावा, त्या प्रक्रियेतील धोका कमी होऊन सुरक्षित प्रत्यारोपण होण्यासाठी मानवी उपचाराकरिता व अवयवांची व्यावयायिक विक्री थांबावी म्हणून केंद्र सरकारने मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा-१९९४ लागू केला. आजपर्यंत ११,३६४ किडनी, ४६८ लिव्हर, १९ हृदय, ३ फुफ्फुसांचे आणि ४७९ डोळ्यांचे प्रत्यारोपण करून रुग्णांना नवे जीवन देण्यात आले आहे.

### महत्त्वाचे निर्णय

चंद्रपूर येथे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे आणि मुंबईतील आर.एन.कूपर येथे १५० विद्यार्थी क्षमतेचे नवीन महाविद्यालय सुरू केले आहे.

वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सामाईक परीक्षेत (सीईटी) सध्या सुरू असलेली निगेटिव्ह मार्किंगची (नकारात्मक शेरे) पद्धत शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्यात आली आहे. तसेच पी.ओ.आय. (पर्सन ऑफ इंडिया ओरिजिन) व ओ. सी.आय. (ओव्हरसिज सिटिजन ऑफ इंडिया) या विद्यार्थ्यांना एम.बी.बी.एस. आणि बी.डी.एस. अभ्यासक्रमाकरिता होणाऱ्या एम.एच.सीई.टी. २०१५ च्या प्रवेश परीक्षेस बसण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शब्दांकन: डॉ. संभाजी खराट**

# सुरक्षित आणि सुसह्य



**दिवाकर रावते**
परिवहन, खारभूमी विकास मंत्री

गतिमान विकासाची आणि जनसामान्यांच्या सेवेची 'चाके' माझ्या विभागाकडे असल्याचे मला मागील २ वर्षाकडे मागे वळून पाहताना जाणवते.

## भगिनी सन्मान

मुंबईसारख्या शहरांमध्ये शेअर टॅक्सीमध्ये दाटीवाटीने प्रवास करताना महिलांची नेहमी कुचंबणा होते. त्यामुळेच शेअर टॅक्सीतील चालकाशेजारील पुढची सीट महिलांसाठी राखून ठेवण्याचा निर्णय घेतला. 'भगिनी सन्मान योजना' म्हणून राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी सुरू आहे. वातानुकूलित शिवनेरी बसमध्ये महिलांसाठी १० जागा आरक्षित करण्याचा निर्णयही घेतला.

## स्वाती अभय पास

महाराष्ट्राच्या विविध भागात मागच्या वर्षी पडलेल्या दुष्काळामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. मराठवाड्यात कॉलेजमध्ये जाण्या-येण्यासाठी एसटीच्या तिकिटासाठी पैसे नाहीत, या दु:खामुळे एका मुलीने आत्महत्या केली. मलाही या घटनेचे अतीव दु:ख झाले. मंत्रालयात यासंदर्भात तातडीने बैठक घेऊन दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील अकरावी ते पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत एसटी पास योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

## रस्ते सुरक्षितता

मागील २ वर्षात परिवहन विभागाने रस्ते सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना राबवण्यावर प्राधान्याने भर दिला आहे. रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या जास्त आहे. यातील अनेक मृत्यू हे वाहतुकीचे नियम न पाळणे, हेल्मेटचा वापर न करणे यांसारख्या मानवी चुकांमुळे होतात. या चुका टाळल्यास मोठी प्राणहानी टळू शकते. यासाठीच राज्याच्या विविध भागात रस्ता सुरक्षा पंधरवड्यासारखे उपक्रम राबवून लोकांना याबाबत प्रबोधित करण्यात आले आहे.

दुचाकीवरील अपघातात झालेले मृत्यू हे हेल्मेटचा वापर न केल्यामुळे झाले असल्याचे वारंवार समोर आले आहे. त्यामुळे परिवहन कार्यालयातून दुचाकी वाहन चालकांना, शिकाऊ वाहन चालक परवाना दिला जात असताना त्यांच्याकडून हेल्मेट वापराविषयी बंधपत्र घेण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय पेट्रोल पंप चालकांनी हेल्मेट परिधान न केलेल्या दुचाकीस्वारास पेट्रोल दिल्यानंतर, अशा वाहनांचे क्रमांक संबंधित प्रादेशिक, उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यास पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यातून लोकांना हेल्मेट वापराबाबत उद्युक्त करणे आणि रस्ते अपघातातून होणारी नाहक जीवितहानी टाळणे हा उद्देश आहे.

वाहन चालकांमधील बेशिस्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोटार वाहन कायद्यांतर्गत आकारण्यात येणाऱ्या तडजोड शुल्काची (दंडाची) रक्कम वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. परिपूर्ण व प्रशिक्षित वाहनचालक निर्माण करणे हा राज्य शासनाचा निर्धार आहे. यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये चाचणी मार्गिकांची (टेस्टिंग ट्रॅक) निर्मिती करण्यात येणार आहे. महामार्गावरील अपघाताची समस्या दिवसेंदिवस बिकट होत असल्याचे लक्षात घेता चालक परवाना चाचणी केंद्र उभारण्याकरिता खाजगी भागीदारीतून योजना सुरू करणे आवश्यक आहे. हे काम करण्यासाठी व यासंबंधीचा सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी पुण्यातील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रस्ते सुरक्षेच्या आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी व यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी आणि सनियंत्रण करण्यासाठी राज्य रस्ते सुरक्षा परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर अपघात रोखण्यासाठीही विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

राज्यात होणाऱ्या नवीन वाहन खरेदीनंतर भरावयाच्या मोटार वाहन करावर १० टक्क्यांपर्यंत उपकर लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यातून दरवर्षी साधारण ५०० कोटी रुपये उपकर रूपात जमा होणे

> गेल्या २ वर्षांत राज्यातील रस्ते वाहतूक व्यवस्था सुरक्षित केली. एसटीच्या आधुनिकीकरणाला चालना देऊन प्रवाशांना दिलासा दिला. रेल्वे जाळ्याचा विकास करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले उचलली. नवे टॅक्सी परवाने देण्याचा निर्णय घेऊन स्वयंरोजगाराच्या विविध संधी निर्माण केल्या.

अपेक्षित आहे. हा निधी रस्ते सुरक्षतेबाबत उपाययोजना, जनजागृतीसाठी वापरला जाईल.

## प्रवाशांना दिलासा

रद्द तथा व्यपगत झालेल्या टॅक्सी परवान्यांचे नूतनीकरण करण्यासाठी ३१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या नूतनीकरणाची मुदत संपली होती. पण टॅक्सी संघटनांची मागणी विचारात घेऊन ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

राज्यात विविध कारणास्तव रद्द किंवा व्यपगत झालेल्या ऑटोरिक्षा परवान्यांची संख्या १ लाख ४० हजार इतकी आहे.या ऑटोरिक्षा परवान्यांचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. १९९८ पासून नवीन टॅक्सींना परवाने वितरण बंद केले होते. भविष्यात एमएमआर क्षेत्रात नवीन २५ हजार टॅक्सी परवाने देण्याचा निर्णय विभागाच्या नियोजनात आहे. यामुळे अंदाजे ५० हजार लोकांना रोजगार उपलब्ध होईल. एमएमआर क्षेत्रातील तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा, याकरिता १ लाख नवीन ऑटो परवान्यांचा लॉटरी पद्धतीने वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील अकरावी ते पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत एसटी पास योजना राबवण्यात आली. यामुळे मराठवाड्यातील ४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांना लाभ मिळाला.**


## सुरक्षित प्रवास

सुरक्षित प्रवास करण्यासाठी लोक एसटीलाच प्राधान्य देतात. दुर्दैवाने अपघात झाला आणि त्यात प्रवाशाचा मृत्यू झाला तर मिळणारी भरपाई फक्त ३ लाख रुपयांची आणि गेलेल्याच्या कुटुंबाला न सावरणारी होती. विम्याची ही रक्कम आता १० लाख रुपये इतकी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी कामगार करारापोटी एसटी महामंडळास २०००-२००४ व २००४-२००८ याकरिता ३५२ कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वेळोवेळी वाढ करण्यात आली आहे. नुकताच हा भत्ता १२५ टक्के इतका करण्यात आला आहे. १९९८ साली मी परिवहन मंत्री असताना म्हणजे सुमारे १७ वर्षांपूर्वी एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट दिली होती.त्यानंतर पुन्हा २०१५ मध्ये कर्मचाऱ्यांना २ हजार ५०० रुपये व अधिकाऱ्यांना ५ हजार रुपये इतकी रक्कम दिवाळी भेट म्हणून देण्याचा निर्णय घेतला. एसटी कर्मचाऱ्यांना उत्सव अग्रीम व पात्र कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानासाठी ७५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. आदिवासी जमातीतील उमेदवारांना २०१२ साली नाकारलेली नोकरी, पुन्हा निर्णय घेऊन संबंधित उमेदवारांना नियुक्ती पत्रे देण्यात आली आहेत. महामंडळातील चालकांची रिक्त पदे लक्षात घेता ७ हजार ४०० पदांची भरती प्रक्रिया पूर्णत्वास गेली आहे. वाहन चालकांच्या बदली संदर्भात धोरण जाहीर करण्यात आले आहे.एसटी सेवेचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने राज्यात १३ ठिकाणी नवीन बसपोर्ट स्थापन करण्यात येणार आहेत. राज्यातील सर्व एसटी बस स्थानकांचे आधुनिकीकरण करणे व तिथे पायाभूत सुविधा पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय एसटीच्या ताफ्यात नव्या ५०० शिवशाही बस लवकरच दाखल होत आहेत.

## सण, उत्सवांसाठी चोख व्यवस्था

कोकणवासी दरवर्षी गणेशोत्सवासाठी कोकणात जातात. यासाठी एसटी किंवा रेल्वे ही त्यांची प्राथमिकता असते. यासाठी राज्य शासनाने प्रथमच मागील वर्षी २ हजार ५०० तर चालू वर्षी तितक्याच बसेस कोकणातील गणेशोत्सवासाठी उपलब्ध करून दिल्या. नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यांच्या वेळी भाविकांच्या सोयीसाठी एसटीच्या ३ हजार अतिरिक्त बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या. एसटीमार्फत या काळात ४ हजार ८६५ बसेसमार्फत, ३९ हजार ७१५ फेऱ्यांद्वारे, १४ लाख ७६ हजार प्रवाशांची वाहतूक करण्यात आली. खाजगी वाहनांकडून दिवाळीच्या काळात होणारी प्रवाशांची लूट थांबवण्याकरिता एसटीकडून उपाययोजना करण्यात आल्या.

**शब्दांकन : इर्शाद बागवान**



राज्य शासन आणि रेल्वे मंत्रालय यांच्या भागीदारीतून लोहमार्ग विकास कंपनी स्थापना करण्यात आली आहे.



**सुभाष देसाई**
उद्योग, खनिकर्म मंत्री

# गुंतवणूक सुपरफास्ट

गेल्या २ वर्षातील यंदाचे वर्ष हे महाराष्ट्राच्या उद्योग विश्वासाठी अधिक महत्त्वाचे वर्ष होते, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास जिंकण्यासाठी व ही गुंतवणूक कायमस्वरूपी राज्यात राहावी, यासाठी प्राधान्याने लक्ष पुरवणार आहे.

## मेक इन महाराष्ट्राची वाटचाल

महाराष्ट्राला 'महाउद्योग राष्ट्र' करण्यासाठी आम्ही पहिल्या वर्षापासूनच पावले उचलण्यास सुरुवात केली. त्यामुळेच १३ ते १८ फेब्रुवारी २०१६ मध्ये झालेल्या 'मेक इन इंडिया' सप्ताहामध्ये अनेक सामंजस्य करार करण्यात आले. या करारांची अमलंबजावणी करण्यासाठी तातडीने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली कृती दलाची स्थापना केली व त्याद्वारे सामंजस्य कराराची गुंतवणूक प्रत्यक्ष भांडवली स्वरूपात आणण्यासाठी पाठपुरावा सुरू केला. त्यामुळे आतापर्यंत ३२ हजार ३७७ कोटी रुपयांचे सामंजस्य करार प्रत्यक्षात आले असून प्रकल्प उभारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. १ लाख २३ हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करार प्रत्यक्षात येण्यासाठीची चर्चा सुरू असून लवकरच गुंतवणूक राज्यात होईल. मध्यम, लघू व सूक्ष्म उद्योगांमध्ये २५१२ एवढे सामंजस्य करार झाले असून त्यातून २८ हजार ८६९ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. यातील ४७४ सामंजस्य करारांचे प्रत्यक्षात काम सुरू झाले असून ६२४७.३८ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. यातून २१ हजार ४०४ लोकांना रोजगार मिळाला आहे. तसेच २९२ करारांची प्रक्रिया सुरू आहे.

## व्यवसायाचे सुलभीकरण

व्यवसायाचे सुलभीकरण (इज ऑफ डुइंग बिझनेस) या अंतर्गत शासनाने उद्योग उभारणीसाठी अनेक निर्णय घेतले आहेत.

पूर्वी उद्योग सुरू करण्यासाठी अनेक परवाने लागत. आता आम्ही या परवान्यांची संख्या ७६ वरून २५ वर आणत आहोत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या परवानग्यांची संख्या १४ वरुन ५ इतकी कमी केली आहे. शासनाने आता 'नदी नियमन क्षेत्र' योजना (RRZ Policy) बंद केली आहे. या योजनेमुळे अनेक उद्योग सुरू होण्यास मदत झाली आहे. उद्योगांसाठी देण्यात येणारी अकृषिक परवानगी जलद गतीने देण्यासाठी महसूल विभागामार्फत प्रत्येक जिल्ह्यासाठी अतिरिक्त जिल्हा अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्या गठित केलेल्या आहेत. दुकाने आणि आस्थापना विभागामार्फत सर्व दुकाने ३६५ दिवस रात्री १० वाजेपर्यंत उघडी ठेवण्यासाठी तसेच महिला कर्मचाऱ्यांसाठी कामाची वेळ वाढवून रात्री ९.३० वाजेपर्यंत केली आहे. २० हजार चौ.मीटर पेक्षा जास्त बांधकाम असणाऱ्या औद्योगिक बांधकामासाठी आता पर्यावरण विभागाचा परवाना आवश्यक असणार नाही, अशी तरतूद राज्य शासनाने केली आहे.

राज्यात उद्योग स्थापन करण्याच्या प्रक्रियेमध्ये घटकाची गुंतवणूक, उत्पादन प्रक्रिया, उद्योगाचे ठिकाण इत्यादीच्या आधारे घ्याव्या लागत असलेल्या परवान्यांची संख्या कमी करण्यात येऊन त्याचे सुलभीकरण करण्यात आले आहे. यामुळे राज्यात औद्योगिक क्षेत्राला उभारी मिळाली आहे. उद्योगांचे निरीक्षण करण्याबाबत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून randomized risk based inspection ही प्रणाली कामगार विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेमार्फत अवलंबण्यात येत आहे. त्यामुळे निरीक्षकांकडून उद्योगांना द्यावयाच्या भेटीची संख्या व त्याचा कालावधी यामध्ये फरक पडणार आहे. यामुळे 'इन्स्पेक्टर राज' कमी झाले आहे. महाराष्ट्राच्या या प्रयत्नांची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवरून घेतली जात आहे. सिंगापूर स्थित इंटरनॅशनल कॉम्पिटिटीव्ह असोसिएशनने भारतातील सर्व राज्यांची पाहणी करून त्या सर्वांमध्ये महाराष्ट्राला पहिला क्रमांक बहाल केला.

## मैत्री कक्ष

शासनाने मैत्री कक्षाच्या माध्यमातून एक

> **'मेक इन इंडिया' सप्ताहामुळे महाराष्ट्र हा देशात गुंतवणुकीसाठी सर्वाधिक पसंतीचे ठिकाण असल्याचे पुन्हा सिद्ध झाले. या कालावधीत इतर राज्यांशी झालेल्या अल्प करारांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे स्थान अधिक बळकट करण्यासाठी, उद्योग विभागाने प्राधान्याने लक्ष केंद्रित केले आहे.**

खिडकी योजना सुरू केली आहे. या कक्षात ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. या मैत्री कक्षातून गुंतवणूकदारांना एकाच ठिकाणी सर्व मंजुऱ्या मिळत आहेत. त्यासाठी कालबद्ध मर्यादा ठरवण्यात आला आहे. प्रकल्पाच्या उभारणी दरम्यान व त्यानंतर येणाऱ्या अडचणींचे निवारण या माध्यमातून होणार आहे. तसेच त्याचे शुल्कही ऑनलाइन प्रणालीचा वापर करता येणार आहे. त्यामुळे उद्योगांना वेगवेगळ्या ठिकाणी फिरावे लागणार नाही. 'मेक इन महाराष्ट्र'साठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

'इज ऑफ डुइंग बिझनेस'अंतर्गत मुंबई महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवान्यासाठी लागणाऱ्या मंजुऱ्या २७ वरून ११ इतक्या कमी केल्या आहेत. त्याचा कालावधी १६२ दिवसांवरून ५० दिवसांवर आणण्यात आला. ऊर्जा विभागाकडून देण्यात येणारा विद्युत जोडणी परवान्यांची संख्या ७ वरुन ३ इतकी कमी केली. त्याचा कालावधी ६७ दिवसांवरून १५ दिवस इतका करण्यात आला आहे.

**दिल्ली मुंबई औद्योगिक कॉरिडॉरअंतर्गत शेंद्रा-बिडकीन येथे देशातील पहिली औद्योगिक नगरी ४ हजार हेक्टर जागेवर उभारण्यात येत आहे. या ठिकाणच्या पायाभूत सुविधांची कामे पूर्णत्वास आली आहेत.**

## औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटप

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाची वाटप प्रक्रिया अधिक पारदर्शी करण्यात येत आहे. त्यासाठी विशेष निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये औद्योगिक विकास महामंडळाच्या ज्या वसाहतीमधील ८० टक्क्यांपेक्षा जास्त भूखंड वितरित झाले आहेत, अशा क्षेत्रातील उर्वरित भूखंड वितरणासाठी निविदा पद्धती राबवण्यात येणार आहे. तसेच ८० टक्क्यापेक्षा कमी भूखंड वितरित झालेल्या क्षेत्रातील वाटप ऑनलाइन पद्धतीने थेट समिती करेल.

या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेसाठी १५ दिवसांचा अवधी देण्यात येणार असून या प्रक्रियेला व्यापक प्रसिद्धी देण्यात येणार आहे.औद्योगिक वसाहतींमध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना या उद्योगांसाठी, २० टक्के भूखंड राखीव ठेवण्याचा निर्णय नुकताच घेतला आहे. पूर्णत: पारदर्शक अशी ही वाटप प्रक्रिया झाली आहे.

## मेक इन महाराष्ट्र



**'मेक इन इंडिया' सप्ताहामध्ये राज्य शासनाने विविध क्षेत्रातील एकूण २६०३ सामंजस्य करार केले. त्यातून ८.०४ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ३० लाख व्यक्तींना रोजगार मिळणे अपेक्षित आहे. या सप्ताहामध्ये झालेल्या शासनासोबतच्या सामंजस्य करारातील २०९७ करार हे सूक्ष्म, लघू, मध्यम व मोठे उद्योग या क्षेत्रातील आहेत. २० करार कौशल्य विकासासंदर्भातील आहेत. उर्वरित सामंजस्य करार हे माहिती तंत्रज्ञान, वस्त्रोद्योग, कृषी व अन्नप्रक्रिया, ऊर्जा, गृहनिर्माण, पर्यटन, मेरी टाईम बोर्ड, सिडको, आरोग्य, पशुसंवर्धन आदी क्षेत्रांशी संबंधित आहेत.**

## विशेष सामूहिक प्रोत्साहन योजना

राज्यातील अनुसूचित जाती, जमाती समाजातील तरुणांनी उद्योगात पुढे यावे, त्या माध्यमातून समाजाचे उत्थान व्हावे, यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन योजना राबवण्यात येणार आहे. या योजनेत उत्पादन व माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा क्षेत्रातील उद्योजकांना मदत करण्यात येणार आहे.

## दिल्ली–मुंबई औद्योगिक कॉरिडॉर

दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरअंतर्गत शेंद्रा व बिडकीन येथे देशातील पहिली औद्योगिक नागरी वसाहत सुमारे ४ हजार हेक्टर जागेवर उभारण्यात येत असून या ठिकाणी गुंतवणुकीसाठी मोठे उद्योग इच्छुक आहेत. या ठिकाणच्या पायाभूत सुविधांची कामे पूर्णत्वास येत आहेत.

उद्योग संजीवनी योजनेची व्याप्ती वाढवून मुदतवाढ दिली. ही मुदतवाढ वाणिज्य, निवासी, प्राधन्य सदरातील तसेच उद्योग विस्ताराच्या भूखंडांना लागू होईल. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी भूखंड राखीव ठेवण्याच्या निर्णयामुळे राज्यातील या क्षेत्रातील उद्योगवाढीसाठी पोषक वातावरण निर्माण होत आहे.

महामंडळाच्या पूर्वीच विकसित औद्योगिक क्षेत्रातील उपलब्ध भूखंडातील २० टक्के क्षेत्र या उद्योग क्षेत्रासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. लघु व सूक्ष्म उद्योगांसाठी पिंपरी-चिंचवड, जळगाव, हिंगणा (नागपूर), अहमदनगर व वागळे इस्टेट (ठाणे) या पाच औद्योगिक वसाहतींमध्ये गाळे बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही निर्णयांमुळे राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना प्रोत्साहन मिळेल.

**शब्दांकन: नंदकुमार वाघमारे**

# शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी



**पांडुरंग फुंडकर**
कृषी, फलोत्पादन मंत्री

> **महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास करण्यासाठी राज्य शासनाने दोन वर्षांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण योजनांची अंमलबजावणी सुरू केली आहे. शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी कृषी विभागाबरोबरच सहकार, पणन, मदत व पुनर्वसन, महसूल, ऊर्जा विभागांनीही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.**

गेल्या दोन वर्षात राज्य शासनाने शेती आणि शेतकरी विकासासाठी अभिनव योजना सुरू केल्या आहेत. कृषिमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारून जवळपास चार महिने झाले आहेत. या चार महिन्यांच्या काळात कृषिविकासाच्या योजनांना गती देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे.

### बळीराजाला दिलासा

सलग चार वर्ष राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने त्याचा परिणाम एकंदरीतच कृषिविकासावर आणि शेतकरी बांधवांवर झाला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे होरपळलेल्या बळीराजाला सावरण्यासाठी गेल्या दोन वर्षात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. नैराश्य आलेला शेतकरी आत्महत्येचा मार्ग पत्करू लागले. अशा परिस्थितीत शेतकरी बांधवाला धीर देण्याचे काम केले. जलयुक्त शिवार योजना सुरू करून दुष्काळी गावांत पाणी आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. राज्यातील सुमारे ११ हजार गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेंतर्गत जलसिंचनाची कामे सुरू आहेत. यावर्षी पाऊस चांगला होत असल्याने बळीराजाला काहीसा दिलासा मिळाला आहे.

जलयुक्त शिवार योजनेंतर्गत झालेल्या कामांमध्ये पाणी साठवण चांगले झाले आहे. ज्या भागात पावसाने ओढ दिली तेथे पिकांना पाणी देता यावे यासाठी कृषिपंपांना १२ तास वीज पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे दिवसाच्या वेळी शेतीला पाणी देणे शक्य होत आहे.

लहरी हवामानाचा फटका राज्याच्या कृषी क्षेत्राला बसला आहे. त्यामुळे बळीराजाला सावरण्यासाठी तातडीची मदत केली गेली. केंद्र शासनाच्या मदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांना ४ हजार कोटी रुपयांची मदत वितरित केली तीही थेट त्यांच्या बँक खात्यात. गेल्या दोन वर्षांत राज्य शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना ९,५०० कोटी रुपयांची मदत केली आहे. भविष्यातही शेतकरी बांधवांच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही.

### कृषी समृद्धी प्रकल्प

यवतमाळ आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी स्व. मोतीरामजी लहाने कृषी समृद्धी प्रकल्प राबवण्यात येत आहे. याअंतर्गत क्षेत्र विकास आणि विपदाग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबासाठी शाश्वत आर्थिक उत्पन्नाचा स्रोत विकसित करण्यात येणार आहे.

विदर्भ व मराठवाड्यातील ४००० दुष्काळग्रस्त गावे आणि विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्यातील खारपाण पट्ट्यातील सुमारे ९०० गावांमध्ये हवामानकूल कृषी प्रकल्प जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने राबवण्यात येणार आहेत. त्याचा फायदा शेतकरी बांधवांना होणार आहे. लहरी हवामानामुळे खचून न जाता कृषी क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

### पीक विमा योजनेची मदत

राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेंतर्गत गेल्या १५ वर्षांत वितरित झाली नाही एवढ्या मोठ्या प्रमाणावर रक्कम शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात आली. या योजनेमध्ये राज्यातील शेतकऱ्यांना सहभागी होता यावे यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे पाठपुरावा करून मुदतवाढ मागून घेतली.

शेतकरी बांधवांना झालेला अपघात त्यातून आलेले अपंगत्व यासाठी आर्थिक मदतीसाठी शासनाने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरू केली आहे. राज्यातील १ कोटी ३७ लाख शेतकऱ्यांचा विमा या योजनेंतर्गत उतरवण्यात आला आहे.

बळीराजाची कर्जबाजारीपणातून मुक्ती करण्यासाठी नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या रूपांतरित पीक कर्जाच्या परतफेडीचा कालावधी ३ वर्षांवरून ५ वर्षे करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे व्यापारी बँकांप्रमाणेच जिल्हा बँकांच्याही पीक कर्जाचे व्याजासह रूपांतरणाचा निर्णय घेतला आहे.

### आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांकडे विशेष लक्ष


शेतकऱ्यांना अन्नसुरक्षा, आरोग्यसेवा,

**खरीप २०१५ हंगाममध्ये ४ हजार २०५ कोटी रुपयांची मदत ७१ लाख शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली. खरीप २०१६ पासून राज्यातील ५३ लाख शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये सहभाग नोंदवला आहे.**

पाल्यांच्या शिक्षणासाठी साहाय्य करण्यासाठी मिशन हाती घेण्यात आले आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांकडे विशेष लक्ष पुरवण्यासाठी वसंतराव नाईक स्वाभिमान शेती मिशनची स्थापना करण्यात आली. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. या जिल्ह्यांतील जीवनदायी योजनेंतर्गत सेवा पुरवणाऱ्या रुग्णालयांच्या संख्येत वाढदेखील करण्यात येत आहे. त्याचबरोबर शेतकरी कुटुंबातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी माफी देण्यात येत आहे. अन्नसुरक्षा देण्यासाठी २ रुपयात गहू, ३ रुपयांत तांदूळ या १४ जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना देण्यात येत आहेत.

या योजनेंतर्गत ६८ लाख शेतकरी कुटुंब लाभार्थी असून प्रतिकुटुंब २० ते ३५ किलो धान्य प्रतिमाह यानुसार ३४ हजार मेट्रिक टन धान्य वाटप केले जात आहे.

दुष्काळी परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती यामध्ये होणाऱ्या नुकसानाची भरपाई देतानाचे निकषात बदल करण्यात आले आहेत. अतिवृष्टी, वादळ, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीत नुकसान झाल्यास भरपाईसाठी असलेली ५० टक्के नुकसानीची अट ३३ टक्क्यांवर करण्यात आली आहे. १४ जिल्ह्यांमध्ये नवीन वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत.



## शेतकऱ्यांना दिलासा

**खताचा समतोल वापर करून शाश्वत शेतीस चालना देण्याकरिता मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले आहे. २०१५-१६ करिता निर्धारित १० लाख पैकी ७.७४ लाख नमुन्यांची तपासणी करण्यात आली असून शिफारशींसह एकूण ३३,००० मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले आहे. ५ लाख सौरकृषी पंपांसाठी पथदर्शी प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. कृषी विकासासाठी तंत्रज्ञानाचे साहाय्य देण्यात येत आहे. तालुका पातळीवर हवामानाची अद्ययावत माहिती देण्यासाठी २ हजार ६५ केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे.**

### नफेखोरीला आळा

बियाणे निर्मिती कंपनीच्या नफेखोरीला आळा बसावा यासाठी बी.टी. कापसाच्या किंमतीत पाकिटामागे १०० रुपयांनी कपात केली. त्याचा ५० लाख शेतकऱ्यांना फायदा झाला.

ठिबक सिंचनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. १.३७ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर ४१५ कोटी रुपयांच्या अनुदानाचे थेट वाटप करण्यात आले. २०१२-१३ पर्यंतची प्रलंबित देयकेदेखील अदा केली गेली आहेत.

### मूल्य-साखळी विकास कार्यक्रम

उत्पादनापासून - पणन व्यवस्थेपर्यंत मूल्य-साखळी विकास कार्यक्रम आम्ही हाती घेतला आहे. त्याअंतर्गत खाजगी कंपन्यांच्या सहभागाद्वारे विविध पिकांसाठी मूल्य-साखळीद्वारे शेतकऱ्यांसाठी पणन व्यवस्था उभी करणे, कृषी क्षेत्रात खाजगी क्षेत्राची गुंतवणूक व भागीदारी वाढवणे, या कार्यक्रमांतर्गत २० प्रकल्प मंजूर करण्यात आले असून ६० कंपन्यांनी सहभाग घेतला आहे. सुमारे २ लाख हेक्टर क्षेत्रावर हा कार्यक्रम राबवला जात आहे.

### एम-किसान प्रणाली

शेतकऱ्यांना कृषीविषयक सल्ला देण्यासाठी एम-किसान प्रणाली सुरू करण्यात आली आहे त्यामध्ये शेतकरी बांधवांनी मोठा सहभाग नोंदवला आहे. एम -किसान सेवेमध्ये महाराष्ट्र देशात सर्वप्रथम आहे. मार्च २०१६ अखेर ५१ लाख शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. मागील वर्षभरामध्ये ३४.७० लाख नवीन शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे हवामान आधारित कृषी विषयक सल्ला आणि शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाविषयक माहितीची थेट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यातील ५०० गावांत पथदर्शी प्रकल्प म्हणून उपग्रह तंत्रज्ञानावर आधारित पीक विमा सर्वेक्षणाची योजना राबवण्यात येत आहे. त्यामुळे पीक नुकसानीचे अचूक सर्वेक्षण करण्यात येऊन शेतकऱ्यांना योग्य भरपाई मिळण्यास मदत होणार आहे. कृषी विद्यापीठांमधील रोजंदार मजूर, कुशल व अर्धकुशल कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा निर्णयदेखील घेण्यात आला आहे. गेल्या दोन वर्षात उत्तम अशी कामगिरी करून शेतकरी बांधवांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**शब्दांकन: अजय जाधव**

# संवर्धन आणि संरक्षण



**रामदास कदम**
पर्यावरण मंत्री

वातावरणाचे संतुलन टिकून राहावे, यासाठी अनेक प्रकल्प योजना आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. नवीन उद्योग अथवा बांधकाम, प्रकल्प तयार करताना पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही याची पर्यावरण विभागामार्फत कटाक्षाने काळजी घेतली जात आहे.

### नमामि चंद्रभागा

लोकसहभागातून यशस्वी करण्यात आलेले नमामि चंद्रभागा अभियान हे एक उत्तम उदाहरण आहे. चंद्रभागेच्या पावित्र्याचे आणि निर्मलतेचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन या अभियानासाठी २० कोटी रुपये इतका निधी प्राथमिक टप्प्यात मंजूर करण्यात आला असून, या अभियानाचे कार्य सुरू आहे. चंद्रभागा नदीत प्रक्रिया न केलेले पाणी जाऊ नये, यासाठी सध्याच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यासाठी सीएसआयआर-निरीची तांत्रिक साहाय्यासाठी नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नमामि चंद्रभागांतर्गत वनविभागाच्या आठ हेक्टर जागेवर तुळशी उद्यान उभारण्यात येणार आहे. तुळशी माळा आणि निर्माल्याचे खत तयार करण्याचे काम हाती घेण्यात येणार असून नदीच्या घाटावर एका बाजूने वृक्षलागवड केली जाणार आहे. या नदीच्या पाण्याचा दर्जा सुधारणे व त्यासंबंधीचा अभ्यास करण्यासाठी नीरी या केंद्र सरकारच्या संस्थेसोबत लवकरच सामंजस्य करार करण्यात येणार आहे. राज्य सरकारने २०२२ पर्यंत चंद्रभागा प्रदूषणमुक्त करण्याचा संकल्प केला आहे.

### नदी प्रदूषणावर नियंत्रण

मुंबईतील मिठी नदीच्या शुद्धीकरण व संवर्धनीकरणाचेही कार्य सुरू असून, मिठी नदी विकास प्रकल्पांतर्गत विविध बैठका घेऊन कार्याचा अहवाल घेतला जातो. लवकरच मिठी नदी ही मुंबईची ओळख होईल, अशा पद्धतीने तिचे रूप बदलणार आहे.

औद्योगिक विकास महामंडळातर्फे औद्योगिक विकासाच्या दृष्टीने स्थापलेल्या १८३ वसाहती महाराष्ट्रात कार्यरत आहेत. औद्योगिकीकरणाबरोबर होणाऱ्या प्रदूषणाच्या व पर्यावरणासंबंधीच्या समस्यांबाबत असलेल्या जल प्रदूषण नियंत्रण कायद्याचा काटेकोर वापर व्हावा, यासाठी काटेकोरपणे प्रयत्न केले जात आहेत. नदी आणि तलाव यामध्ये प्रदूषणरहित सांडपाणी सोडण्यात येऊ नये यासाठी कठोर पावले उचलण्यात आली आहेत. मुंबईतील उल्हास, ओशिवरा, पोईसर, वालभाट, दहिसर या नद्यांतील प्रदूषण रोखण्यासाठी यंत्रणा कार्यरत आहे.

राज्यातील तलाव, सरोवर आणि जलाशयांचे पर्यावरणाच्या संतुलनातील अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन सरोवर संवर्धन योजना राबवण्यात येते. याचबरोबर राज्याच्या विकासात सहभागी ठरतील असे मुंबई ट्रान्स हार्बर लिंक या प्रस्तावास पर्यावरण व वातावरणीय बदल विचारात घेऊन सी. आर.झेड ने मान्यता दिली आहे. मुंबई सागरी रस्ता बाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळावी यासाठी केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे.

### ध्वनी प्रदूषणाला आळा

विविध उत्सव अथवा अन्यवेळी ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवून जनजीवन आरोग्यदायी राखण्यासाठी ध्वनी प्रदूषण नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस उपायुक्त किंवा साहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उपअधीक्षक दर्जाचे अधिकारी यांची ध्वनी प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यात ध्वनी क्षेपक व ध्वनिवर्धक वापरासाठी वर्षभरातील १५ दिवसांसाठी ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट देण्यात आली आहे.

महानगरपालिकांच्या धर्तीवर नागरी

> **“** प्रकल्पांना मान्यता देताना पर्यावरणाची हानी होऊन नागरिकांचे जीवनमान विस्कळीत होणार नाही, त्यांना निरोगी आरोग्य लाभावे यासाठी पर्यावरण विभाग प्राधान्याने विचार करतो. पर्यावरणाच्या अनेक प्रकल्पात लोकांचा सहभाग वाढवण्यावर राज्य शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. **”**

**पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या घटकांशी कार्यरत उद्योग, वन विभाग, सी.आर.झेड., समुद्र किनारपट्टी संरक्षण या विभागांच्या समन्वयाने कार्य करून पर्यावरणाचा समतोल राखण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न पर्यावरण विभाग करणार आहे.**

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी २५ टक्के निधी राखून ठेवण्याबाबत निर्देश दिले आहेत. मंडळाने अनधिकृत ६६ कत्तलखान्यांना बंदचे आदेश देऊन ते बंद केले आहेत. प्रदूषण वाढवण्यासाठी व प्राण्यांच्या जीवनाला हानी पोहोचवणाऱ्या कमी जाडीच्या प्लास्टिक बॅग उत्पादनावर बंदी आणली आहे.

### ऑनलाइन नूतनीकरण

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ऑनलाइन संगणकीय प्रणालीमुळे उद्योगांची उभारणी तसेच चालू आणि नूतनीकरण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या आता ऑनलाइन प्राप्त होणार आहेत. हे अर्ज संगणकावर अपलोड केल्यानंतर त्यांची मंजुरी मिळेपर्यंत सर्व बाबी कमी कालावधीत सुलभरीत्या व सोयीस्करपणे राज्यातील उद्योगांना प्राप्त करणे सहज शक्य होणार आहे.

हिरव्या संवर्गातील उद्योगांना संमतीपत्रासाठीचा आठ पानी अर्ज दोन पानांत सुलभ करण्यात आला आहे. सर्व उद्योगांना स्वयं नूतनीकरण प्रणाली लागू करण्यात आली आहे. सर्व संवर्गासाठी संमतीपत्राचा कालावधी किमान ५ वर्षे करण्यात आला आहे.

नारंगी लघुउद्योग व हिरव्या संवर्गातील सर्व उद्योगांना उद्योग उभारण्यापूर्वी व उद्योग सुरू करताना भेट देणे अनिवार्य करण्यात आले आहे. प्रदूषण प्रभारानुसार उद्योगांकरिता स्वतंत्र वेळापत्रक मुख्यालय स्तरावर संगणक प्रणालीतून तयार करण्यात आले आहे. याकरिता स्वैर प्रणाली स्वीकारण्यात आली आहे. उद्योगांच्या भेटीचा अहवाल मंडळाच्या अंतर्गत कार्यालयीन संगणक प्रणालीवर ४८ तासांच्या आत उपलब्ध केला जाईल.

## नमामि चंद्रभागा

**चंद्रभागा नदीच्या पाण्याचा दर्जा सुधार व त्यासंबंधीचा अभ्यास करण्यासाठी नीरी या केंद्र सरकारच्या संस्थेसोबत लवकरच सामंजस्य करार करण्यात येणार आहे. राज्य शासनाने २०२२ पर्यंत चंद्रभागा प्रदूषणमुक्त करण्याचा संकल्प केला आहे.**



### समन्वय

पर्यावरण हा नागरिकांच्या जीवनाशी अतिशय निगडित आणि महत्त्वाचा विषय आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि नागरीकीरणामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून, जल आणि वायू प्रदूषणास नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या घटकांशी कार्यरत असलेले उद्योग व वन विभाग, समुद्र किनारपट्टी संरक्षण या विभागाच्या समन्वयाने कार्य करून पर्यावरणाचा समतोल राखण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न पर्यावरण विभाग करणार आहे.

पर्यावरण विभागाबरोबरच लोकांचा सहभाग ही महत्त्वपूर्ण बाब आहे. लोकांच्या सहभागाशिवाय कोणतेही कार्य अथवा अभियान यशस्वी ठरू शकत नाही. राज्याच्या भौगोलिक परिस्थितीचा आणि बदलत्या जीवनशैलीचा अभ्यास केला असता भविष्यात पुढच्या पिढीला सुदृढ आरोग्य देण्यासाठी; आपण सर्वांनी मिळून पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने कार्य करायला हवे. नागरिकांनी अधिकाअधिक वृक्षलागवड करावी, सण आणि परंपरा यासाठी वृक्षांना हानी होईल, असे कोणतेही कृत्य शक्यतो टाळावे. वनसंपदा पर्यावरणासाठी अतिशय महत्त्वपूर्ण बाब आहे. सामाजिक अथवा कौटुंबिक कार्यक्रमात वापरलेले डिस्पोजल, ग्लास, नॅपकिन इत्यादी वस्तू शक्यतो वापरू नये. वापरल्यास त्याचा पुन्हा वापर होईल, याची काळजी घ्यावी कारण या सर्व वस्तू पर्यावरणावर परिणाम करत असतात. तसेच जमिनीत पाणी जिरवण्यासाठी होणारे सर्व ते प्रयत्न करावेत. पॉलिथीन पिशव्यांचा वापर टाळावा. ओला व सुका कचरा वेगळा करावा, तसेच जाळून नष्ट होईल असा कचरा जाळावा. कागदाचा पुनर्वापर करावा. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवू नये. सर्वांनी मिळून पर्यावरणाचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

**शब्दांकन : श्रद्धा मेश्राम – नलावडे**



एकनाथ शिंदे
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम) मंत्री

# नवे प्रतीक विकासाचे

कोणत्याही देशाचा, राज्याचा विकास हा तेथील दळणवळणाच्या सोयीसुविधांवर अवलंबून असतो. रेल्वे, रस्ते आणि जलमार्गाचे जाळे मुबलक प्रमाणात असेल तर त्या भागात औद्योगिकीकरण आणि नागरीकरण झपाट्याने होते. हजारो लोकांना रोजगार मिळतो. त्यामुळे राज्य शासनाने चौफेर रस्ते विकास आणि पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केले आहे.

## समृद्धी जलदगती महामार्ग

नागपूर-मुंबई समृद्धी जलदगती महामार्गाचे काम जानेवारी, २०१७ पासून सुरू होणार आहे. हा महामार्ग एकूण ७०६ किलोमीटरचा असून राज्य रस्ते विकास महामंडळ तो बांधणार आहे. या महामार्गामुळे राज्यातील २४ जिल्हे जोडले जाणार असून नागपूर ते औरंगाबाद हे अंतर ३ तासात तर औरंगाबाद ते मुंबई हे अंतर ३ तासात कापता येणार आहे. या महामार्गावर हॉटेल, मॉल, पर्यटन केंद्र, कृषिपूरक उद्योग केंद्र, बँका, एटीएम, वेअर हाऊस, छोटे व मोठे उद्योग उभारले जाणार आहेत.

या महामार्गाचे वैशिष्ट्य म्हणजे या जलदगती महामार्गावर एकूण २३ टाऊनशिप करण्यात येणार आहेत. हा प्रकल्प ४६ हजार कोटी रुपयांचा असून त्यासाठी १० हजार हेक्टर जमिनीचे भूसंपादन केले जाणार आहे. यासाठी आंध्रप्रदेश पॅटर्नप्रमाणे भरभक्कम मोबदला दिला जाणार आहे. पुढील चार महिन्यात भूसंपादनाचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

हा महामार्ग २०१९ पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासकीय यंत्रणा वेगाने कामाला लागली असून सुमारे २५ लाख लोकांना रोजगाराची संधी मिळणार आहे. हा महामार्ग तयार करण्यासाठी चीन, मलेशिया, कोरिया या राष्ट्रांनी प्रत्यक्षपणे संपर्क साधून तयारी दर्शवली आहे.

या महामार्गावर दोन्ही बाजूने देशविदेशातील मोठे कारखाने उभारले जाणार असल्याने मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन प्रचंड आर्थिक उलाढाल होणार आहे. त्यामुळे राज्याचा चौफेर विकास साधला जाणार आहे. हा प्रकल्प झाल्यानंतर महाराष्ट्र हे देशातील क्रमांक एकचे सर्वात प्रगतशील राज्य बनणार आहे. विकासाचा दर अन्य राज्यापेक्षा कित्येक पटीने वाढणार आहे. नागपूरहून मुंबई, पुण्याला तसेच अन्य जिल्ह्यातून मुंबईला येणारा शेतमाल व अन्य उत्पादने वाहून नेणे अधिक सोईचे आणि सुरक्षित होणार आहे.

## कृषिपूरक उद्योगांना चालना

या महामार्गालगत उभारण्यात येणारी नवनगरेही कृषिपूरक उद्योगांना चालना देणारी व ग्रामीण भागात सुविधा देणारी कृषी समृद्धी केंद्रे असणार आहेत. या प्रकल्पामुळे मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील २४ जिल्हे देशाच्या आर्थिक राजधानीशी जोडले जाणार आहेत. हा महामार्ग एकूण ६ लेनचा होणार असून सुरक्षिततेचे सर्व उपाय या मार्गावर असतील. आपत्कालीन परिस्थिती अथवा युद्धजन्य परिस्थितीत हेलिकॅप्टर अथवा विमानदेखील उतरू शकेल अशी व्यवस्था या महामार्गावर असणार आहे. काही अंतरावर हेलिपॅडदेखील तयार केले जाणार आहे. या रस्त्याच्या मध्ये येणारी खेडी, नदी, नाले यावर उड्डाणपूल, छोटे-मोठे पूल आणि सब-वे असणार तर काही ठिकाणी बोगदा काढून हा मार्ग तयार केला जाणार आहे. विशेष म्हणजे महामार्गाच्या आजूबाजूला असलेली तीर्थक्षेत्रे, पर्यटन स्थळे आणि मुख्यालये ही द्रुतगती मार्गाशी जोडली जाणार आहेत.

राज्यातील २६ तालुके आणि ३८२ गावांतून जाणारा हा महामार्ग देशातील राष्ट्रीय महामार्गाशी जोडला जाणार आहे. राज्यातील २४ जिल्ह्यांचे अर्थकारण बदलणारा महाराष्ट्र राज्याला सक्षम करणारा असा नागपूर-मुंबई सुपर एक्स्प्रेस कम्युनिकेशन-वे करण्यात येणार आहे.

**बाजारपेठेशी कनेक्टिव्हिटी वाढल्याने आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात होते. हे 'मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे'मुळे अनुभवास आले आहे. हा एक्सप्रेस-वे विकासाचा महामार्ग ठरला. याच धर्तीवर नागपूर-मुंबई समृद्धी जलदगती महामार्गाचे काम जानेवारी २०१७ पासून सुरु होणार आहे.**

**नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग प्रकल्पामुळे मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील २४ जिल्हे देशाच्या आर्थिक राजधानीशी जोडले जाणार आहेत. ३० तालुके आणि ३५५ गावातून जाणारा हा महामार्ग देशातील राष्ट्रीय महामार्गांशी जोडला जाईल.**

### लॅण्ड पुलिंग योजना

नागपूर-मुंबई या समृद्धी महामार्गासाठी जोड रस्ते व त्यावरील नवनगरांच्या आखणीमध्ये अंतर्भूत जमिनी भूधारकांकडून स्वेच्छेने, संमतीने, विनासंघर्ष प्राप्त करण्यासाठी अधिकाऱ्यांनी शेतकरी व इतर नागरिकांचे समुपदेशन सुरू केले आहे. त्यांच्या अडचणी, प्रश्न समजावून घेत आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व आंध्रप्रदेशाच्या अमरावती या नूतन राजधानी क्षेत्राच्या जमीन हस्तांतरण (लॅण्ड पुलिंग) योजनेंतर्गत लाभ विचारात घेऊन नवीन केंद्रीय भूमिसंपादन कायद्यापेक्षा जास्त मोबदला व अधिक लाभदायक फायदे मिळणार आहेत.



### अनोखे प्रतीक

**नागपूर–मुंबई समृद्धी महामार्ग मोठी दळणवळण क्रांती घडवणारा प्रकल्प ठरेल. ७५० कि.मी.चा हा सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस–वे आधुनिक महाराष्ट्रातील परिवहन व्यवस्थेचे अनोखे प्रतीक ठरेल.**

### रस्ते विकास

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे मागील दोन वर्षात अनेक महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण झाले आहेत. काही प्रगतीपथावर आहेत. पुणे येथील उड्डाणपुलाचे काम, वाहन भुयारी मार्ग व पादचारी भुयारी मार्गाचे काम पूर्ण होऊन २७ मे, २०१६ पासून हा मार्ग वाहतुकीस खुला करण्यात आला आहे. या प्रकल्पाची किंमत रुपये १५७ कोटी एवढी असून आतापर्यंत रुपये ८८.०० कोटी खर्च झाला आहे.

औरंगाबाद एकात्मिक रस्ते वाहतूक योजनेंतर्गत औरंगाबाद शहरात मोंढा नाका येथे उड्डाणपूल, संग्रामनगर येथे रत्वे उड्डाणपूल, महावीर चौक येथे उड्डाणपूल इत्यादी महत्त्वाची कामे मागील दोन वर्षात सुरू करून पूर्ण करण्यात आली असून; जून, २०१६ मध्ये सर्व उड्डाणपूल वाहतुकीस खुले करण्यात आले. नागपूर शहरातील १०० वर्षे अस्तित्वात असलेल्या ३ जुन्या पुलांऐवजी नवीन सहा पदरी केबल स्टँड उड्डाणपुलाचे (रामझुला) प्रथम टप्प्याचे काम पूर्ण करण्यात आले असून पूल वाहतुकीस खुला करण्यात आला आहे. रामझुला टप्पा दोन चे बांधकाम करण्यासाठी जुना उड्डाणपूल पाडण्याचे काम पूर्ण झाले आहे.

वाकण-पाली-खोपोली (रा.म.क्र.९३) चे चौपदरीकरण करण्यासाठी ४१ किमीचा मार्ग आहे. याचा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच मान्यतेसाठी केंद्र शासनास सादर करण्यात येत आहे.

### रेल्वे उड्डाणपूल

८७० कोटींची रेल्वे उड्डाणपुलांची कामे हाती घेण्यासाठी रस्ते विकास महामंडळास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून मंजुरी दिलेली आहे. हा प्रकल्प रेल्वे विभागाच्या माध्यमाने ५०:५० टक्के सहभागाने कार्यान्वयीन करण्याचे प्रस्तावित आहे.

ठाणे येथील खाडीवर नवीन तिसऱ्या पुलाचे काम हाती घेण्यात पायाभूत सुविधा समितीने मंजुरी दिलेली आहे. या प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून ठाणे येथील टिकुजीनीवाडी ते बोरीवली दरम्यान सुमारे ११ किमी लांबीच्या बोगद्याचे काम हाती घेण्यास पायाभूत सुविधा समितीने मान्यता दिलेली आहे.

भिवंडी-कल्याण शिळ रस्त्याचा उन्नत मार्ग/सहापदरी करण्यास पायाभूत सुविधा समितीने कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून मान्यता दिली आहे. दक्षिण मुंबईमधील वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी सध्या बांधण्यात आलेल्या वांद्रे-वरळी सागरी सेतूचा पुढील भाग म्हणून वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू ९.८९ किमी लांबीच्या पुलाचे बांधकाम महामंडळातर्फे करण्याचे नियोजित आहे.

पुणे शहरात वाढलेले प्रदूषण व वाहतुकीची प्रचंड कोंडी दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने पुणे रिंग रोडचे काम महामंडळाकडे सोपवलेले आहे. रस्ते वाहतूक महामार्ग मंत्रालयाने नव्याने घोषित केलेल्या सुमारे ३९०० किमी लांबीच्या रस्त्यांचे काम महामंडळावर सोपवले आहे. कामाचे प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्त करण्यात आले आहेत.

**शब्दांकन: डॉ. संभाजी खराट**



**चंद्रशेखर बावनकुळे**
ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा,
राज्य उत्पादन शुल्क मंत्री

# उजळल्या दाही दिशा

> राज्याला ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याचा विडा शासनाने उचलला आहे. ग्राहक आणि शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे राज्यात सध्या कुठेही भारनियमन नाही. जनतेला निरंतर आणि सुलभ दरामध्ये वीज मिळावी, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचा संतुलित विकास शासनाचे ध्येय आहे. निर्मिती, पारेषण आणि वितरण या तीन टप्प्यांवर योजनाबद्ध काम केल्यामुळे महाराष्ट्राच्या उजळल्या दाही दिशा... असे सार्थ अभिमानाने म्हणता येते.

कृषिपंपांना पुढील ३ महिने प्रतिमहिने प्रतिदिन १२ तास अखंड वीजपुरवठा करण्याच्या निर्णय घेतला. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा शेतीसाठी जलयुक्त शिवारांतर्गत तयार झालेल्या शेततळ्यांमधून पाणी घेणे शक्य होणार आहे. या निर्णयामुळे दुष्काळात शेतकऱ्यांना सोसाव्या लागणाऱ्या झळांपासून दिलासा मिळणार आहे.

विदर्भ आणि मराठवाड्यातील कृषिपंपांना वीजजोडणी देण्याचे काम महावितरण कंपनीने युद्धस्तरावर हाती घेतले आहे.

पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेसाठी महावितरण पारेषणला नाममात्र दरावर शासकीय जागा देण्याचा निर्णय घेणारे महाराष्ट्र शासन हे देशात एकमेव राज्य आहे.

या निर्णयांमुळे महावितरण व महापारेषण या दोन्ही कंपन्यांना विद्युत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व उपकेंद्रे निर्माण करण्यासाठी जागा विकत घ्यावी लागणार नाही. या निर्णयामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होणार नाही. त्यामुळे वीज दर वाढवण्याची गरज निर्माण होणार नाही.

## ग्राम ज्योती

ग्रामीण भागात वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाने दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना सुरू केली आहे. या योजनेद्वारे ग्रामीण भागातील कृषी अकृषिक वाहिनी विलगीकरण केले जाईल. त्याद्वारे ग्रामीण भागातील सामाजिक वीज वाहिनीवरून वीजपुरवठा होत असलेल्या अकृषिक ग्राहकांना स्वतंत्र वाहिनीद्वारे २४ x ७ वीज पुरवठा करण्यात येईल. ग्रामीण भागातील वीज पुरवठा नसलेले व दारिद्र्यरेषेखालील लाभार्थी यांच्या घरांसाठी नवीन वीज जोडण्या देण्यास लागणारी वीज वितरण यंत्रणा उभारली जाणार आहे. संसद आदर्शग्राम योजनेच्या गावांमध्ये वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

## अपारंपरिक ऊर्जेला प्राधान्य

राज्यात नवीन व नवीकरणीय ऊर्जास्रोत मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने ५ वर्षात १४,४०० मेगावॅट क्षमतेचे नवीन व नवीकरणीय ऊर्जेपासून वीज निर्मितीचे प्रकल्प आस्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यातील पवन व सौर यांसारख्या स्रोताबारोबरच उसाची चिपाडे, कृषिजन्य टाकाऊ पदार्थ, सेंद्रीय टाकाऊ पदार्थ, वैद्यकीय टाकाऊ पदार्थ, खनिजजन्य टाकाऊ पदार्थांसह औद्योगिक टाकाऊ पदार्थांसारख्या स्रोतापासून वीज निर्मिती करणे शक्य होणार आहे. त्यात बिगर शेतजमिनीचा मानीव दर्जा, मानवी औद्योगिक दर्जा, मानवी खुला प्रवेश यांचा समावेश असून प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची हे प्रकल्प उभारताना आवश्यकता भासणार नाही. अशा प्रकल्पांना पुढील १० वर्षांसाठी विद्युत शुल्कमाफी देण्यात येणार आहे. महाऊर्जेत होणारे नोंदणीकरण सोपे करण्यात येणार आहे. सौर, पवन ऊर्जा व औद्योगिक टाकाऊ पदार्थ यापासून उत्पादित केलेल्या विजेच्या खरेदीला स्पर्धात्मक निविदा लागू राहणार असल्याने राज्यातील सर्व विजग्राहकांना विजेच्या दरामध्ये फायदा होणार आहे.

## धडक सिंचन योजना

कृषिपंपासाठी विजेची जोडणी देताना काही तक्रारी आल्या किंवा अनियमितता झाल्या असतील तर त्यावर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. या योजनेमुळे ग्राहकांना न्याय मिळवून सगळी कामे वेगाने आणि पारदर्शकतेने केली जातील.

## ऑनलाइन ग्राहकसेवा

वीज ग्राहकांच्या सोयीसाठी महावितरणने ऑनलाइन ग्राहक सेवा सुरू केली आहे. वीज देयके व सुरक्षा रकमांचा भरणा करणे, विजेच्या नव्या जोडणीसाठी अर्ज करणे व लागणारे

शुल्क भरणे, ई-मेलद्वारे वीज ग्राहकांना देयके पाठवणे, वीज देयक व सुरक्षा रकमांचा भरणा करणे, या सेवेसाठी महावितरणाने विकसित केलेल्या मोबाइल ॲपचा ग्राहक लाभ घेऊ शकतात. ग्राहक रकमेचा भरणा क्रेडिट व डेबिट कार्ड, नेट बँकिंगद्वारे केव्हाही करू शकतात. विजग्राहकांना विजेच्या बिलासंबंधी किंवा नवीन वीज पुरवठ्यासंदर्भात काही तक्रार असेल तर ती तक्रार ऑनलाइन नोंदवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

वीज निर्मितीचे पारेषण आणि वितरण हे कमीत कमी पैशात जर केले व तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा जर कमी केला तर विजेचे दर कमी होऊ शकतात.

महाराष्ट्रात ७० टक्के वीज ही थर्मल म्हणजेच कोळसा वापरून निर्माण केली जाते. राज्यात कोळशाचा सरासरी दर १९०० रुपये प्रतिटन आहे, छत्तीसगड राज्यामध्ये तोच दर ११०० रुपये प्रतिटन आहे. ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करून महाराष्ट्राला लागूनच असलेली छत्तीसगड स्थित गरेपेरमा-२ ही खाण मिळवली. या खाणीमुळे पुढील ३० वर्षे साधारणत: ४००० मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती होऊ शकेल. ४००० मेगावॅटचे ऊर्जा निर्मिती केंद्र खाणीवरच उभा करून वीजनिर्मिती अजूनच स्वस्त दरात करण्याचा विचार केला जात आहे. वीज निर्मितीचा खर्च जर कमी झाला तर आपोआपच विजेचे दर कमी होतील.

**राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये 'महाऊर्जा' या संस्थेच्या सहकार्याने 'महावितरण'मार्फत १०,००० सौर कृषिपंपांची योजना राबवण्यात येत असून याचा फायदा गरीब कुटुंबातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर होत आहे.**

## फीडर व्यवस्थापन

फीडर व्यवस्थापन या अभिनव योजनेंतर्गत विद्युत अभियंता किंवा सेवानिवृत्त अभियंता यांची फीडर व्यवस्थापक म्हणून नेमणूक केली जाते. मीटर रिडिंग घेणे, वीजबिल वितरित करणे, नादुरुस्त मीटर बदलणे, वीजेची चोरी शोधून काढण्यासाठी मदत करणे दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे कामे फीडर व्यवस्थापक करत असल्यामुळे महावितरण कंपनीच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. ग्रामीण भागातील वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण, श्रेणीवर्धन, बळकटीकरण, वीज वितरण प्रणालीतील वीज हानीचे योग्य मोजमाप करण्यासाठी ऊर्जा अंकेक्षण महत्त्वाचे असल्याने यासाठी ग्राहकाकडे तसेच गावांमध्ये वीज वितरण रोहित्र व फीडर यावर योग्य क्षमतेचे मीटर लावण्यात येणार आहे.

## उद्योगांना सवलत

विदर्भ, मराठवाड्यातील औद्योगिक वीज ग्राहकांना वीजदरात सवलत देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे विदर्भ, मराठवाडा यातील नवीन औद्योगिक ग्राहकांना ७५ पैसे ते ५० पैसे प्रतियुनिट सवलत देण्यात आली आहे. यासाठी राज्यशासनाने १ हजार १४ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. विद्युत नियामक आयोगाने नुकतेच जाहीर केलेले विजेचे दर, पूर्वीच्या तुलनेत १९९९ नंतर पहिल्यांदाच कमी झाले. शासनाने वीज दरात कपात करण्यात यश मिळवलेले आहे.

ज्या गावात फीडर सेपरेशन झाले नाही तेथे घरगुती वापराचे फीडर स्वतंत्र करण्याचे काम सुरू आहे. राज्याला आवश्यक असणारी वीज पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

## तक्रारीसाठी व्हॉट्सॲप सुविधा

राज्यात अवैध दारू व्यवसाय तसेच अवैध दारू वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास तशी तक्रार आता व्हॉट्सॲपच्या माध्यमातून करण्याची व्यवस्था राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आली आहे. ८४२२००११३३ या क्रमांकावर ही तक्रार करता येईल. तक्रारकर्त्याचे नाव व माहिती गोपनीय ठेवण्यात येणार आहे. एखाद्या ठिकाणी अवैध दारू व्यवसाय होत असल्याची माहिती असूनही पोलीस विभागाकडे तक्रार करण्यास नागरिक धजावत नाहीत. त्यांना निर्भीडपणे तक्रार करता यावी यासाठी व्हाट्सॲपवर तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या तक्रारीची दखल आयुक्त तसेच वरिष्ठ पातळीवरून घेण्यात येणार आहे. याद्वारे अवैध दारू धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.

**शब्दांकन : सुनीता कुपेरकर**

## महावितरण ॲप

**महावितरणाने वीज ग्राहकांना मोबाइल ॲपची सुविधा दिली आहे. विविध पर्यायांद्वारे, वीज बिलाचे रिडिंग न घेतल्यास ग्राहकाला स्वत: फोटोद्वारे आपल्या वीज बिलाचे रिडिंग पाठवण्याची आणि नवीन वीज जोडणीसाठी अर्ज करण्याची तसेच वीज बिलांचा भरणा, वीज सेवाबाबत तक्रारी इ. महत्त्वाच्या सुविधा देण्यात आलेल्या आहेत. गुगल प्ले स्टोर्समधील पहिल्या १५ फ्री बिझनेस ॲपमध्ये महावितरण मोबाइल ॲप उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे ग्राहक सेवेत पारदर्शकता व तत्परता आली आहे.**










**बबनराव लोणीकर**
पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

# स्वच्छ आणि निर्मळ

> लोकांना पिण्याच्या पाण्याचा शाश्वत पुरवठा व्हावा यासाठी प्रभावीपणे प्रयत्न करण्यात आले. प्रत्येक गावाला पाणीपुरवठा योजना देण्यात आली. प्रत्येक गाव टंचाईमुक्त व्हावे यासाठी विविध योजना राबवण्यात आल्या. मागील दोन वर्षात स्वच्छता अभियानात राज्याने मोठी आघाडी घेतली आहे.

महाराष्ट्र राज्य मागील काही वर्षांपासून दुष्काळाचा मोठा सामना करीत आहे. मागच्या वर्षी पावसाने मोठी ओढ दिल्याने राज्यातील अनेक गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करावा लागला. एकट्या मराठवाड्यात चार हजार टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला. लातूर शहरात रेल्वेने पाणीपुरवठा करून तेथील लोकांना शासनामार्फत दिलासा देण्यात आला. दुष्काळी परिस्थितीत तातडीच्या पाणीपुरवठा योजना राबवण्यासाठी राज्यभरात साधारण ७०० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला. संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यासह राज्यातील ७,७७१ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त केल्या आहेत. येत्या तीन ते चार वर्षात राज्यातील प्रत्येक कुटुंबाला पिण्याचे पाणी आणि शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

## मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम

ग्रामीण जनतेस पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याकरिता 'मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम' या नावाखाली राज्य शासनाचा स्वत:चा असा ग्रामीण पाणी पुरवठ्याचा कार्यक्रम राबवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. हा कार्यक्रम २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षांसाठी राबवण्यात येणार आहे. याकरिता चार वर्षांसाठी रुपये २५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या कार्यक्रमामधून १००३ नवीन ग्रामीण पाणीपुरवठा योजना राबवण्यात येतील. ८३ प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यात येतील. ५३१ ग्रामीण योजनांच्या देखभाल दुरुस्तीकरिता दरवर्षी रुपये १०० कोटी याप्रमाणे चार वर्षांकरिता रुपये ४०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

## स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्यात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अभियान राबवण्यात येत असून महाराष्ट्रात या अभियानाची अंमलबजावणी अत्यंत प्रभावीपणे सुरू आहे. संपूर्ण देशात हागणदारीमुक्त ग्रामपंचायतींच्या संख्येत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. देशातील हागणदारीमुक्त घोषित ३५,७९१ ग्रामपंचायतींपैकी ७,७७१ ग्रामपंचायती या महाराष्ट्रातील आहेत. टक्केवारीनुसार आपला हिस्सा २२ टक्के इतका आहे. सर्व ग्रामपंचायती हागणदारीमुक्त होण्यासाठी सर्वसामान्य जनतेची वर्तणूक व मानसिकता बदलण्याकरिता महाराष्ट्राने स्वतःचा हागणदारीमुक्त आराखडा संकल्पना तयार करून यशस्वीपणे राबवला आहे. २०१६-१७ वर्षातील वार्षिक कृती आराखड्यातील समाविष्ट सर्व ११ हजार ७०८ ग्रामपंचायतींमध्ये अग्रक्रमाने हागणदारीमुक्तीची कामे प्रगतीपथावर आहेत. दोन वर्षांतील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत पायाभूत सर्वेक्षणानंतर एकूण १,१८,४९,४८१ पात्र लाभार्थ्यांपैकी ८१,८८,१६० लाभार्थ्यांकडे, वैयक्तिक शौचालये उपलब्ध करून देण्यात शासनाला यश आले आहे. या बाबतीत साध्य टक्केवारी ४५ टक्क्यांवरून ६३ टक्के (१८ टक्क्यांची झेप) च्या पुढे नेण्यात राज्य यशस्वी झाले आहे.

## सिंधुदुर्गचे यश

सिंधुदुर्ग हा संपूर्ण जिल्हा हागणदारीमुक्त घोषित झाला आहे. बल्लारपूर (जि. चंद्रपूर), आजरा, भुदरगड, गगनबावडा, पन्हाळा, राधानगरी (सर्व जिल्हा कोल्हापूर), मुळशी (जि. पुणे), लांजा (जि. रत्नागिरी), महाबळेश्वर (जि. सातारा), देवगड, कणकवली, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला (सर्व जिल्हा सिंधुदुर्ग) हे १५ तालुके पूर्णत: हागणदारीमुक्त झाले आहेत.

येत्या वर्षभरात राज्यातील कोल्हापूर, रत्नागिरी, सातारा, ठाणे, सांगली, पुणे, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर, पालघर आणि जालना हे १३ जिल्हे हागणदारीमुक्त करण्याचा निर्धार आम्ही केला आहे. महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये शौचालयाचे बांधकाम, त्यांचा होत असलेला वापर, हागणदारीमुक्त गावची चळवळ, घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन आदी बाबींवर विशेष लक्ष देण्यात आले. त्याचे

फलस्वरूप म्हणून महाराष्ट्रातील जिल्हे हे यश मिळवू शकले. या चळवळीत उर्वरित गावे, तालुके आणि जिल्ह्यातील लोकांनीही सहभाग देऊन संपूर्ण महाराष्ट्र हागणदारीमुक्त, स्वच्छ आणि आरोग्यदायी बनवण्याच्या कार्यात सहभाग घ्यावा, असे आवाहन यानिमित्त करत आहोत.

## कुटुंबस्तर संवाद अभियान

पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागामार्फत सध्या 'स्वच्छ महाराष्ट्रासाठी-१८ लाख भेटी' हे कुटुंबस्तर संवाद अभियान राबवण्यात येत आहे. या उपक्रमातून पात्र लाभार्थ्यांना अनुदान उपलब्ध करून देऊन वर्षभरात साधारण १८ लाख नवीन शौचालये बांधण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. शौचालयासाठी असलेले अनुदान वाढवून ते आता १२ हजार रुपये इतके केले आहे. मनरेगा योजनेतूनही शौचालये बांधण्यास मंजुरी मिळाली आहे.

## पाण्याची गुणवत्ता

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे गुणवत्ता संनियंत्रण करण्यासाठी सर्व ६ विभागीय प्रयोगशाळांना एकाच वर्षात राष्ट्रीय परीक्षण व अंशशोधन प्रयोगशाळा प्रत्यायन बोर्डद्वारा मानांकन प्राप्त झाले आहे. अशा

**देशातील सर्वाधिक स्वच्छ जिल्ह्यांमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. याशिवाय देशातील १० सर्वाधिक स्वच्छ जिल्ह्यांमध्ये सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी आणि ठाणे या ५ जिल्ह्यांचा समावेश झाला आहे.**

प्रकारे मानांकन प्राप्त होणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे. याचसोबत ४ जिल्हा व १३७ उप-विभागीय प्रयोगशाळांतून पाणी गुणवत्ता तपासणी कार्यक्रम प्रगतिपथावर आहे. याद्वारे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता अधिक अचूकरीत्या गावागावांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे.

## जलस्वराज्य

महाराष्ट्र हे पाणीपुरवठा व स्वच्छतेबाबत संस्थात्मक बळकटीकरण व मागणी आधारित पुरवठा करणारे देशातील अग्रगण्य राज्य आहे. राज्यातील नागरीकरणाचा दर लक्षात घेऊन शासन आणि जागतिक बँकेच्या भागीदारीतून २०१४-२०२० या कालावधीसाठी जलस्वराज्य - २ प्रकल्प राबवण्यात येणार आहे. याद्वारे अंदाजे १० दशलक्ष नागरिकांना पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या योजनेचा लाभ मिळेल. या कार्यक्रमाद्वारे घरगुती नळ जोडणीची संख्या वाढवणे, सुविधांचा दर्जा वाढवणे व १०० टक्के ग्रामीण जनतेला सुरक्षित शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. राज्यातील १२ जिल्ह्यांत हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. निमशहरी गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी ६ योजनांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.




## संरचनेत बदल

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजिप्रा) व्हर्टिकल संरचनेमुळे मुख्य अभियंता कार्यालये ही मुंबई व ठाणे येथे कार्यरत होती. त्यामुळे राज्यातील जनतेची गैरसोय होत होती. म्हणून प्रादेशिकस्तरावर महसूल विभागीय मुख्यालयी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक मुख्य अभियंता कार्यालयाची निर्मिती करण्यात आली. यासाठी कोणताही अतिरिक्त वित्तीय भार लागला नाही. यामुळे नागरी व ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व पाणीपुरवठा व स्वच्छता योजनांची तांत्रिक मान्यता व प्रकल्प सल्लागार सेवा गतिमान करण्यास मदत झालेली आहे.

## मराठवाड्यासाठी वॉटर ग्रीड योजना

मराठवाड्यात भविष्यात दुष्काळी परिस्थिती उद्भवू नये, यासाठी वॉटर ग्रीड योजना राबवण्यात येईल. पाणीपुरवठा विभागामार्फत याचा आराखडा तयार करण्यात येत आहे. या अनुषंगाने नुकतीच राज्यातील जलतज्ज्ञ आणि पाणीपुरवठा विभागाच्या मुख्य अभियंत्यांसह गुजरात आणि तेलंगणा येथील वॉटर ग्रीड योजनांना भेट देऊन त्यांची पाहणी करण्यात आली. तेथील अनुभवांचा उपयोग मराठवाडा वॉटर ग्रीड योजना राबवताना केला जाईल.

तेलंगणा राज्यात ४२ हजार कोटी रुपयांची 'मिशन भगीरथ' ही वॉटर ग्रीड योजना राबवण्यात येत असून त्याचे प्रत्यक्ष कामही सुरू झाले आहे. मराठवाड्यातही अशीच योजना राबवून मराठवाड्याला टँकरच्या चक्रातून कायमस्वरूपी मुक्त केले जाईल.

**शब्दांकन: इर्शाद बागवान**

# दर्जेदार सेवा



**डॉ. दीपक सावंत**
सार्वजनिक आरोग्य व
कुटुंब कल्याण मंत्री

> **नागरिकांना आरोग्याच्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी आरोग्य विभाग नेहमीच देशात अग्रेसर राहिला आहे. गेल्या दोन वर्षात आरोग्याच्या क्षेत्रात घेण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांमुळे राज्यातील आरोग्यविषयक निर्देशांकामध्ये सुधारणा झाली आहे.**

महाराष्ट्र देशात सर्वच बाबतीत अग्रेसर आहे. आरोग्याच्या क्षेत्राचा विचार करता राज्याने नावलौकिक मिळेल अशी कामगिरी करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वाईन फ्लू प्रतिबंधक मोहीम राज्यात प्रभावीपणे राबवण्यात आल्याने स्वाईन फ्लूला अटकाव करण्यास यश मिळाले. राज्याच्या या मोहिमेची दखल जागतिक आरोग्य संघटनेने घेतली. मलेरियाला रोखण्यासाठी झालेल्या प्रयत्नांमुळे यंदा मलेरियाच्या रुग्णांची संख्या घटली आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत महत्त्वपूर्ण बदल करून सामान्यांना अधिक फायदेशीर व्हावी, यासाठी महात्मा फुले जनआरोग्य योजना ऑक्टोबर २०१६ पासून सुरू करण्यात येत आहे. महामार्गावर होणाऱ्या अपघातातील जखमींवर उपचारासाठी बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### दर्जेदार आरोग्य सेवा

अतिदुर्गम आदिवासी भागातील बांधवांना आरोग्य सेवा मिळण्यासाठी 'शिव आरोग्य टेलिमेडिसिन योजना' प्रायोगिक तत्त्वावर मेळघाट येथे सुरू केली. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे, मेळघाटसारख्या अतिदुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या हृदयाचे ठोके मुंबईस्थित तज्ज्ञ डॉक्टरांना ऐकविण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने; आदिवासी बांधवांच्या आजाराचे निदान करणे शक्य झाले. राज्य शासनातर्फे नुकत्याच ५०० ग्रामपंचायती डिजिटल करण्यात आल्या आहेत. त्या माध्यमातून या ठिकाणी टेलिमेडिसीन सेवा राबवण्यात येतील.

### अवयवदान मोहिमेला गती

राज्यात अवयवदान मोहिमेला गती देण्यात आली आहे. ३० ऑगस्ट ते ३ सप्टेंबर या काळात 'महाअवयवदान मोहीम' घेण्यात आली. राज्यभर या मोहिमेला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

किडनी प्रत्यारोपण तसेच अवयवदान पारदर्शक होण्यासाठी सॉफ्टवेअर विकसित करण्यात येत असून अवयवदात्याची माहिती आधारकार्डाशी संलग्न करण्यात येणार आहे. या सर्व प्रयत्नांमुळे अवयवदान प्रक्रिया सुलभ होऊन त्यामध्ये होणारे गैरप्रकार रोखले जातील.

### १० लाख रुग्णांना जीवनदान

आपत्कालीन परिस्थितीत गोल्डन अवरमध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्याकरिता सुरू झालेल्या १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेच्या सेवेमुळे आतापर्यंत १० लाख रुग्णांना जीवनदान मिळाले आहे. या सेवेसाठी मोबाइल ॲप तयार करण्यात आले असून आपद्ग्रस्तांना कॉल करता येण्याची सुविधा या ॲपवर देण्यात आली आहे. कॉल करणाऱ्याचे लोकेशनदेखील माहिती करण्याची खास सुविधा ॲपमध्ये असल्याने त्याचा फायदा होणार आहे.

मुंबईसारख्या महानगरामध्ये आपत्कालीन परिस्थितीत गोल्डन अवरपेक्षाही प्लॅटिनम अवरमध्ये वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी मोटरसायकल ॲम्बुलन्स सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### जनआरोग्य योजना

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना नवजीवन योजना महात्मा फुले जनआरोग्य योजना म्हणून नवीन स्वरूपात सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जुन्या योजनेमध्ये ९७१ प्रोसिजर्सचा समावेश होता मात्र त्यातील १११ प्रोसिजर्स अशा होत्या ज्याचा वापरच झाला नाही. त्याऐवजी कर्करोग, बालकांवरील उपचार, वृद्धांवरील उपचार, गुडघा किंवा खुबा प्रत्यारोपण, सिकलसेल, निमोनिया, डेंग्यू, स्वाइन फ्लू अशा नवीन उपचारांचा समावेश करून रक्तविकार शास्त्र या विशेषज्ञ सेवेसह ३१ विशेषज्ञ सेवांतर्गत ११०० प्रोसिजर्सचा समावेश करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे प्रतिकुटुंब खर्चाची मर्यादा दोन लाख रुपये करण्यात आली आहे. मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी प्रतिकुटुंब मर्यादा तीन लाख रुपये करण्यात आली आहे.


**स्वाइन फ्लू प्रतिबंधक मोहीम राज्याने प्रभावीपणे राबवल्याने त्याची दखल जागतिक आरोग्य संघटनेने त्यांच्या वार्षिक अहवालात घेतली आहे.**

### रस्ते अपघात विमा योजना

स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेस मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. अपघातानंतर ७२ तास मोफत औषधोपचार किंवा रु. ३०,०००/- पर्यंतचा खर्च शासनाकडून करण्यात येणार आहे. राज्यातील कोणत्याही रस्त्यावर कोणत्याही व्यक्तीला अपघात झाल्यास ही योजना लागू राहील. शासकीय व खाजगी आरोग्य संस्थांमध्ये जन्म झालेल्या बालकाची जन्मनोंदणी आधार क्रमांकाबरोबर संलग्न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

स्वाइन फ्लूच्या रुग्णांकरिता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व रुग्णालयांत आयसोलेशन वॉर्ड स्थापन करण्यात आले. तसेच या आजारावरील उपचाराचा खर्च पाहता मार्च २०१५ पासून व्हेंटिलेटरवर असलेल्या दारिद्र्यरेषेखालील रुग्णांच्या रुग्णालयीन खर्चाची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वाइन फ्लू प्रतिबंधक मोफत लस गर्भवती महिलांना देण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्याचबरोबर साथीचे आजार रोखण्यासाठी कृती आराखडा तयार करून महाराष्ट्र आपत्कालीन सेवा अधिनियम व महाराष्ट्र पब्लिक हेल्थ ॲक्टचे प्रारूप तयार करण्यात येत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रांचे जाळे अधिक सक्षम करण्यासाठी आणि या केंद्रांच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना गुणवत्तापूर्ण अशी आरोग्य सुविधा मिळावी तसेच या आरोग्यकेंद्रांचे श्रेणीवर्धन व्हावे, यासाठी 'ऑपरेशन कायापालट' ही योजना हाती घेण्यात आली आहे.




### रक्ताच्या पिशवीचे दर कमी

आपत्कालीन परिस्थितीत एखाद्या रुग्णाचे प्राण हे रक्त दिल्याने वाचू शकतात त्यामुळे सामान्य नागरिकांच्या सोयीसाठी रक्ताच्या पिशवीचे दर हे १०५० रुपयांवरून ८५० रुपयांपर्यंत कमी करण्यात आले. रक्त संक्रमणामुळे पसरणाऱ्या आजारांची जोखीम कमी करण्यासाठी न्युक्लिक सिड टेस्ट (नॅट) ही प्रणाली विभागीय स्तरावर असलेल्या शासकीय रुग्णालयातील रक्तपेढ्यांमध्ये सुरू करण्याचा निर्णय प्रस्तावित आहे.

### लक्षणीय कामगिरी

मातामृत्यू व बालमृत्यू रोखण्यामध्ये राज्याने लक्षणीय कामगिरी केली असून मेळघाटामध्ये गरोदर मातेचे ट्रॅकिंग करण्यात येत असून गेल्या सहा महिन्यांमध्ये मातामृत्यू झालेला नाही. ज्या भागात दळणवळणाची सोय नाही तेथे ट्रॅकिंगप्रमाणे रुग्णवाहिका ठरावीक दिवशी जाऊन मातेस जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणीसाठी घेऊन जाते. आशा सेविकांच्या मदतीने या मातेच्या तपासण्या व औषधोपचार केला जातो. शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना विशेष बाब म्हणून राबवण्यात येत आहे. १०४ क्रमांकाच्या मनोबल हेल्पलाइनच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे समुपदेशन करण्यात येत आहे. मंत्रिमंडळ बैठकीत, राज्यस्तरीय राज्य कामगार विमा योजना, महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात दुर्गम भागात रिअल टाईम टेलिमेडिसीन, खापर ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार, पोटेगाव जि. गडचिरोली, गोरा, जि. पालघर, हरीसाल, जि. अमरावती व गोपनाथगड ता. परळी जि. बीड येथील पाच ठिकाणी ई-हेल्थ सेंटर्स, नंदुरबार येथे दुर्गम भागात बोट ॲम्बुलन्स व गर्दीच्या ठिकाणी मोटारसायकल ॲम्बुलन्स या नावीन्यपूर्ण योजना हाती घेण्यात आल्या आहेत. राज्यात आपत्कालीन आरोग्यसेवेंतर्गत ९३७ सुसज्ज ॲम्ब्युलन्सेस कार्यरत आहेत

सुरक्षित मातृत्वासाठी 'जननी सुरक्षा कार्यक्रम', 'जननी शिशू सुरक्षा योजना' प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.

गेल्या दोन वर्षाच्या काळात बालआरोग्य अभियानांतर्गत विविध शिबिरे आयोजित करण्यात आली. त्या माध्यमातून बालकांचे आरोग्य सुधारणे, गरजू बालकांना संदर्भ सेवा उपलब्ध करून देणे, लसीकरण करणे आदी उपक्रम हाती घेण्यात आले.

**शब्दांकन : अजय जाधव**



**राजकुमार बडोले**
सामाजिक न्याय आणि
विशेष साहाय्य मंत्री

# सामाजिक समरसता

सामाजिक न्याय विभागाने गेल्या दोन वर्षात घेतलेल्या विविध लोककल्याणकारी निर्णयांमुळे मोठे चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या दोन वर्षात विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची रक्कम वेळेत मिळावी, यासाठी प्राधान्याने लक्ष दिले. मागासवर्गीय समाजातील जास्तीत जास्त तरुणांनी उद्योजक व्हावेत, यावर लक्ष केंद्रित केले आहे. यापुढील काळात त्यावरच जास्त भर देणार आहोत.

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागावर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा साडेचार लाखांवरून ६ लाख करण्याचा निर्णय घेतला. यामुळे राज्यातील सुमारे १ लाख ७९ हजार ३७७ विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे.

## आंतरराष्ट्रीय स्मारक आराखडा

संविधानाचे निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारकाचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. राज्यात सत्तेत आल्यानंतर हा प्रश्न सोडवला. या स्मारकाच्या आराखड्यासाठी माझ्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री महोदयांनी समिती नेमली. या समितीने नुकताच हा आराखडा अंतिम केला आहे. समतेचे प्रतीक म्हणून (स्टॅच्यू ऑफ इक्कॅलिटी) असा भव्य पुतळा उभारण्यात येणार आहे. स्मारकाचे काम लवकरच मार्गी लागणार आहे.

## लंडन येथील घर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लंडनमध्ये शिकत असताना राहत असलेले १० किंग हेन्री मार्गावरील घर राज्य शासनाने पुढाकार घेऊन विकत घेतले. त्याचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या घराचे स्मारकात रूपांतर करण्याचे काम सुरू आहे. या ऐतिहासिक कार्यात माझा सहभाग असल्याचे समाधान आहे.

अनुसूचित जातीमधील नोकरी करणाऱ्या महिलांसाठी मुंबई, पुणे व नागपूर येथे वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेतला. यातील मुंबई आणि नागपूर येथेही वसतिगृहे भाडे तत्त्वावरील जागेवर सुरू करण्यात आली आहेत, तर पुण्यातील वसतिगृह लवकरच सुरू होणार आहे. राहण्याची सोय उपलब्ध नसल्यामुळे मागासवर्गीय मुलींचे शिक्षण अर्धवट राहू नये, यासाठी राज्यात ५० वसतिगृहे बांधण्याचा निर्णय सामाजिक न्याय विभागाने घेतला आहे. विभागीय तसेच तालुकास्तरावर ही वसतिगृहे बांधण्यात येणार असून, सध्या ३१ जिल्ह्यात भाडेतत्त्वावरील जागेत वसतिगृहे सुरू करण्यात येऊन मुलींच्या जेवणाची सोय करण्यात आली आहे.

## घटनास्थळांचा विकास

निवडक अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीच्या सर्वंकष विकासाची योजना तयार करून कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पाली-त्रिपिटकचे मराठी भाषांतर करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठीची समिती गठित करण्यात आली आहे.

## आंतरराष्ट्रीय विचार परिषद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्र, महिला सक्षमीकरण, मानववंशशास्त्र, राष्ट्रीय सुरक्षा, विदेश नीती, जल नीती, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात दिलेल्या योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी १४ व १५ एप्रिल, २०१६ रोजी मुंबई विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विचार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

२६ नोव्हेंबर, २०१६ हा दिवस संविधान दिवस म्हणून राज्यात मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. सुमारे सव्वा लाख विद्यार्थ्यांनी या संविधान दिन कार्यक्रमात उपस्थिती लावली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर राज्यात प्रथमच असा कार्यक्रम झाला.

**“वंचितांच्या आशेचा किरण म्हणून सामाजिक न्याय विभागाकडे पाहिले जाते. त्यामुळे गेल्या दोन वर्षात, समाजातील तळागाळांतील जनतेच्या समस्या सोडवण्याकडे लक्ष देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला गेला. समाजात समता निर्माण करणे हे प्रमुख ध्येय ठेवून काम करण्यावर भर देत आहोत.”**

**अनुसूचित जातीतून धर्मांतरित बौद्ध समाजातील नागरिकांना केंद्र शासनाच्या नोकरी, शिक्षण व इतर सवलती मिळाव्यात, यासाठी राज्याने पाठपुरावा केला. गेल्या २६ वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

याशिवाय जिल्हास्तरावर समता व सामाजिक न्याय वर्षात सामाजिक सद्भावना निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले.

### सवलतींचा पाठपुरावा

राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम लवकर मिळावी, ती थेट त्यांच्या खात्यात जमा व्हावी, यासाठी वेळोवेळी बैठका घेऊन सूचना दिल्या. केंद्र शासनाकडून मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कम तातडीने मिळावी, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षापासून प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम लवकरच विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

### विद्यार्थी केंद्रित निर्णयांवर भर

मागासवर्गीय शासकीय विद्यार्थी वसतिगृहात अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. तसेच अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पीएच.डी. अभ्यासक्रमाचा कालावधी कमाल चार वर्ष किंवा यापेक्षा कमी असलेल्या प्रत्यक्ष कालावधीस मंजुरी देण्यात आली आहे. अपंगांच्या खासगी १२३ विशेष निवासी व अनिवासी शाळा व कर्मशाळांना अनुदान तत्त्वावर मंजुरी देण्यात आली आहे. जास्तीत जास्त तरुणांनी सनदी सेवेत प्रवेश करावा, त्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, म्हणून त्यांच्यासाठी औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या तयारीसाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील ५० तरुणांसाठी मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. दिल्लीतही नामांकित साईराम-वाजीरामसारख्या प्रशिक्षण केंद्रात दरवर्षी ५० विद्यार्थ्यांचे मोफत प्रशिक्षण सुरू केले. यातून या वर्षी तीन तरुण भारतीय सनदी सेवेत दाखल झाले आहेत.

### शिष्यवृत्ती आणि फेलोशिप

विद्यार्थ्यांना छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने शिष्यवृत्ती सुरू केली तसेच अनुसूचित जातीतील ५० महिलांना एम.फिल व पीएच. डीसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने कनिष्ठ संशोधकासाठी २५ हजार तर वरिष्ठ संशोधकांसाठी २८ हजार रुपयांची फेलोशिप सुरू केली आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या ५० विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावानेही एम.फिल व पीएच.डी.साठी फेलोशिप सुरू केली.

### ऐतिहासिक स्मारकांचा विकास

तळेगाव दाभाडे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान ऐतिहासिक स्मारक म्हणून विकसित करण्यात येईल. साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे सांगली जिल्ह्यातील वाटेगाव आणि मुंबईतील घाटकोपरमधील चिरागनगर येथे स्मारक उभारण्याचा आणि क्रांतिवीर लहुजी साळवे यांचे पुण्यातील संगमवाडी येथे स्मारक उभारण्याचा प्रस्ताव आहे. आंबेडकरी चळवळीचे ऐतिहासिक केंद्र असलेले सिद्धार्थ विहार वसतिगृह पुन्हा उभारण्याचाही मानस आहे.

### जात पडताळणी प्रमाणपत्र

विद्यार्थी, नोकरदार व निवडणुकीसाठी जात पडताळणी प्रमाणपत्रांची मोठ्या प्रमाणावर मागणी होते. मात्र विभागीय जात पडताळणी समित्यांकडून त्या प्रमाणात पडताळणी होत नव्हती. त्यामुळे जिल्हानिहाय जात पडताळणी समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष साहाय्य योजनेंतर्गत, राज्यातील निराधार व्यक्तींना मिळणाऱ्या संजय गांधी निराधार योजनेंतर्गत अनुदानात ६०० रुपयांवरून ७०० रुपये अशी वाढ करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतल्याने निराधार व्यक्तींना दिलासा मिळालेला आहे.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे**

## समता व सामाजिक न्याय वर्ष

**सन २०१५-१६ हे वर्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. या वर्षभरात केंद्र शासनाने स्थापन केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या धर्तीवर महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली. बाबासाहेबांच्या जीवनाशी निगडित असलेली घटनास्थळे व महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देऊन या स्थळांचा विकास करण्यात येत आहे.**






**प्रा. राम शिंदे**
जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री


# सर्वांसाठी पाणी

महाराष्ट्रात डिसेंबर २०१४ पासून जलयुक्त शिवार अभियान राबवण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून दरवर्षी पाच हजार याप्रमाणे पाच वर्षांत राज्यातील २५ हजार गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियान राबवण्यात येत आहे.

## दुष्काळी भागासाठी वरदान

मागील वर्षी २०१५-१६ मध्ये जलयुक्त शिवार अभियानांतर्गत ६,२०२ गावांची निवड करण्यात आली होती. या गांवामध्ये जलसंधारणाची २,१४,५३६ कामे पूर्ण झाली असून १४,९२५ कामे प्रगतिपथावर आहे. या कामांमध्ये गाळ काढणे, खोलीकरण, रुंदीकरण करणे या प्रकारच्या १५,२४३ कामांचा समावेश आहे. या कामांच्या माध्यमातून ९३५.१० लक्ष घनमीटर इतका गाळ काढण्यात आला आहे. खोलीकरण व रुंदीकरण केलेल्या कामांची लांबी २६३३.७ कि.मी. इतकी आहे. मागील वर्षी या अभियानासाठी २ हजार कोटी रुपयांचा विशेष निधी वितरित करण्यात आला होता. लोकसहभागातून झालेल्या कामांची किंमत ३९४.३७ कोटी रुपये इतकी आहे. यामध्ये प्रत्यक्ष नागरिकांनी केलेली मदत, देवस्थान मंडळे, सामाजिक संस्था आणि कंपन्यांच्या मदतीचा समावेश आहे. जलयुक्त शिवार अभियान हे आता अभियान न राहता लोकचळवळ झाले आहे.

## लोकचळवळ

चालू वर्षी हे अभियान ५,२८१ गावांमध्ये राबवण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या गावांमध्ये २६,५६१ कामे पूर्ण झाली असून १६,९९५ कामे प्रगतिपथावर आहेत. या कामांमध्ये गाळ काढणे, खोलीकरण, रुंदीकरण करणे या प्रकारच्या ३ हजार ७१९ कामांचा समावेश आहे. या कामांच्या माध्यमातून २६०.१३ लक्ष घनमीटर इतका गाळ काढण्यात आला आहे. खोलीकरण व रुंदीकरण केलेल्या कामांची लांबी ७४५.६३ कि.मी. इतकी आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात ६०० कोटी रुपयांचा विशेष निधी वितरित करण्यात आला आहे.

## विभूतवाडीची चमकदार कामगिरी

सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील विभूतवाडी हे २ हजार लोकवस्तीचे गाव. या गावात एक पाझर तलाव आणि एक लघुपाटबंधारे तलाव आहे. गेल्या १० वर्षांपासून या गावाला दुष्काळाचा फटका बसत होता. पूर्वी गावात पाण्याच्या उत्तम सोयी होत्या, पण दुष्काळामुळे ओढा पूर्णपणे आटला होता. या गावामध्ये जलयुक्त शिवार अभियान, लोकवर्गणी, महात्मा गांधी रोजगार हमी योजना यामधून; ओढापात्राचे तीन ते साडेतीन कि.मी.चे काम करण्यात आले. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमधून १५ हजार ६०० घनमीटर आणि लोकसहभागातून पाच हजार घनमीटर असा एकूण २० हजार ६०० घनमीटर गाळ काढण्यात आला. यामधून २०.६ टीसीएम पाणीसाठा क्षमता निर्माण झाली आहे.

## सोलापूर जिल्ह्याला फायदा

सोलापूर जिल्हा अवर्षणग्रस्त क्षेत्रात मोडतो. जिल्ह्यात या अभियानासाठी पहिल्या टप्प्यात २८० गावांची तर दुसऱ्या टप्प्यात २६५ गावांची निवड करण्यात आली. जिल्ह्यातील १ लाख २६ हजार २७३ हेक्टर क्षेत्रांवर सुमारे ५ हजार ४४० कामे झाली आहे. या कामांमुळे मागील काही दिवसात पडलेल्या पावसामुळे सुमारे २.३ टीएमसी इतक्या पाण्याचा साठा झाला आहे. जिल्ह्यात कोल्हापूर पद्धतीच्या १० बंधाऱ्यांचे काम करण्यात आले असून यामध्ये २,४५० टीसीएम इतका पाणीसाठा झाला आहे. तर शेततळी व साखळी बंधाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या कामांमुळे सुमारे ४ हजार ३०० टीसीएम इतके पाणी जमा झाले आहे. त्यामुळे त्या भागातील विहिरींची पाणी पातळी वाढण्यास मदत झाली आहे.

> **राज्यात गेल्या तीन-चार वर्षांपासून सतत टंचाईची परिस्थिती निर्माण होत आहे. या टंचाईसदृश परिस्थितीला सक्षमपणे तोंड देण्याबरोबरच पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाने 'सर्वांसाठी पाणी- टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९'चे उद्दिष्ट ठेवले असून जलयुक्त शिवार अभियानास गती दिली आहे.**

**जलयुक्त शिवारच्या कामांमुळे ११,६१,६२६.४१ टीसीएम पाणीसाठ्याची निर्मिती झाली. त्याद्वारे ११,८४,३४७.४१ लाख हेक्टर क्षेत्रातील एका पिकास आणि ६ लाख हेक्टरवरील दोन पिकांना संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली.**

### हिवरे झाले हिरवेगार

सलग तीन वर्ष टँकर लागणाऱ्या सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील हिवरे हे अवघे १ हजार ३७८ लोकवस्तीचे गाव. या गावामध्ये सलग तीन वर्षांपासून टँकर सुरू होता. शासन, किसनवीर सहकारी साखर कारखाना आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून गावामध्ये साडेसतरा हजार मीटर डीपसीसीटी, ३० हेक्टर सीसीटी, लहान मोठे ३६ मातीचे बंधारे, ३२ जुन्या पाझर तलावांमधून गाळ काढण्यात आला आणि काढण्यात आलेला गाळ शेतामध्ये टाकून जमीन वहिवाटीखाली आणली. एकूण ५४० हेक्टर जमिनीपैकी जवळपास ५० टक्के क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणण्यात आले आहे. गेल्या तीन-चार महिन्यांपासून १० रुपयांमध्ये २० लिटर शुद्ध पाण्याचा जार ग्रामस्थांना घरपोच दिला जातो. टँकर लागणाऱ्या हिवरे गावात जलयुक्त शिवार अभियानामुळे शिवारात पाणी दिसू लागले आहे.

## टंचाईमुक्ती

**जलयुक्त शिवार अभियानातील विविध कामांमुळे हे अभियान दुष्काळी भागासाठी वरदान ठरले. तब्बल ६ लाख हेक्टर क्षेत्रावरील दोन पिकांच्या संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण झाली. यावर्षी चांगला पाऊस झाल्याने दुष्काळी भागासाठी हे अभियान टंचाईमुक्तीच्या दिशेने टाकलेले पाऊल ठरले आहे.**



### मोहाडीतील शेततळे

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पहिल्या टप्प्यात भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील करडी, मोहगाव, बोरी, बच्छेरा, उसर्रा, टांगा, देव्हाडा, नरसिंहटोला, फुटाळा, भिकारखेडा, पारडी, पिंपळगाव, कांद्री, शिवनी व खैरलांजी या गावांचा समावेश करण्यात आला. मोहाडी तालुक्यात या अभियानात शेततळे ३१, सिमेंट नालाबांध १९, नाला खोलीकरण ५५, सिमेंट नालाबांध दुरुस्ती १७, मजगी १८ (३५ हेक्टर), साठवण तलाव १३, बोडी नूतनीकरण ७, भातखाचरे पुनर्जीवन ८२ (१२४ हेक्टर) अशी एकूण २४३ कामे पूर्ण झाली आहेत. झालेल्या कामात १७०० टीसीएम पाणी साठले असून या पाण्यावर १७०० हेक्टर संरक्षित सिंचन होणार आहे.

### जलयुक्त गोलदरी: किमया खरी

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील गोलदरी हे गाव नावाप्रमाणेच आहे. या गावच्या समूह ग्रामपंचायती अंतर्गत हट्टीपाडा, डिडोणापाडा, खोरीपाडा, लोहारपाडा, काथाडेपाडा, माणीपाडा आणि गोलदरी अशी सात गावे येतात. गोलदरीत तशी पिण्याच्या पाण्याची टंचाई नाही. मात्र इतर पाड्यांना उन्हाळ्यात टंचाईचा सामना करावा लागतो. त्यामुळे या गावात जलयुक्त शिवारच्या माध्यमातून वनतळ्यामधून २०० ट्रॅक्टर गाळ काढण्यात आला. त्याचबरोबर जवळच असलेल्या पाझर तलावातील सांडवा तुटल्यामुळे त्यातील पाणीसाठ्याला मर्यादा येत होत्या. या ठिकाणचाही अडीचशे ट्रॅक्टर गाळ काढण्यात आला. त्यामुळे दोन्ही ठिकाणी पाणीसाठा वाढला आहे. या कामामुळे काथाडेपाडा येथील कुपनलिकेला केवळ १५ फुटावर पाणी लागल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ५ विहिरी, ५ शेततळे आणि २९ दगडी बांधांचे कामदेखील गावात करण्यात आले आहे.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत रायगड जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात ४५ बंधारे मंजूर झाले. पनवेल तालुक्यातील हा परिसर काहिसा आदिवासी लोकवस्तीचा आहे. या भागातील गटक्रमांक ३, ४ व ५ मध्ये एकूण तीन साखळी सिमेंट नालाबंधाऱ्याची कामे करण्यात आली. त्यातील धोदाणी हा एक बंधारा केवळ ९.९८ लाख रुपये खर्च करून फक्त ४१ दिवसात पूर्ण करण्यात आला.

ही कामे अधिक चांगली व दर्जेदार होण्यासाठी सर्व विभागीय स्तरावर जाऊन बैठका घेण्यात आल्या. या कामांचा जिल्हानिहाय आढावा घेतला आहे. जलयुक्त शिवार अभियानात मराठवाडा व विदर्भातील जास्तीत जास्त गावांचा समावेश करण्यात आला आहे. जेणेकरून या भागातील सततची टंचाईची परिस्थिती बदलण्यास मदत होणार आहे. राज्यातील टंचाई दूर करण्यासाठी, या दोन वर्षात जलयुक्त शिवारच्या माध्यमातून झालेली कामे हे निश्चितच एक आश्वासक पाऊल ठरेल; असे खात्रीपूर्वक म्हणता येईल.

**शब्दांकन : विलास बोडके**

# पर्यटन आणि रोजगार



**जयकुमार रावल**
रोजगार हमी, पर्यटन मंत्री

> **राज्यातील पर्यटनाला चालना देऊन रोजगार व स्वयंरोजगाराच्या विविधांगी संधी उपलब्ध होण्यासाठी २०१७ हे वर्ष 'व्हिजिट महाराष्ट्र' म्हणून राबवण्यात येणार आहे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ११ कलमी कार्यक्रमाद्वारे प्रत्येक बाबीची १,११,१११ कामे केली जातील.**

राज्यात पर्यटनास भरपूर वाव आहे. महाराष्ट्र निसर्गसंपन्न आहे. निसर्गपर्यटन हे आनंद देणारे तर आहेच, पण ते उत्पन्न वाढवणारे, रोजगार संधीची निर्मिती करणारे क्षेत्र आहे. पर्यटनातून साधारणतः सोळा प्रकारच्या लोकांना रोजगार मिळतो. म्हणूनच निसर्ग पर्यटन मंडळ स्थापन करण्यात आले. या माध्यमातून पर्यटनस्थळांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांचा विकास केला जाणार आहे.

## पहिल्या पसंतीचे राज्य

नैसर्गिक साधन संपत्तीचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात पर्यटन क्षेत्रात सर्वाधिक गुंतवणूक झाली आहे. गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे पहिल्या पसंतीचे राज्य ठरले आहे. पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. पर्यटन स्थळांचा विकास करून पर्यटकांना पुरेशा सोई-सुविधा देण्याचे काम शासन युद्धपातळीवर करीत आहे. स्थानिकांना पर्यटनामुळे रोजगाराची संधी उपलब्ध होऊन पर्यटन स्थळांच्या आसपासची गावेही विकासाच्या मुख्य प्रवाहात येतात.

पर्यटनाला चालना देण्यासाठी तसेच पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन धोरण जाहीर केले आहे. येणारे वर्ष व्हिजिट महाराष्ट्र २०१७ म्हणून घोषित केले आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व बेस्ट प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत देशी-विदेशी पर्यटकांच्या पर्यटनासाठी नुकतेच वातानुकूलित 'मुंबई दर्शन' या बसचे उद्घाटन झाले. व्हिजिट महाराष्ट्र २०१७ ची ही नांदी आहे. जगासमोर मुंबईची ओळख दाखवण्याचा हा प्रयत्न आहे. 'मुंबई दर्शन' हा महत्त्वाचा उपक्रम आहे. या सफरीसाठी विशिष्ट पर्यटन स्थळांची निवड करण्यात आली आहे. विदेशी पर्यटकांना सुनियोजितरीत्या मुंबई येथील पर्यटन स्थळे पाहणे या सहलीमुळे सुकर होणार आहे.

केंद्र शासनाने घोषित केलेल्या स्वदेश दर्शन योजनेंतर्गत कोकणातील सिंधुदुर्ग सागरी मंडळ प्रकल्पांस रु.८५ कोटी निधीची मान्यता मिळाली असून धापेवाडा, पराडसिंगा, आदासा प्रकल्पास ८८ कोटीचा निधी देण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

विदर्भ निसर्ग पर्यटनातील साकोली, बोधलकसा, ताडोबा, चिखलदरा व रामटेक या ५ स्थळांचा निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ५० कोटीचा निधी मंजूर केला आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने कोयासान जापान येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारलेले आहे. जपान व भारत संयुक्त सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे राज्यभरात १ डिसेंबर २०१५ ते १५ डिसेंबर २०१५ या कालावधीत धार्मिक, वारसा स्थाने तसेच पर्यटन स्थळी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली असून विविध ठिकाणी स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली आहे.

राज्यात पर्यटन क्षेत्राचा समृद्ध विकास व नरेगाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी माध्यमातून राज्यातील ग्रामीण भाग सुजलाम-सुफलाम व्हावा, यासाठी जाणीवपूर्वक व नियोजनबद्ध प्रयत्न करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

## अधिकाधिक नागरिकांना लाभ

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (नरेगा) योजनेच्या माध्यमातून समृद्ध ग्राम निर्माण करण्याची एक सुसंधी या निमित्ताने मिळणार आहे.

नरेगाच्या कामाचे स्वरूप हे सामुदायिक कामाचे असले तरी जास्तीत जास्त प्रमाणात वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये ही कामे परावर्तित केली जाईल. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व पारंपरिक वनवासी, भटक्या जमाती, विमुक्त जाती, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे, विकलांग व्यक्ती, जमीन सुधारणा लाभार्थी, इंदिरा आवास योजनेखालील लाभार्थी, स्त्री-कर्ता असलेली

**राज्यातील टंचाईसदृश परिस्थिती पाहता शेतकऱ्यांकडे स्वत:ची सुरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्यासाठी शेततळी येणे आवश्यक असल्याने 'मागेल त्याला शेततळे' योजना राबवण्यात आली.**

कुटुंबे, शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींकरता असलेली कुटुंबे, लहान व सीमांत भूधारक यांना या योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणावर देण्याचा शासनाचा मानस आहे.

या योजनेंतर्गत येत्या दोन वर्षांत सिंचन विहिरी, शेततळे, व्हर्मी कंपोस्टिंग, नाडेप कंपोस्टिंग, फळबाग लागवड, शौचालये, शोषखड्डे, गाव तलाव/पारंपरिक पाणीसाठ्यांचे नूतनीकरण व गाळ काढणे, जलसंधारणाची कामे, रोपांची निर्मिती, वृक्ष लागवड, संगोपन व संरक्षण, ग्राम सबलीकरण (क्रीडांगणे/ अंगणवाडी / स्मशानभूमी सुशोभीकरण / ग्रामपंचायत भवन / गावांतर्गत रस्ते / घरकूल / गुरांचा गोठा/कुक्कुटपालन शेड / शेळीपालन शेड / मत्स्यव्यवसाय ओटे) या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. त्या अनुषंगाने राज्यासाठी निश्चित केलेल्या या प्रत्येक बाबीसाठी १,११,१११ या लक्षांकावर ग्रामीण भागातील विकासकामे हाती घेण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांकडे जॉब कार्ड नसल्यास त्यांना जॉब कार्ड देणे व जॉब कार्ड नूतनीकरण करणे याबाबतची मोहिमही सुरू आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचायतीतील सर्व लाभार्थ्यांना कुटुंब ओळखपत्र उपलब्ध करून देणे तसेच ११ कामांच्या लक्षांकावर काम करण्याबाबत सर्व ग्रामपंचायतींच्या सरपंचांना आवाहन करण्यात आलेले आहे.

### मागेल त्याला शेततळे

राज्यातील टंचाईग्रस्त परिस्थिती पाहता शेतकऱ्यांकडे स्वत:ची सुरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्यासाठी शेततळी घेणे आवश्यक असल्याने मागेल त्याला शेततळे योजनेची अनुदान पद्धतीने अंमलबजावणी करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत २०१६-१७ मध्ये पहिल्या टप्प्यात एकूण ५१,५०० शेततळ्यांचा लक्षांक देण्यात आला आहे. मागील पाच वर्षात एक वर्ष तरी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी जाहीर झालेल्या गावांमधील लाभार्थी या योजनेसाठी पात्र आहेत. ही योजना ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येत असून त्याबद्दल 'स्कॉच' या राष्ट्रीय पुरस्काराने तिला गौरवान्वित करण्यात आले आहे.

आतापर्यंत या योजनेसाठी ४२,४४३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. ७२९० शेततळी पूर्ण झाली असून २६१४ शेततळ्यांची कामे प्रगतिपथावर आहेत. शासनाने अनुदान अदायगी केलेल्या शेततळ्यांची संख्या ६५४३ इतकी असून त्यासाठी नरेगा योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना सिंचन विहिरींचा लाभ देण्यात येणार आहे. पुढील ३ वर्षात १ लक्ष सिंचन विहिरी पूर्ण करण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचे जाहीर केले आहे. या योजनेंतर्गत सन २०१४-१५ मध्ये २३,३८६ विहिरी, सन २०१५-१६ मध्ये ३५,९१२ विहिरी व सन २०१६-१७ मध्ये ११,४२५ सिंचन विहिरी पूर्ण झाल्या आहेत.

### फळबाग विकास

या योजनेंतर्गत १,११,१११ हेक्टर क्षेत्रावर फळबाग तयार करण्यात येणार आहे. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत फळपिकांच्या लागवडीसाठी, वेगवेगळ्या अंतरांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत आंबा, बोर, आवळा, डाळिंब व संत्रा या फळपिकांमधील अंतरास तसेच कलमे रोपांचे लागवडीचे प्रतिहेक्टरी आर्थिक सुधारित मापदंडास मान्यता देण्यात आली आहे.

आंबा, बोर, आवळा, डाळिंब व संत्रा या फळपिकांच्या मजुरीचा दर १९२ रु. प्रतिदिन निश्चित करण्यात आला आहे. रोजगार हमी विभागाने वन विभागाला एक लाख झाडे लावण्यासाठी ५० कोटी निधी व अधिकार दिले आहेत. या योजनेच्या माध्यमातून ११ कलमी कार्यक्रमाद्वारे प्रत्येक बाबीची कामे ही १,११,१११ इतकी केली जातील. ११,११,११,१११ रोप निर्मिती करण्यात येईल.

**शब्दांकन: सुनीता कुपेरकर**

## व्हिजिट महाराष्ट्र २०१७

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व बेस्ट प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईत देशी-विदेशी पर्यटकांच्या पर्यटनासाठी नुकतेच वातानुकूलित 'मुंबई दर्शन' या बसचे उद्‌घाटन झाले. व्हिजिट महाराष्ट्र २०१७ ची ही नांदी आहे. जगाला मुंबईच्या समृद्ध वारशाची सुलभतेने ओळख व्हावी यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. या सफरीसाठी विशिष्ट पर्यटन स्थळांची निवड करण्यात आली आहे. विदेशी पर्यटकांना सुनियोजितरीत्या पर्यटन स्थळे पाहणे या सहलीमुळे सुकर आणि सुलभ होणार आहे.**





आपले सरकार कामगिरी दमदार



**सुभाष देशमुख**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री

> **आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शेतकरी सक्षम असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सहकार व पणन विभाग महत्त्वाची भूमिका बजावतात. शेती, पतपुरवठा, सार्वजनिक वितरण व्यवस्थेला प्राधान्य देऊन सहकार, पणन विभागामार्फत शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत.**

# सुलभ कर्जमुक्ती

गेल्या दोन वर्षांपासून मराठवाडा आणि विदर्भात सततची दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. शेतकरी वर्ग हा कर्जबाजारी झाला. या परिस्थितीचा अभ्यास करून विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना सावकारी कर्जातून मुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## सावकारी कर्जातून शेतकरी मुक्त

विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी अथवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी परवानाधारक सावकरांकडून घेतलेल्या कर्जाची १०० टक्के रक्कम शासनांने भरली आहे. त्यासाठी ६६.३३ कोटीचे कर्ज मंजूर केले आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांचा समावेश असून ४६ हजार ८०९ शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची शासनाने परतफेड केली.

## आठवडी बाजार

'कांदा, मुळा, भाजी अवघी विठाबाई माझी' या अभंगाच्या माध्यामातून संत शिरोमणी श्रीसावता माळी यांनी ईश्वराशी संवाद साधला. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन शासनाने व्यापारी आणि आडत्यांपासून शेतकरी मुक्त करण्यासाठी 'थेट शेतकरी ते ग्राहक' या योजनेंतर्गत संत शिरोमणी श्रीसावता माळी आठवडी बाजार सुरू केला आहे.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा माल थेट मुंबई, पुणे अशा मोठ्या शहरापासून ते जिल्हास्तरावरील ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक ठिकाणी शेतकरी आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात येत आहे. या आठवडी बाजारात फक्त शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांचा समावेश करण्यात आला आहे.

त्यामुळे विविध प्रकारचा भाजीपाला व फळे एकाच ठिकाणी ग्राहकांना वाजवी दरात उपलब्ध होत आहेत. यासाठी महानगरपालिका, नगरपालिका कार्यालयाच्या आवारात दर शनिवार किंवा रविवारी जागा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या बाजाराकरिता आच्छादन काढून टाकता येणाऱ्या शेड उभारण्यात येत आहेत. या माध्यमातून शेतमालाचे बाजारभाव ठरवण्याचे अधिकार शेतकऱ्यांना मिळत आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाहेर विक्री

ई-ट्रेडिंग, सिंगल पॉईंट लेव्ही, खरेदीदाराकडून अडत वसुली व शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या फळे व भाजीपाल्याची विक्री कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवाराबरोबरच आवाराबाहेर विक्री करण्याची शेतकऱ्यांना परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे भाजीपाला, फळे व शेतमाल त्यांना हव्या त्या ठिकाणी विकता येत आहे.

या निर्णयामुळे बाजार समितीबरोबरच विक्रीचे अनेक पर्याय शेतकऱ्यांना उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे खरेदीदारांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. शेतकरी व ग्राहक यातील मध्यस्थांची साखळी कमी होऊन शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालास चांगला भाव व ग्राहकांनाही वाजवी किंमतीत फळे व भाजीपाला मिळण्यास मदत होत आहे. बाजार समितीमध्ये आलेल्या शेतमालावर शेतकऱ्याला द्यावी लागणारी हमाली, तोलाई, वाराई व अडत यासाठी द्यावी लागणारी जवळपास १० ते १३ टक्के रक्कमेत बचत होऊन, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी बाजार या योजनेत त्यांना सहभाग घेता येत आहे.

## किंमत स्थिरता निधी योजना

राज्यात किंमत स्थिरता निधी योजना राबवण्यात येत असून त्यासाठी ५००.00 कोटी रकमेचा निधी केंद्रशासन स्तरावर नियत केला आहे. या योजनेंतर्गत राज्य शासन व केंद्र शासनाचा हिस्सा ५०:५० टक्के आहे. शेती व फलोत्पादनापैकी नाशवंत उत्पादने नियंत्रणात आणण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत १ लाखापर्यंतच्या पीक कर्जावर वार्षिक ३ टक्के व त्यापुढील ३ लाखापर्यंतच्या पीक कर्जावर वार्षिक १ टक्का दराने व्याज सवलत लागू करण्यात आली आहे.**

२०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी ९०० कोटींची तरतूद करण्यात आली असून शेती व फलोत्पादनापैकी नाशवंत उत्पादनांच्या, डाळींच्या किंमती नियंत्रणासाठी मदत होत आहे. राज्यात मंत्रीस्तरीय समिती आणि फंड व्यवस्थापनासाठी अपर सचिवस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. कांदा व डाळींची खरेदी करण्यासाठी ती कोणत्या दराने, किती प्रमाणात व कोणत्या कालावधीत खरेदी करायची,खरेदी केलेल्या मालाचे वितरण कोणत्या क्षेत्रात व कशा पद्धतीने करावयाचे याबाबत समिती निर्णय घेत असते. त्यामुळे दर नियंत्रणात राहण्यास मदत होत आहे.

**पीक कर्जांचे पुनर्गठन: खरीप, रब्बी हंगामात अत्यल्प पावसामुळे टंचाईसदृश परिस्थिती निर्माण होते अशा जिल्ह्यात महसूल व वनविभागामार्फत ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांची संख्या निश्चित करण्यात आली. सहकार विभागामार्फत सहकारी कर्जाच्या वसुलीस स्थगिती व पीक कर्जांचे पुनर्गठन या सवलती देण्यात आल्या आहेत.**



गोत्रेश जोशी

### शेतकऱ्यांसाठी दीर्घ मुदतीचे कर्ज

साखर कारखान्यास ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या एफआरपीची रक्कम देण्यासाठी दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत व्याज अनुदानाचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रथम वर्षाच्या कर्जावरील व्याज अनुदान केंद्र शासनाकडून देण्यात येत आहे. त्यापुढील ४ वर्षापर्यंत व्याज अनुदान राज्य शासन देणार आहे. यामुळे साखर कारखान्याना २००० कोटी रु.चे बिनव्याजी कर्ज उपलब्ध झाले आहे. सन २०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतल्याने जे साखर कारखाने केंद्र शासनाच्या योजनेच्या निकषात बसत नाहीत, अशा साखर कारखान्यास ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या एफआरपीची रक्कम देण्यासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जावर शासनामार्फत पाच वर्षे व्याज अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार कर्जावरील व्याज अनुदान पाच वर्षापर्यंत शासन देणार आहे.

### व्याज सवलत योजना

डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत सहकारी कृषी पतसंस्थेकडून पीक कर्ज घेणाऱ्या व त्याची प्रतिवर्षी ३० जून पर्यंत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याज सवलत देण्यात येते. राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका व खाजगी बँकाकडून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांनाही सदर योजना लागू आहे. मात्र थकीत कर्जास तसेच मध्यम मुदत व दीर्घ मुदत कर्जास सदर योजना लागू होत नाही. त्यासाठी या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना सहकारी कृषी पतसंस्थामार्फत मिळणाऱ्या पीक कर्जावरील व्याज दराशी निगडित व्याज सवलत देण्यात आली आहे. त्यात १ लाखापर्यंतच्या पीक कर्जावर वार्षिक ३ टक्के व त्यापुढील ३ लाखापर्यंतच्या पीक कर्जावर वार्षिक १ टक्का दराने व्याज सवलत लागू करण्यात आली आहे.

### पीक कर्जांचे पुनर्गठन

ज्या खरीप, रब्बी हंगामात अत्यल्प पावसामुळे टंचाईसदृश परिस्थिती निर्माण होते अशा जिल्ह्यात महसूल व वनविभागामार्फत ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांची संख्या निश्चित करण्यात आली. त्यामध्ये सहकार विभागामार्फत सहकारी कर्जाच्या वसुलीस स्थगिती व पीक कर्जांचे पुनर्गठन या सवलती देण्यात आल्या आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या धोरणानुसार पीक कर्जाचे पुनर्गठन सुमारे ३ ते ५ वर्ष कालावधीसाठी केले जाते. सहकारी बँकांनी पीक कर्जाचे रूपांतर केल्यानंतर अशा बँकांना नव्याने पीक कर्ज वाटपासाठी निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रूपांतरित कर्जाची १५ टक्के रक्कम शासनाने व ६० टक्के नाबार्डमार्फत कर्ज स्वरूपात संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना देण्यात येत आहे.

### रूपांतरित कर्जाची परतफेड

राज्यात सातत्याने निर्माण होणारी दुष्काळ परिस्थिती विचारात घेऊन अल्प मुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर केल्यानंतर रूपांतरित कर्जाच्या परतफेडीच्या कालावधीत ३ वर्षांवरून ५ वर्षांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांना सक्षम करून त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने गेल्या दोन वर्षात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

**शब्दांकन: काशीबाई थोरात**



**महादेव जानकर**
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास
व मत्स्यव्यवसाय मंत्री

# आपले पशुधन, आपले हित

३१ ऑक्टोबर २०१४ रोजी नवे सरकार सत्तेत आले. सत्तेत आल्यानंतर सर्वसामान्यांसाठी 'भक्कम, सशक्त, गतिमान महाराष्ट्र' हे ब्रीद नव्या सरकारने दोन वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. शासनाचा प्रत्येक विभाग सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर आहे. राज्याच्या दोन वर्षांच्या या वाटचालीत पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाने अनेक लोकाभिमुख व महत्त्वपूर्ण निर्णय घेत आपली वाटचाल पुढे सुरू ठेवली आहे. निर्णयांची अंमलबजावणीही विभागांकडून तितक्याच तत्परतेने व कार्यक्षमतेने करण्यात येत असून येत्या काळातही ती अशीच कायम राहील.

## पशुधन विमा योजना

पशुधन विमा योजनेंतर्गत १ ते १५ ऑगस्ट २०१६ या पंधरवड्यात विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेअंती राज्यात १ लाख २६ हजार पशुधनाचा विमा उतरवण्यात आला.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पशुधनाला संरक्षण देण्यासाठी ही योजना उपयुक्त आहे. शेतकऱ्यांना या योजनेचा फार मोठा लाभ होणार आहे. या योजनेंतर्गत देशी / संकरित (गायी / म्हशी), पाळीव पशू (घोडे, गाढव, वळू, बैल व रेडे) तसेच शेळ्या, मेंढ्या यांचा समावेश झाला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणामध्ये पशूंना विमा सुरक्षा कवच देण्याची बहुदा ही पहिलीच वेळ असावी. विमा रक्कमेच्या ५० टक्के रक्कम अनुदान स्वरूपात शासनातर्फे भरण्यात येणार असून उर्वरित ५० टक्के रक्कम लाभार्थ्यांने भरावयाची आहे. दारिद्र्यरेषेखालील आणि अनुसूचित जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ७० टक्क्यांपर्यंत शासनातर्फे अनुदान देण्यात येईल. उर्वरित ३० टक्के रक्कम लाभार्थ्यांने भरावयाची आहे. चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली येथील लाभार्थ्यांना १० टक्के अधिकचे अनुदान शासनातर्फे देण्यात येणार आहे.

पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था पुणे येथील, जीवाणू लस उत्पादन विभाग अद्ययावत केला असून जीवाणू (बॅक्टेरिअल व्हॅक्सीन) लस उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र स्वयंपूर्ण करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना पशुधनावरील उपचार, मार्गदर्शन सहज मिळण्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून १८००२३३०४१८ हा विनाशुल्क टोल फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे.

या टोल फ्री क्रमांकावर शेतकऱ्यांना पशुधनावरील उपचार व मार्गदर्शन सहज उपलब्ध होणार आहे. पशुधनाचा विकास करण्यासाठी कृत्रिम रेतन केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. पशुधनाचा विकास करण्यासाठी ही कृत्रिम रेतन केंद्रे महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

## कृत्रिम रेतन केंद्राची स्थापना

एक हजार मांसल पक्ष्यांचे संगोपन करणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येत आहे. राज्यात आगामी काळात प्रत्येक तालुक्यात अत्याधुनिक व सर्वसुविधायुक्त पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालये उभारण्यात येणार आहेत. पशुसंवर्धन विभागाकडून असे अनेक लोककल्याणकारी निर्णय घेण्यात आले आहेत.

## विशेष दुग्धव्यवसाय कार्यक्रम

विदर्भ, मराठवाडा विभागात दूध उत्पादन वाढीकरिता राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाच्या सहकार्याने विशेष कार्यक्रम राबवण्यात आला आहे. यामध्ये ३ वर्षांच्या कालावधीत २ लक्ष किलो ग्रॅम प्रतिदिन एवढे दूध उत्पादन अपेक्षित असून सुमारे ६० हजार ग्रामीण कुटुंबांना नियमित उत्पन्नाद्वारे उपजीविकेचे साधन उपलब्ध होणार आहे. ग्रामीण भागातील सुमारे ३ हजार लोकांना प्रत्यक्ष

> “राज्याच्या अर्थविकासात कृषिपूरक व्यवसाय महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळेच पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या वतीने अनेक योजना राबवण्यात येत आहे. यामुळे संबंधित घटकांना फायदा होऊन रोजगार व स्वयंरोजगाराला चालना मिळत आहे.”

रोजगाराच्या संधी मिळणार असून वाहतूकदार, वितरक, किरकोळ विक्रेते व अन्य सुविधा पुरवणाऱ्यांना अप्रत्यक्ष रोजगार संधी उपलब्ध होणार आहे.

**पशुधनावरील उपचार, मार्गदर्शन सहज मिळण्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून १८००२३३०४१८ हा विनाशूल्क टोल फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे. या क्रमांकावर शेतकऱ्यांना पशुधनावरील उपचार व मार्गदर्शन सहज उपलब्ध होईल.**


### दुधाच्या खरेदीदरात वाढ

शासनाने नोव्हेंबर २०१३ पासून दुधाच्या खरेदीदरात वाढ केली नव्हती. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानाचा सामना करावा लागत होता. दुग्धव्यवसाय विकासाला चालना देण्यासाठी १ जुलै २०१६ पासून गाई व म्हशीच्या दूध खरेदीदरात प्रतिलीटर रु. २.०० ने वाढ केली आहे व ही दरवाढ झाल्यामुळे गाईच्या दुधाचा खरेदीदर रु. २० वरून रु. २२ झाला आहे. म्हशीच्या दुधाचा खरेदीदर रु. २९ वरून ३१ असा झाला आहे. हेटीकुंडी (जि. वर्धा) येथे गवळाऊ गायींचा प्रकल्प कार्यरत केला गेला आहे.

पुसद जिल्हा यवतमाळ येथील शासकीय दुग्धशाळेचे शीतकरण केंद्र वलसाड दूध उत्पादक सहकारी संघ, वलसाड यांना दीर्घकालीन भाडेकरार तत्त्वावर देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यामुळे यवतमाळ जिल्ह्यातील दुधाचे संकलन वाढवण्यास मदत होणार आहे. येत्या काळात दुग्धव्यवसाय विकास विभागाकडून ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्यात येणार आहेत. राज्यात दुधाचा एक ब्रँड विकसित करण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्नशील आहोत.

### फिश मार्केट

**राज्यामध्ये पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धनाचे २० प्रकल्प राबवण्यात येत आहेत. येत्या वर्षभरात एक हजार प्रकल्प कार्यान्वित करण्यात येतील. त्यामुळे ३० हजार लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यासोबतच नवीन फिश मार्केटची निर्मिती करण्यात येणार आहे. मच्छिमारांना मच्छीमारी करण्यासाठी आधुनिक नौकांचे वाटप करण्यात येत आहे. राष्ट्रीय कल्याण निधी योजनेंतर्गत मच्छिमारांना घरे बांधून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**



### मत्स्यव्यवसाय विकास

प्राणिजन्य, प्रथीनयुक्त सकस आहार पुरवण्यात मासळीचा महत्त्वाचा वाटा आहे. समुद्रकिनाऱ्यावर व अंतर्भागात राहणाऱ्या कोळी, भोई, धीवर इत्यादी जातींचा मासळी पकडणे हा पारंपरिक व्यवसाय आहे. संवर्धन करणे व मासळीच्या उत्पादनात वाढ तसेच मच्छीमारांची सामाजिक व आर्थिक उन्नती करण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय विभागाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे अधिकतम मत्स्योत्पादन, पर्यावरण संतुलनासह स्वीकारार्ह मत्स्यव्यवसाय विकास, परकीय चलनवृद्धी, सहकार चळवळीस प्रोत्साहन, रोजगार निर्मिती, मच्छीमारांचा आर्थिक, सामाजिक स्तर उंचावणे, मूलभूत सुविधांचा विकास आदी मत्स्यव्यवसाय विकास विभागाचे उद्देश व उद्दिष्टे येत्या काळात साध्य करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

### ससून बंदराचे आधुनिकीकरण

राज्यातील मत्स्यव्यवसाय विकासासाठी ऑस्ट्रेलियातील सिडनी बंदराच्या धर्तीवर जुने व नवीन ससून बंदर यांच्या आधुनिकीकरणासाठी ५२. १७ कोटींच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. राज्यातील उपलब्ध असलेल्या जलाशयात / तलावात पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन केल्यास राज्याच्या मत्स्य उत्पादनात वाढ होऊन रोजगार व स्वयंरोजगारात वाढ होणार आहे.

### मत्स्यसंवर्धनाचे २० प्रकल्प

राज्यांमध्ये पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धनाचे २० प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. येत्या एका वर्षात एक हजार प्रकल्प कार्यान्वित करण्यात येतील. त्यामुळे ३० हजार लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यासोबतच नवीन फिश मार्केटची निर्मिती करण्यात येणार आहे. मच्छीमारांना मच्छीमारी करण्यासाठी आधुनिक नौका वाटप करण्यात येत आहेत. राष्ट्रीय कल्याण निधी योजनेंतर्गत मच्छीमारांना घरे बांधून देण्याचे निर्णय घेण्यात आला आहे. आगामी काळात पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून लोकोपयोगी व लोकाभिमुख निर्णय घेण्यात येतील, असा विश्वास आहे.

**शब्दांकन : दत्ता कोकरे**

आपले सरकार कामगिरी दमदार




**संभाजी पाटील-निलंगेकर**
कामगार, भूकंप पुनर्वसन,
कौशल्य विकास,
माजी सैनिकांचे कल्याण मंत्री


# कुशल महाराष्ट्र

कामगार कायद्याची अंमलबजावणी, कामगारांच्या सर्वांगीण उत्कर्षांच्या दृष्टीने नवनवीन योजनांचा प्रारंभ यात महाराष्ट्र राज्य नेहमीच आघाडीवर आणि पथदर्शक राहिला आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात कामगार विभागाचा महत्त्वाचा वाटा आहे.

**गेल्या दोन वर्षात औद्योगिक संबंध सलोख्याचे राहण्याबरोबर, औद्योगिक क्षेत्रामध्ये शांतता, उद्योगवाढ आणि कामगारांचे हित जपले गेले आहे. कामगारांना आर्थिक, सामाजिक, व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्याच्या सोई उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.**

## लाभार्थ्यांची संख्या

'इज ऑफ डुईंग बिझनेस' अर्थात व्यवसाय करण्यास सुलभीकरण व प्रोत्साहन देण्यासाठी विविध कामगार कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे. याबरोबरच दुकाने व आस्थापनांबाबत अर्जदाराने नोंदणी परवाना व नूतनीकरण करण्यासाठी अर्ज केल्यापासून सात दिवसात परवाना देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. धोकादायक नसलेल्या कारखान्यांना, अर्ज केल्यापासून सात दिवसात परवाना देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सर्व दुकाने व्यवसायाकरिता वर्षाचे ३६५ दिवस कार्यरत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, आस्थापनातील कामगारांना आठवड्यातून एक दिवस सुट्टी देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

कंत्राटी कामगार अधिनियमामध्ये सुधारणा करून, कंत्राटदाराने अनुज्ञप्ती (लायसन्स) साठी अर्ज केल्यानंतर सात दिवसात देण्याची कार्यवाही होणार आहे. किमान वेतन अधिनियमांतर्गत विविध अनुसूचित उद्योगांतील कामगारांचे किमान वेतन निर्धारित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे.

## व्यावसायिकांसाठी स्वयंप्रमाणीकरण

व्यावसायिकांसाठी स्वयंप्रमाणीकरण योजनेतंर्गत कारखाने आस्थापनांचा लाभ होत आहे. कामगार विभागातंर्गत पुरवण्यात येणाऱ्या सेवा ऑनलाइन पद्धतीने देण्याकरिता संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. व्यवसाय करण्यास सुलभीकरण आणि प्रोत्साहन देण्यासाठी कामगार कायद्यातही सुधारणा करण्यात येत आहे. आपले सरकार आणि एलएमएस (lmsmaharashtra.gov.in) या संकेतस्थळावर सेवा मिळविण्यासाठी ऑनलाइन अर्ज करता येतो.

## औद्योगिक क्षेत्रामध्ये शांतता

औद्योगिक संबंध सलोख्याचे राहतील, औद्योगिक क्षेत्रामध्ये शांतता राहील याकडे लक्ष देणे, कामगार कायद्यात व इतर कामगारविषयक धोरणांमध्ये सुधारणा करणे, दीर्घकालीन कामगार कल्याण व हित याकडे लक्ष देणे, कामगारांच्या कामाची ठिकाणे सुसह्य करणे, जीवनमानाच्या दर्जात सुधारणा करणे, बालकामगार प्रथेचे उच्चाटन करणे, कामगारविषयक कायद्यांची सक्षमपणे अंमलबजावणी करणे, सर्व संघटित व असंघटित क्षेत्रांमध्ये आवश्यक धोरणे, कार्यक्रम, कल्याणकारी योजना यांची अंमलबजावणी करणे, सर्व क्षेत्रातील कामगारांना आर्थिक, सामाजिक, व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्याच्या सोई उपलब्ध करून देणे असे काही संकल्प पूर्ण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहेत. कामगार विभागामार्फत १६ सेवा, सेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्यात आल्या आहेत. कामगार आयुक्तालय, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, बाष्पके संचालनालय यांच्यामार्फत पुरवण्यात येणाऱ्या एकूण १६ सेवा या सेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्यात आल्या आहेत. दुकाने आणि आस्थापना नोंदणी, दुकाने आणि आस्थापना नूतनीकरण, कंत्राटी कामगार मुख्य मालक नोंदणी, कंत्राटी कामगार अनुज्ञप्ती नोंदणी, कंत्राटी कामगार अनुज्ञप्ती नूतनीकरण या सेवा नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

## कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र

रोजगाराबाबत बदलत्या आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकासावर अधिक भर देण्याची आवश्यकता लक्षात

**१५ ते ४५ वर्षापर्यंतच्या कार्यप्रवण वयोगटातील उमेदवारांना अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक, कौशल्य विकास, कौशल्य वर्धन व पुनर्कौशल्य विकासाद्वारे रोजगारक्षम केले जाईल. त्यापैकी किमान ७५ टक्के उमेदवारांना प्रत्यक्ष नोकरी किंवा स्वयंरोजगार मिळवून देण्यात येईल.**

घेऊन कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्यासाठी रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे कौशल्य विकास व उद्योजकता विभाग असे नामकरण करण्यात आले आहे. राज्यात प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबवण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

### उद्योगकेंद्रित कौशल्य विकास

तरुणांना अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानानुरूप कौशल्याधारित प्रशिक्षणाद्वारे उत्पादनक्षम बनवण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.

उद्योगकेंद्रित कौशल्य विकास कार्यक्रम तयार करून, उद्योगसमूहांना प्रशिक्षण संस्था म्हणून सूचिबद्ध करून, त्यांच्या गरजांनुसार त्यांच्या मार्फतच प्रशिक्षण देऊन, उमेदवारांना रोजगारात सामावून घेण्याची योजना तयार करण्यात आली आहे. व्यावसायिक तज्ज्ञ मनुष्यबळ विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे स्वयंरोजगार व उद्योजकतेसंबंधी प्रशिक्षण व तद्नंतर आवश्यक ते साहाय्य लाभार्थींना करण्याचे नियोजित करण्यात आला आहे. याचा भाग म्हणून विविध महामंडळांमार्फत योजनांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रीपणा आणण्यासाठी या सर्व योजनांची अंमलबजावणी व संनियंत्रण mahaswayamrojgar.maharashtra .gov.in या पोर्टलवरून करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



**कुशल महाराष्ट्र**

**२०२२ पर्यंत महाराष्ट्रात सुमारे ४.५० कोटी मनुष्यबळाचे कौशल्य विकसित करण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेण्यात आले आहे. 'मेक इन इंडिया' सप्ताहाच्या आयोजनानंतर कौशल्य आणि उद्योजकता विभागाचे आतापर्यंत २२ सामंजस्य करार झाले आहेत. शिकाऊ उमेदवार कायदा, १९६१ नुसार ट्रेड अप्रेंटिसशिप या योजनेखाली २०१५-१६ या वर्षात १ लाख तरुणांना अप्रेंटिसशीप मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम घेण्यात आली.**

उद्योगसमूहाच्या सहभागातून सेंटर ऑफ एक्सलन्स/बहुकौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यांतर्गत बाजारपेठेतील विविध प्रकारच्या रोजगाराच्या मागणीस अनुसरून उद्योगसमूह / खाजगी संस्थांमार्फत आवश्यकतेनुसार सेंटर ऑफ एक्सलन्स व एकाच आवारात/ छताखाली बाजारपेठेस आवश्यक असलेले कौशल्य निर्माण करून रोजगार/स्वयंरोजगार उपलब्धता करून देण्याच्या दृष्टीने संबंधित उद्योगसमूहाच्या सहकार्याने बहुकौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

### कौशल्य विकास विद्यापीठ

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण उत्तीर्ण तसेच पदवीधर विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित शैक्षणिक पाठ्यक्रमाद्वारे त्यांची रोजगार क्षमता वर्धित करून उत्पादन व सेवा क्षेत्रातील उद्योग समूहांना/ संस्थांना सुयोग्य मनुष्यबळ उपलब्ध करणे तसेच व्यावसायिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना ऊर्ध्वगामी शैक्षणिक संधी देण्यासाठी व औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच तंत्रनिकेतन संस्थांमधून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च व्यावसायिक शिक्षणाची दारे खुली करण्यासाठी कौशल्य विकास विद्यापीठाची स्थापना करण्यात येणार आहे.

### महाकौशल्य पोर्टल

कौशल्य विकास कार्यक्रमाशी निगडित विविध बाबी ज्यामध्ये उमेदवाराच्या नोंदणीपासून त्याचे मूल्यमापन, समुपदेशन, प्रशिक्षण व प्रमाणीकरण आणि रोजगारोपरान्त साहाय्य इत्यादी अनेक बाबींचे संनियंत्रण तसेच कौशल्य विकासासंबंधी सहभागधारकांना कुशल मनुष्यबळ मागणी व पुरवठा याबाबत रोजगार बाजार माहिती प्रणालीद्वारे सेवा उपलब्ध करून दिली आहे. रोजगार व स्वयंरोजगार व कौशल्य विकासासंबंधी विविध सेवा देण्यासाठी महाकौशल्य पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. या पोर्टलवर राज्यातील गरजू मनुष्यबळाला प्रशिक्षण देणाऱ्या संस्था तसेच प्रशिक्षित मनुष्यबळाचे मूल्यमापन करण्यासाठी तज्ज्ञ /संस्था यांची नोंदणी करण्याचे काम सुरू आहे. त्यांना निरीक्षणान्ती सूचिबद्ध करण्यात येत आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके**

आपले सरकार कामगिरी दमदार



**दिलीप कांबळे**
**राज्यमंत्री** - सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य, मदत व पुनर्वसन, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास व वक्फ

**"अनुसूचित जाती, जमाती यांच्या सर्वसमावेशक हिताचे अनेक निर्णय शासनाने घेतले आहेत."**

# उपेक्षितांना दिलासा

**सामाजिक** न्याय विभागाच्या माध्यमातून राज्यातील मागास, उपेक्षित, वंचित घटकांना न्याय देण्यासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत.

नागपूर, पुणे आणि मुंबई नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी वसतिगृह सुरू केले. ओबीसी शिष्यवृत्तीची उत्पन्न मर्यादा साडेचार लाखावरून ६ लाख करण्यात आली. औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे अनुसूचित जाती प्रवर्गासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. दिल्लीतही नामांकित प्रशिक्षण केंद्रात दरवर्षी ५० विद्यार्थ्यांचे मोफत प्रशिक्षण सुरू आहे. तालुकास्तरावर मागासवर्गीय विद्यार्थिनींसाठी ५० वसतिगृहे उभारण्यात येत आहेत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने एम.फिल व पीएच.डी.च्या उच्च शिक्षणाकरिता ५० विद्यार्थ्यांसाठी देशातील पहिली फेलोशिप सुरू केली असून अनुसूचित जातीतील संशोधन करणाऱ्या ५० महिलांना एम.फिल व पीएच.डी.च्या संशोधनासाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले फेलोशिप सुरू केली आहे.



लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वास्तव्य राहिलेल्या घरांची राज्य शासनाने खरेदी केली असून मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या वयाची मर्यादा ६५ वरून ६० वर्ष करून ज्येष्ठांच्या वृद्धत्व निवृत्तीवेतनात वाढ करण्यात आली आहे.

**शब्दांकन : विजय कोळी**



**विद्या ठाकूर**
**राज्यमंत्री** - महिला व बाल विकास

**"मनोधैर्य योजना, समुपदेशन केंद्र, महिलांचे संरक्षण अधिनियम यामुळे महिलांना संरक्षण मिळून त्यांचे सक्षमीकरण झाले आहे."**

# समर्थ आणि सुदृढ

**महिलांना** समान संधी आणि त्यांचे सक्षमीकरण यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाबरोबरच विविध विभागांमार्फत अनेक निर्णय वेळोवेळी घेण्यात आले आहेत. या निर्णयांचा फायदा राज्यातील महिलांना होत असून यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली आहे. महिलांसाठीची मनोधैर्य योजना, समुपदेशन केंद्र, महिलांचे संरक्षण अधिनियम यामुळे महिलांना संरक्षण मिळत आहे. तर महिला प्रशिक्षण केंद्रांना साहायक अनुदान, विवाहासाठी अनुदान, माझी कन्या भाग्यश्री, जननी सुरक्षा योजना यासारख्या विविध योजनांमुळे महिला आत्मनिर्भर होत आहेत.



महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहणार नाही यासाठी या विभागामार्फत व्यापक उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत. आज राज्यातील सर्व बालगृहांचे 'थर्ड पार्टी ऑडिट' करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार १००० हून अधिक बालगृहांचे ऑडिट अंतिम टप्प्यात आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीतून महिला आणि बालकांच्या सक्षमीकरणाचे विविध कार्यक्रम हाती घेण्यासाठी, खाजगी कंपन्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

**शब्दांकन: वर्षा फडके**




**विजय देशमुख**
**राज्यमंत्री** - सार्वजनिक आरोग्य, परिवहन, कामगार, राज्य उत्पादन शुल्क

> "राज्यातील संघटित आणि असंघटित कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी विभागामार्फत व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत."

# कामगारांच्या हितासाठी

**आरोग्य** विभागांतर्गत 'महात्मा जोतीबा फुले जनआरोग्य योजना' लागू करण्यात येणार आहे. नवीन योजनेमध्ये ३१ विशेषज्ञ अंतर्गत ११०० उपचारांचा समावेश करण्यात आलेला आहे. राज्यात कोठेही अपघात झाल्यास अपघातानंतर ७२ तास मोफत औषधोपचार किंवा रुपये ३० हजारपर्यंतचा खर्च स्व. 'बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना' या योजनेंतर्गत राज्यशासनाकडून करण्यात येणार आहे.



पक्की व शिकाऊ परवाना प्रक्रिया पारदर्शक, व ऑनलाइन करण्यात आली आहे. नाशिक येथे व्यापारी वाहनाची संगणकीकृत पद्धतीने तपासणी करणारी देशातील पहिली यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा धोरण निश्चित करण्यात आले आहे. अपघाती मृत्यू झालेल्या राज्य परिवहन प्रवाशांच्या वारसास १० लाख रुपये नुकसान भरपाई तसेच अपंगत्व येणाऱ्या व्यक्तीस रुपये ५ लाखापर्यंत नुकसान भरपाई हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अपघात साहाय्यता निधी योजनेंतर्गत देण्यात येणार आहे. कामगारांना भरपगारी रजा मिळण्यासाठी कामाच्या दिवसाची मर्यादा २४० वरून ९० दिवस करण्यात आली आहे. महिला कामगारांना रात्रपाळीत त्यांच्या संमतीनुसार सर्व सुविधांच्या अधीन राहून, परवानगी देण्यात आली. माथाडी कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात गडचिरोली जिल्ह्याप्रमाणे १ एप्रिल २०१५ पासून संपूर्ण दारूबंदी करण्यात आली आहे.

**शब्दांकन: संगीता बिसांद्रे**

---



**संजय राठोड**
**राज्यमंत्री** - महसूल

> "महसूल प्रशासन अधिक कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करण्यात येत आहे. राज्यात नवीन योजना आणि धोरणे राबवण्यात येत आहेत."

# आधुनिक आणि लोकाभिमुख

**भूमी** अभिलेख विभागाचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अद्यावतीकरण करण्यात आले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विकास प्रकल्पासाठी शासकीय जमीन सुलभतेने उपलब्ध करून विकासाला चालना देण्याचे काम सुरू आहे.

आदिवासी व्यक्तींच्या जमिनी अवैधरीत्या हस्तांतरित झालेल्या असल्यास त्या जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करण्याची मुदत आणखी २० वर्षांसाठी वाढवण्यात आली आहे.



**महत्त्वाचे निर्णय:** कुंभार समाजाला वर्षाला ५०० ब्रास पर्यंतच्या मर्यादेत मातीवरील तर वडार समाजाला २०० ब्रासपर्यंतच्या मर्यादेत दगडावरील स्वामित्वधनाच्या आकारणीतून सूट, ग्रामीण भागातील शेतजमिनींची पुनर्मोजणी व नकाशांचे डिजिटायझेशन, केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूमी संसाधन विभागामार्फत राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम सुरू, या कार्यक्रमांतर्गत अधिकार अभिलेखांचे संगणकीकरण करणे, अधिकार अभिलेखांचे अद्ययावतीकरण करणे, तालुकास्तरावरील दुय्यम निबंधक कार्यालय तहसिलदार कार्यालयाशी जोडून ऑनलाइन फेरफार प्रक्रिया सुरू करणे, नकाशांचे डिजिटायझेशन करणे, तालुकास्तरावर आधुनिक भूमी अभिलेख कक्ष तयार करणे, जमिनीविषयक अभिलेखांचे स्कॅनिंग करणे, नकाशे अद्ययावत करण्यासाठी पुनर्मोजणी करणे, दुय्यम निबंधक कार्यालयाचे संगणकीकरण करणे, स्टेट डेटा सेंटर तयार करणे आदी बाबींचा समावेश आहे. अशा प्रकारे महसूल विभाग अत्याधुनिक सुविधांनी 'डिजिटल' झाला आहे.

**शब्दांकन : श्रद्धा मेश्राम – नलावडे**



दादाजी भुसे
**राज्यमंत्री** - ग्रामविकास

"जीवनोन्नती अभियानांतर्गत राज्यात मागील दोन वर्षात १ लाख १३ हजार बचत गटांना मोठ्या प्रमाणात कर्ज वितरण करण्यात आले."

# ग्रामोन्नती

**राज्यात** ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत गेल्या दोन वर्षात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत (उमेद) महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियानांतर्गत राज्यात मागील दोन वर्षात १ लाख १३ हजार बचत गटांना मोठ्या प्रमाणात कर्ज वितरण करण्यात आले आहे. बेरोजगार तरुणांसाठी याच अभियानांतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण रस्ते, राज्याच्या आर्थिक, सामाजिक उन्नतीकरणाचा एक महत्त्वाचा घटक आहे. राज्यातील ग्रामीण रस्त्यांना जोडण्यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील गरीब नागरिकांना घरकूल बांधण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजना राज्य शासनाने सुरू केली आहे. 'आमचे गाव आमचा विकास' या योजनेंतर्गत गावांच्या सुनियोजित विकासासाठी राज्यातील प्रत्येक गावाचा विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीत ऑनलाइन सुविधा उपलब्ध होण्यासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या सांसद आदर्शग्राम योजनेच्या धर्तीवर राज्यात आमदार आदर्शग्राम योजना सुरू करण्यात आली आहे.



**शब्दांकन : विकास माळी**



विजय शिवतारे
**राज्यमंत्री** - जलसंपदा, जलसंधारण, संसदीय कार्ये

"ग्रामीण भागातील सर्व कार्यांमध्ये जल व मृदसंधारणाच्या प्रथा खोलवर रुजवून हरित महाराष्ट्राच्या उभारणीचे कार्य सुरु आहे."

# हरित महाराष्ट्र

**हरित** ग्रामीण महाराष्ट्र घडवण्यासाठी जलसंधारण विभाग कार्यरत असून, सामाजिक वनीकरणास प्रोत्साहन तसेच प्रत्यक्ष वृक्ष लागवडीचे कार्य राज्य शासन राबवत आहे. मर्यादित साधनसंपत्तीच्या प्रभावी शास्त्रीय व्यवस्थापनासाठी पाणलोटनिहाय मृद व जलसंधारणांच्या प्रथांना प्रोत्साहन व चालना देण्याचे कार्य सुरू आहे. जलसंधारण विभागांतर्गत २५० हेक्टरच्या आतील लघुपाटबंधारे प्रकल्पांची निर्मिती व परीक्षण करण्यात येत आहे. लोकसहभागातून मृद जलसंधारण व वॉटर हार्वेस्टिंगच्या मत्तांची निर्मिती व परीरक्षण करण्यात येत आहे.

जलसंधारण विभागाने निश्चित केलेली भौतिक उद्दिष्टे साध्य करणे, एकात्मिक पाणलोट विकास व्यवस्थापन कार्यक्रमासाठी चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण देणे, स्थानिक क्षेत्रासाठी पाणी वापर विभागांची निर्मिती, मृद व जलसंधारण कार्यक्रमामध्ये लोक सहभागास प्रोत्साहन, शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीपैकी किमान ८५ टक्के निधीचा विनियोग ३१ मार्चपर्यंत करणे, जलसंधारण विभागाचे संनियंत्रण व मूल्यमापन करण्याच्या कार्यपद्धती सुरू करणे, मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यासाठी ग्रामपंचायतींमार्फत क्षमता निर्धारणासाठी सामाजिक वनीकरणाच्या माध्यमाचा वापर करून घेणे, यांचा समावेश आहे. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनांतर्गत राज्य शासन जलयुक्त शिवार अभियान, साखळी सिमेंट, काँक्रिट नाला बांध कार्यक्रम, आदर्श गाव योजना, एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम तसेच पाणलोट विकास चळवळ जोमाने राबवत आहे.



**शब्दांकन : श्रद्धा मेश्राम – नलावडे**



**दीपक केसरकर**
**राज्यमंत्री -** गृह (ग्रामीण), वित्त व नियोजन

> सर्वसामान्यांच्या हिताचे रक्षण, त्यांच्या अपेक्षांची पूर्ती आणि त्यांच्या सुरक्षिततेवर सर्वाधिक भर दिला आहे.

# सुरक्षिततेला प्राधान्य

**पोलीस** दलाच्या सक्षमीकरणासाठी पोलीस अधिक्षक कार्यालयांमध्ये ४५ फिरती न्यायसहायक वैज्ञानिक पथके, ४२ ठिकाणी सायबर लॅब, क्राइम ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम प्रणालीद्वारे पोलीस ठाणी जोडली, १०४४३ पदांची निर्मिती, पोलीस मित्रांसाठी मोबाइल ॲप, नक्षली चळवळीचा बिमोड करण्यासाठी सी-६० या विशेष कमांडो दलाची निर्मिती केल्याने नक्षली कारवायांमध्ये मागील काही वर्षांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.



महिलांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा आणि पोलीस ठाणे पातळीवर महिला सुरक्षा समित्या, हुंडा पद्धत नष्ट करण्यासाठी जिल्ह्यात दक्षता समित्या, छेडछाड व विनयभंगाच्या घटना आणि कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्याबरोबरच १०९१ हा टोल फ्री हेल्पलाइन क्रमांक, बालगुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस ठाण्यात एका पोलीस अधिकाऱ्याची बाल कल्याण अधिकारी म्हणून नेमणूक, पीडित महिलांच्या साहाय्यासाठी समुपदेशन केंद्र, महिलांवरील अत्याचार कमी व्हावेत, यासाठी पोलीस ठाण्यात दामिनी पथक, मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी महिला व बालक यांच्या मदतीकरिता राज्यातील एस.टी. स्टॅण्डवर मदत केंद्रे, ऑपरेशन मुस्कान अंतर्गत १२९१२ लहान मुलांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन, पोलिसांसाठी एक लाख घरे बांधण्यासह आदि महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतले.

गेल्या दोन वर्षात गुन्हे सिद्धतेच्या प्रमाणात १४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. सर्व मध्यवर्ती तुरुंग व न्यायालयांमध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सची सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे.

**शब्दांकन : रेखा पालवे**



**राजे अम्ब्रीशराव अत्राम**
**राज्यमंत्री -** आदिवासी विकास, वने

> आदिवासी युवकांना सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास योजनेंतर्गत स्थानिक गरजेनुसार प्रशिक्षण दिले जात आहे.

# कौशल्यातून उज्वल भविष्याकडे

**आदिवासी** समाजातील विद्यार्थी, युवक यांच्या प्रगतीसाठी आणि पर्यायाने या समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासन विशेष प्रयत्न करीत आहे.

शासकीय आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी, आरोग्य समुपदेशन व मार्गदर्शन करण्यासाठी रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात मोबाइल हेल्थ युनिट सुरू करण्यात आले आहे. त्यात पहिल्या सहा महिन्यात विद्यार्थ्यांची उंची, वजन, हिमोग्लोबीन स्तर, यांची तपासणी करून; कमतरता असणाऱ्या विद्यार्थ्यांवर आवश्यकतेप्रमाणे औषधोपचार करण्यात येत आहे. तपासणी झाल्यानंतर त्यांचे आरोग्यविषयक डिजिटल माहिती कार्ड तयार करण्यात येत आहे. वन विभागांतर्गत बांबूची शास्त्रोक्त लागवड आणि औद्योगिक वापराचे प्रशिक्षण देण्यासाठी, चंद्रपूर जिल्ह्यात चिचपल्ली येथे बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. चंद्रपूर येथे वन अकादमी अंतर्गत सर्वसामान्य जनतेला, स्वंयसेवी संस्था आणि इतर प्रशासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांना नवीन विषयांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.



परदेशात जाऊन आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यासाठी पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा वार्षिक ४.५ लाख रुपयांवरुन आता ६ लाख करण्यात आली आहे. अशा प्रकारे दुर्गम, अतिदुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या विकासासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत.

**शब्दांकन: विजय कोळी**



**रविंद्र वायकर**
**राज्यमंत्री** - गृहनिर्माण, उच्च आणि तंत्रशिक्षण

"नव्या गृहनिर्माण धोरणांतर्गत मुंबईतील ३७ टक्के उपलब्ध जागेवर १ कोटीहून अधिक जनतेला सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल."

# हक्काचा निवारा

**सामान्य** माणसाला केंद्रबिंदू मानून गृहनिर्माण धोरणाची आखणी करण्यात आली आहे. नव्या गृहनिर्माण धोरणामुळे मुंबईतील पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. या नवीन धोरणांतर्गत मुंबईतील ३७ टक्के उपलब्ध जागेवर १ कोटीहून अधिक जनतेला सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. मुंबई उपनगरातील वसाहतींच्या पुनर्विकासासाठी क्लस्टर डेव्हलपमेंट योजना लागू करण्यात येणार आहे. विमानतळाचा विकास करताना परिसरातील ५० हजार लोकांचे पुनर्वसन इन-सी-टू पद्धतीने केले जाईल. यासाठी केंद्र शासनाची लेखी परवानगी प्राप्त करून घेण्यात येणार आहे. नवीन गृहनिर्माण धोरणामुळे मुंबईतील जुन्या चाळी, मोडकळीला आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा होणार आहे. सामान्य माणसाचे घराचे स्वप्न नवीन गृहनिर्माण धोरणामुळे पूर्ण होणार आहे.



राज्यातील तरुणांना गुणवत्तापूर्ण उच्च आणि तंत्रशिक्षण देण्यासाठी मागील दोन वर्षात घेतलेले निर्णय फायदेशीर ठरत आहेत. जागतिक स्तरावर झपाट्याने बदलणारे तंत्रज्ञान राज्यातील तरुणांना आत्मसात व्हावे या दिशेने उच्च व तंत्रशिक्षण विभाग प्रभावीपणे वाटचाल करीत आहे. यासाठी विभागाने घेतलेले निर्णय विद्यार्थ्यांच्या हिताचे ठरत आहेत.

**शब्दांकन: वर्षा फडके**

---



**डॉ. रणजित पाटील**
**राज्यमंत्री** - गृह (शहरे), नगरविकास, विधी आणि न्याय विभाग, संसदीय कार्ये, कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिक कल्याण

"स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला संपूर्ण राज्यभर लोकचळवळीचे स्वरुप प्राप्त झाले आहे."

# स्मार्ट शहरे, सुरक्षित नागरिक

**गेल्या** दोन वर्षात पुढील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. नागरी क्षेत्रातील स्वच्छ महाराष्ट्र अभियानामुळे ७० शहरे, कोल्हापूर मनपा आणि बृन्हमुंबई महानगरपालिकेतील बी आणि सी वार्ड संपूर्ण हागणदारीमुक्त, २६ मे २०१६ पर्यंत सर्वाधिक शौचालये बांधणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य, देशातील १० स्वच्छ शहरांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील कागल, पन्हाळा, मुरगुड, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला आणि सातारा जिल्ह्यातील पाचगणी या शहरांची निवड, देशातील १०० स्मार्ट सिटीमध्ये राज्यातील १० शहरांचा सहभाग, पहिल्या २० स्मार्ट शहरांमध्ये पुण्याची दुसऱ्या तर सोलापूरची नवव्या क्रमाकांवर निवड, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती शहरांचा राज्यशासन स्मार्ट सिटी म्हणून विकास करणार. अमृत मिशन अंतर्गत राज्यातील ४४ शहरांची निवड, मुंबई महानगर प्रदेशात १७२ किमीच्या ८ मेट्रो रेल्वे मार्गांना मान्यता, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सर्व केंद्रीय परवानग्या प्राप्त, मुंबई शहरात १५०० ठिकाणी एकूण ६०२० सीसीटीव्ही कॅमेरे, पुणे व पिंपरी-चिंचवड येथे ४३८ ठिकाणी १२८५ सीसीटीव्ही कॅमेरे, क्राइम ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम प्रणाली राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य, या प्रणालीद्वारे राज्यातील १०५१ पोलीस ठाण्यांची जोडणी, डान्सबार बंदीसाठी कायद्यात सुधारणा प्रस्तावित, अनैतिक व्यापारासंबंधी खटल्यांचा गतीने निपटारा करण्यासाठी मुंबई येथे जलदगती न्यायालय, गृह विभागाच्या १७ सेवांपैकी ९ सेवा ऑनलाइन, बृहन्मुंबई महिला सुरक्षेकरिता प्रत्येक पोलीस ठाण्यासाठी एक याप्रमाणे ९४ वाहने उपलब्ध करून दिली.



**शब्दांकन : विलास बोडके**

# सर्वांचे कल्याण



**प्रवीण पोटे-पाटील**
**राज्यमंत्री -** उद्योग आणि खनिकर्म, पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)

> नांदगाव पेठ टेक्स्टाईल पार्कमध्ये १७४ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोकरीत सामावून घेतले. ८० टक्के स्थानिकांना नोकरी देण्यात आली.

**महाराष्ट्रात** सर्वप्रथम अमरावती जिल्ह्यात १३ गावांतील अनुसूचित जातीतील दारिद्र्यरेषेखालील १३० महिलांना सोलर चरखे उपलब्ध करून देण्यात आले. त्यातून ४ हजार किलो दरमहा खादी सुताचे उत्पादन होत आहे.



या गटामार्फत सुतापासून कापड तयार करून त्यातून दर्जेदार खादी कापड उत्पादने तयार केली जात आहेत. प्रत्येक बचत गट सक्षम करण्यासाठी प्रतिबचत गट रु. २० हजार प्रमाणे प्रोत्साहन निधी म्हणून मदत करण्यात आली आहे. लोकसहभागातून १,१२८ रस्त्यांचे मातीकरण व खडीकरण करण्यात आले. तसेच १,६९८ किमी लांबी रस्ते विकसित करण्यात आले. दोन हजारापेक्षा जास्त शेतकऱ्यांना पांदण रस्त्यांचा फायदा झाला आहे. आमच्या संकल्पनेतील अमरावती जिल्ह्यात राबवलेल्या 'पालकमंत्री पांदण रस्ते विकास अभियाना'चे यश पाहून ही योजना मुख्यमंत्र्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात लागू केली. या योजनेचा समावेश २०१६-१७ च्या बजेटमध्ये केला. आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतीबरोबरच जोडधंदे करावे. यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गीर जातीच्या ५०३ गायी वितरित केल्या. त्यामुळे एक हजार लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. शासनाने राज्यात राष्ट्रीय महामार्ग लांबीत ९८४.५० कि.मी इतकी वाढ केली असून १०,८५१ कि.मी इतक्या राष्ट्रीय महामार्गासाठी तत्त्वत: मान्यता दिली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ३८ पथकर नाक्यांपैकी ११ पथकर नाके बंद तर २७ पथकर स्थानकांवर हलक्या वाहनांना सूट देण्यात आली आहे.

**शब्दांकन : सुनीता कुपेरकर**

---

# कर्ज परतफेडीसाठी सूट



**गुलाबराव पाटील**
**राज्यमंत्री -** सहकार

> ३७,७६६ शेतकऱ्यांकडील भूविकास बँकेच्या थकित कर्जाच्या परतफेडीसाठी ७१३ कोटी रुपयांची सूट देण्यात आली.

**मागील** दोन वर्षात सहकारातून समृद्धीकडे वाटचाल करत असताना सहकार विभागामार्फत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जातून मुक्त करण्यासाठी शासनामार्फत १७१.३० कोटी अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले. यामुळे या विभागातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



अल्पमुदत कर्जाच्या मध्यम मुदत कर्जात होणाऱ्या रूपांतरणासाठी, ३० एप्रिल २०१५ ऐवजी ३१ जुलै २०१६ हा दिनांक निश्चित करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आला आहे. या रूपांतरित कर्जाच्या परतफेडीच्या कालावधीत तीन वर्षांवरून पाच वर्षापर्यंत वाढ करण्यात आली आहे. भूविकास बँकेच्या सुमारे ३७ हजार ७६६ थकबाकीदार शेतकऱ्यांकडील थकित कर्जाच्या परतफेडीसाठी ७१३ कोटी रुपयांची सूट देण्याचा निर्णय शासनाने घेतला.

बँकिंग परवाना नसलेल्या नागपूर, वर्धा, बुलढाणा या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना राज्य व केंद्र शासनाचे मिळून रु.५२४.७६ कोटी अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले आहे. पतसंस्थांच्या कामकाजाचे प्रभावीपणे सनियंत्रण करण्यासाठी स्वतंत्र नियामक मंडळ स्थापन करण्यात येत आहे.

**शब्दांकन : विकास माळी**

आपले सरकार कामगिरी दमदार




**अर्जुन खोतकर**
**राज्यमंत्री** - वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय

"राज्यातील पशुधनाचा विमा उतरवण्यात येत आहे. आतापर्यंत ६८ टक्के पशुधनाचा विमा उतरवला आहे."

# पशुधनाचे संवर्धन

**राज्य** शासनाने गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध निर्णय. पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय आणि दुग्धव्यवसाय या क्षेत्रात अनेक भरीव निर्णय घेतले आहेत. राज्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर, या निर्णयांचा आढावा घेऊन त्याच्या अंमलबजावणीवर भर देण्याचा प्रयत्न आहे.



पशुसंवर्धन विभागाने राज्यातील पशुधनामध्ये वाढ व्हावी. त्याद्वारे शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यासाठी दुग्धव्यवसाय विभागाच्या वतीने विदर्भ व मराठवाड्यातील २ हजार गावांमध्ये दुग्धव्यवसाय विकास कार्यक्रम राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. तसेच हेटीकुंडी (जि. वर्धा) येथे गवळाऊ गायींचा प्रकल्प कार्यरत केला आहे. मत्स्यव्यवसाय विकास विभागानेही हा व्यवसाय वाढावा, यासाठी कल्याणकारी निर्णय घेऊन महत्त्वपूर्ण योजना सुरू केल्या आहेत. ससून डॉक यार्डचे आधुनिकीकरण करण्यासाठी ५२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मच्छीमारांना आधुनिक नौकाचे वाटप आणि त्यांना घरे बांधून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी नांदगाव पेठ येथे पहिल्या मेगा टेक्स्टाइल पार्कची उभारणी करण्यात येत आहे. मुंबईतील बंद गिरण्या नांदगाव पेठ येथे स्थलांतरित करून तेथे रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न सुरू आहेत. रेशीम उद्योगाच्या कीटक संगोपनगृहासाठी १२०० शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येत आहे. भविष्यातही या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न सुरूच राहणार आहेत.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे**



**मदन येरावार**
**राज्यमंत्री** - ऊर्जा, पर्यटन, अन्न व औषध प्रशासन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), सामान्य प्रशासन

"कृषिपंपांना दिवसा १२ तास वीज पुरवठा नोव्हेंबर २०१६ पर्यंत करण्यात येणार आहे."

# कृषिपंपांना मुबलक वीज

**ऊर्जा,** पर्यटन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), अन्न व औषध प्रशासन व सामान्य प्रशासन विभागाचा राज्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर लोकाभिमुख व पारदर्शी कारभार करण्यावर मी भर दिला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी देता यावे, यासाठी कृषिपंपाना दिवसा १२ तास वीज पुरवठा नोव्हेंबर २०१६पर्यंत करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेऊन शासनाने हा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ऊर्जा विभागाकडून या निर्णयाची अंमलबजावणी केली जात आहे. पर्यटन विभागाकडून २०१७ हे वर्ष व्हिजिट महाराष्ट्र वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. या माध्यमातून पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मुंबई आणि नागपूरला जोडणारा सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे बांधण्यात येणार आहे.



अन्न व औषध प्रशासन या विभागांतर्गत औषध व्यवसाय व निर्यातीत महाराष्ट्राची चांगली प्रगती झाली आहे. अन्न व औषध चाचणीकरिता नागपूर येथे प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. या विभागातील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या अपिलांची जिल्हावार सुनावणी घेऊन ती निकाली काढण्यात येणार आहे. विभागाच्या ७० वर्षांहून अधिक काळापासून असलेल्या जुन्या कायद्यांमध्ये कालानुरूप बदल करण्याचा मानस आहे. सेवा हमी कायद्यांतर्गत राज्यातील सामान्य जनतेला तत्परतेने सेवेची हमी मिळत आहे.

**शब्दांकन : अतुल पांडे**



**सदाशिव खोत**
**राज्यमंत्री** - कृषी व फलोत्पादन, पणन

> "व्यापारी व आडत्यांपासून शेतकरी मुक्त करण्यासाठी संत शिरोमणी सावता माळी आठवडी बाजार अभियान सुरू करण्यात आले."

# ग्राहकांचे हित, शेतकऱ्यांचा फायदा

**कृषी** हा आपल्या देशाचा आधारस्तंभ आहे. कृषी व पणन फलोत्पादन विभागाचा राज्यमंत्री म्हणून काम करताना शेतकऱ्यांचे अधिकाधिक हित साध्य व्हावे, यासाठी प्रयत्नशील आहोत.



खरीप २०१६ पासून प्रधानमंत्री फळ पीक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना राबवण्यात येत आहे. यात महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पिकांचा समावेश करून जवळपास सर्वच मंडळे समाविष्ट करण्यात आली आहेत. यासोबतच स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबवण्यात येत आहे. गेल्या दोन वर्षांत असे अनेक शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यात आले असून आगामी काळातही हेच धोरण कायम राहणार आहे.

पणन विभागाचीही आतापर्यंतची वाटचाल यशस्वी ठरली आहे. यात व्यापारी व आडत्यांपासून शेतकरी मुक्त करण्यासाठी संत शिरोमणी सावता माळी आठवडी बाजार अभियान सुरू करण्यात आले आहे. राज्यात पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर येथे हा बाजार सुरू करण्यात आला असून राज्यातील अन्य भागातही लवकरच सुरू करण्यात येणार आहे. येत्या काळात या निर्णयांचा वेळोवेळी आढावा घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

**शब्दांकन : अतुल पांडे**



**रवींद्र चव्हाण**
**राज्यमंत्री** - बंदरे, वैद्यकीय शिक्षण, माहिती तंत्रज्ञान, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण.

> "सागरी किनारे स्वच्छ करण्यात येत असून पर्यटन वाढीसाठी सोयीसुविधा निर्माण करण्यात येत आहेत."

# बंदरांचा विकास

**बंदरे** विभागाच्या वतीने किनारपट्टीच्या सर्वांगीण विकासासाठी बंदर विकास धोरण जाहीर करण्यात आले. मेक इन इंडिया सप्ताहामध्ये जयगड बंदरात एलएनजी टर्मिनल निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड व जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पात ५ हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. डहाणू तालुक्यातील वाढवण येथे सॅटेलाईट पोर्ट निर्माण करण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्था सुकर व्हावी, यासाठी जलवाहतुकीला प्राधान्य देण्यात येत आहे, यासाठी कामही सुरू केले आहे. बंदरे विभागाच्या वतीने जयगड डिगणी रेल्वे मार्ग, दिघी रोहा रेल्वे मार्ग, बंदरांना जोडणारे राज्य रस्त्यांचे रुंदीकरण, भाऊचा धक्का ते मांडवी बंदर या दरम्यान रो रो सेवा सुरू करणे व रत्नागिरी जिल्ह्यातील मिऱ्या बंदर येथे समुद्र तळाशी रीफ टाकण्याचा पथदर्शी प्रकल्प आदी महत्त्वाचे प्रकल्प हाती घेतले आहेत.



निर्मल सागर तट अभियान राबवण्यास सुरुवात झाली आहे. किनारपट्टीवर पर्यटनाला चालना देण्यासाठी व स्थानिकांना रोजगार संधी निर्माण व्हाव्यात, यासाठी जलक्रीडा धोरण २०१५ जाहीर करण्यात आले आहे. अन्न, नागरी पुरवठा विभागाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्य वाहतूक पद्धतीमध्ये बदल केला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर नागरिकांची देखरेख राहावी, यासाठी महानगरपालिका व जिल्हास्तरावर दक्षत्या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

**शब्दांकन: नंदकुमार वाघमारे**

# आता मुंबई अधिक सुरक्षित



**मुंबई शहरात १,५१० ठिकाणी ४,७१७ कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या सीसीटीव्ही प्रकल्पामुळे मुंबई शहर अधिक सुरक्षित झाले आहे. दहशतवादी कारवायांवर देखरेख ठेवणे, गुन्हेगारी कृत्यांना आळा घालणे, वाहतुकींवर नियंत्रण व शिस्त लावण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होणार आहे.**

मुंबई शहरावरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबई शहराची सुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी संपूर्ण मुंबई शहरात जागतिक दर्जाचे व उच्च क्षमता असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार संपूर्ण मुंबई शहरात १५१० ठिकाणी ४७१७ कॅमेरे बसवण्यात आले आहेत. यामध्ये ३७२७ फिक्स बॉक्स कॅमेरे, ९७० पीटीझेड कॅमेरे, २० थर्मल कॅमेरे आहेत. तर ५ मोबाईल व्हिडीओ सर्व्हिलन्स व्हॅन्सचा समावेश आहे. हे सर्व कॅमेरे, कमांड व कंट्रोल सेंटर आणि मोबाईल व्हॅन हे एकमेकांशी फायबर, वायरलेस, व्ही सॅट यासारख्या अत्याधुनिक नेटवर्क कनेक्टिव्हीटीद्वारे जोडण्यात आले आहे.

या सुविधेमुळे मुंबई शहरातील सव्वा कोटी नागरिकांची सुरक्षितता अधिक भक्कम झाली आहे. ही यंत्रणा मुंबई पोलिसांना कायदा व सुव्यवस्था राखण्यास व तपास यंत्रणांना सहाय्यभूत ठरणार आहे. गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्याबरोबरच शहरातील वाहतुकीचे व्यवस्थापन सक्षम होण्यास मदत होणार आहे. महानगरपालिकेच्या पायाभूत सुविधा अधिकाधिक सक्षमपणे राबवण्यास सहाय्यभूत ठरणार आहे. अशा या सीसीटीव्ही यंत्रणेचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नुकताच पार पडला.

या सीसीटीव्ही यंत्रणेची माहिती साठविण्यासाठी २ ठिकाणी अद्ययावत डाटा सेंटर उभारण्यात आली आहेत. मुंबई पोलीस आयुक्तालय, कलिना आणि वरळी येथील वाहतूक पोलीस मुख्यालय या ३ ठिकाणी संनियंत्रण कक्ष उभारण्यात आले आहेत. मुंबई शहरातील ९२ पोलीस स्टेशन, १३ पोलीस उपायुक्त कार्यालये, ५ अतिरिक्त पोलीस आयुक्त कार्यालयांबरोबरच राजभवन, मंत्रालय, गिरगांव चौपाटी, सत्र न्यायालय, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय अशा महत्त्वाच्या १२० पेक्षा अधिक ठिकाणी पाहणी कक्ष राहणार आहेत. या ठिकाणांवरून मुंबई शहरातील घडामोडींवर सूक्ष्म लक्ष ठेवण्यास पोलिसांना मदत होणार आहे. या प्रकल्पात वाहनांचे नंबर प्लेट डिटेक्शन, व्हिडीओ ॲनालिटिक्स तसेच एक हजार पोलीस वाहनांचे जीपीएस ट्रॅकिंग या सुविधा राहणार असून यामुळे पोलिसांना तत्काळ कार्यवाही करण्यास मदत होणार आहे.

आपले सरकार कामगिरी दमदार

गुन्हेगारांची चेहरेपट्टी ओळखण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालयात यंत्रणा उभारण्यात आली आहे. यामुळे गुन्हेगारांची ओळख पटवण्यास मदत होणार आहे.

या प्रकल्पासंदर्भात तांत्रिक व इतर साहाय्यासाठी २४/७ मदत व सेवा केंद्र स्थापन करण्यात आले आहे. सीसीटीव्ही प्रकल्प सुनियंत्रित पद्धतीने चालण्यासाठी तांत्रिक व मनुष्यबळाचा या केंद्रामार्फत पुरवठा करण्यात येणार आहे.

**– विलास बोडके**





महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
आमच्या असंख्य प्रवासी बांधवांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
प्रवासी बांधवांनो...
एसटीचा आता लागलाय लळा...
खाजगी बसचा प्रवासच टाळा.... !
परवडत नाहीत 'ऐनवेळी' वाढलेले खाजगी प्रवासाचे दर...
म्हणून तर द्या एसटी प्रवासावर भर... !
सुट्टीच्या हंगामात गर्दीचा त्रास नव्हे बरा...
आजच आपले 'आसन' आरक्षित करा... !
यंदाही जा आनंदात घरी...
मागील वर्षीच्या तिकिट दरावरी... !
सुरक्षित आणि वक्तशीर प्रवासाची हमी...
आपली एसटीच लई भारी... !
दिवाळी सुट्टीचे आगाऊ आरक्षण सुरू आहे. ऑनलाइन आरक्षणासाठी
www.msrtc.gov.in या वेबसाईटला भेट द्या.
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
दिवाकर रावते
परिवहन व खार भूमी विकास मंत्री
तथा
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
विजय देशमुख
परिवहन राज्यमंत्री

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th October 2016
Date of Publication : 10th of every Month


## महानगरपालिका / जिल्हा परिषद / पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक- २०१७

# १ जानेवारी २०१७ रोजी आपणास १८ वर्षे पूर्ण होत असतील तर...

## १६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ पर्यंत मतदार नोंदणीसाठी अर्ज करा व मतदार यादीत नाव नोंदवा!

## आणि हो, लक्षात ठेवा!

विधानसभा मतदारसंघाचीच मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरली जाणार आहे.

अधिक माहितीसाठी मतदान नोंदणी अधिकारी / महापालिकेचे प्रभाग समिती कार्यालय किंवा मतदान नोंदणी केंद्र असलेल्या जवळच्या महाविद्यालयात संपर्क साधा!

https://ceo.maharashtra.gov.in | 1800-22-1950 (टोल फ्री हेल्पलाईन)
वेळ: सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजता



**मतदार यादीत नाव नोंदवा! मतदानाचा अधिकार मिळवा!!**


O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

प्रति / TO

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक ब्रिजेश सिंह, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह